कृषीवल
रायगड, शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर २०२५
किंमत ४ ₹

## अधिराज टॉवरच्या ५१ व्या मजल्यावर आग

**पनवेल :** खारघर, सेक्टर ३६ येथील ५५ मजली अधिराज कॅपिटल सिटी टॉवरमध्ये रात्री ५१ व्या मजल्यावरील एका बंद अपार्टमेंटमध्ये भीषण आग लागण्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, कारण इमारतीतील रहिवाशांनी तात्काळ आपत्कालीन मार्गाचा वापर करून सुरक्षित स्थळी स्थलांतर केले होते. मात्र, पनवेल परिसरात वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे परिसरातील आगीचे हे सत्र सुरूच असल्याचे चित्र यानिमित्ताने पुन्हा एकदा समोर आले आहे. रात्री ११.२४ वाजता खारघर अग्निशमन दलाला अधिराज टॉवरमध्ये आग लागल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पान २ वर

## भीषण अपघातात एक ठार, एक गंभीर

**कर्जत :** कर्जत तालुक्यात गुरुवारी भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. ऑटो रिक्षा आणि दुचाकीच्या धडकेत एक तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, एक जण गंभीर जखमी झाला आहे. कर्जतमधील मोठे वेणगाव परिसरात हा अपघात घडला आहे. या अपघाताची नोंद कर्जत पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, कर्जत वेणगाव मार्गावरील मुख्य वळणावरुन जात असताना ऑटो रिक्षा आणि मोटारसायकल यांची समोरासमोर धडक झाल्यानं हा भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की, दोन्ही वाहनांचे यामध्ये नुकसान झाले आहे. या अपघातात बाळा अरुण वाघमारे या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. पान २ वर

## वेधक

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

पनवेल : उलवे भागातील २३ वर्षीय तरुणाने १४ वर्षीय मुलीवर निर्जनस्थळी लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी उलवे पोलिसांनी बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. उलवे परिसरात राहणाऱ्या मुलाची नवरात्रीमध्ये पीडितेशी गरबा खेळताना ओळख झाली होती. या ओळखीतून आरोपीने मुलीसोबत मैत्री वाढवली. दोघेही कारमधून शिवमंदिरालगत खाडीकिनारी फिरायला गेले होते. यावेळी तरुणाने पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार केला.

### गांजा विक्रेत्याला अटक

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाणे हद्दीतील पडघे गावाशेजारी गांजा विक्रीसाठी आलेल्या ४० वर्षीय व्यक्तीला तळोजा पोलिसांनी अटक केली. पडघे गावाच्या शेजारी शिवाजी शेवाळे हा हातामध्ये पिशवी घेऊन उभा होता. यावेळी पोलीस शिपाई पाटील यांना शेवाळे याच्यावर संशय आला. यावेळी पिशवीत अमली पदार्थ गांजा असल्याचे समजले. पोलिसांनी तात्काळ ७६ हजारांचा गांजा जप्त केला असून, यप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

### अपघातात वृद्धाचा मृत्यू

**नागोठणे :** नागोठण्यातील एसटी स्थानकातून रिलायन्स सर्कलकडे जाणाऱ्या पाली-नागोठणे या एसटी बसने मोटारसायकलला कट मारल्याने मोटारसायकलवर मागे बसलेले शांताराम दामा गायकवाड (७७) रा. चंदनवाडी, ठाणे मूळ राहणार देऊळवाडा, पाली (सुधागड) हे खाली पडून झालेल्या अपघातात गायकवाड यांचा मृत्यू झाला. रिलायन्स सर्कलकडून नागोठणे एसटी स्थानकाकडे जाणाऱ्या युनिकॉर्न मोटारसायकलवर मागे बसलेले शांताराम गायकवाड हे एसटी चालकाने कट मारल्याने मोटारसायकल वरून खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर जखमा झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

### लाचखोर महिला क्लार्कला अटक

**अकोला :** अकोल्याच्या पोलीस अधीक्षक कार्यालयात अमरावती एसीबीने लाचखोर महिला पोलीस क्लार्कवर कारवाई केली आहे. ममता पाटील असं लाचखोर महिला पोलीस क्लार्कचं नाव आहे. तक्रार फाईल पास करण्यासाठी आठ हजारांची लाचेची मागणी या ममता पाटील हिने तक्रारदाराकडं केली होती. दरम्यान, ममता पाटीलला लाच घेताना एसीबीने अटक केली. दरम्यान, तक्रारीवरून पडताळणी केली असता ममता पाटील यांना लाच मागितल्याच सिद्ध झालं आहे. यानंतर ममता पाटील यांना पोलिसांनी अटक केली आहे.

### बिहारमध्ये मतांचा टक्का वाढला

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीत पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यांतील १२१ जागांवर गुरुवारी मतदान पार पडलं. जनसुराज पक्षाचे नेते प्रशांत किशोर यांनी वाढलेलं मतदान लक्षात घेता मोठा दावा केला आहे. प्रशांत किशोर यांच्या दाव्यानुसार गेल्या निवडणुकीपेक्षा यावेळी झालेलं अधिक मतदान हे दाखवतं की जनतेला बदल हवा आहे. नवी व्यवस्था येत आहे. बिहारमध्ये गेल्या निवडणुकीवेळी पहिल्या टप्प्यात १२१ जागांवर ५५.८१ टक्के मतदान झालं होतं. यावेळी सायंकाळी ५ वाजता मतदानाची आकडेवारी ६०.१३ टक्क्यांवर पोहोचली आहे.

## एक हजार गावे
# पोलीस पाटीलविना

प्रमोद जाधव
| रायगड |

**गावे, वाड्यांमधील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबरोबरच गुन्ह्यांची माहिती देण्याचे काम करणारे पोलीस पाटील यांची एक हजार ९१ पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यरत पोलीस पाटील यांच्यावर अनेक गावांचा भार पडला आहे. ही पदे तात्काळ भरण्यात यावी, अशी मागणी पोलीस पाटील संघाकडून करण्यात आली आहे. मात्र, त्याची कार्यवाही अद्याप करण्यात आली नाही. त्याचा परिणाम एक हजार ९१ गावे पोलीस पाटीलविना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.**

अपुऱ्या मनुष्यबळामुळे पोलीस व महसूल प्रशासन थेट जनतेपर्यंत पोहोचू शकत नाही.

**पोलीस पाटीलपदांवर दृष्टीक्षेप**

| उपविभाग | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|
| अलिबाग | २७५ | १२३ | १५२ |
| पेण | १६८ | ७५ | ९३ |
| पनवेल | २०७ | ९४ | ११३ |
| कर्जत | ३५७ | १९४ | १६३ |
| माणगाव | २७२ | १०६ | १६६ |
| रोहा | २८६ | १३१ | १५५ |
| महाड | २७३ | १३० | १४३ |
| श्रीवर्धन | १५७ | ५१ | १०६ |
| एकूण | ११९५ | ९०४ | १०९१ |

त्यामुळे शासनाने गृह विभागामार्फत पोलीस आणि महसूल प्रशासनाच्या मदतीसाठी पोलीस पाटील यांची नियुक्ती केली. गावामध्ये शांतता आणि कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांची माहिती देणे, आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे, निवडणुकीत पोलिसांना मदत करणे, दरोडा, शांतता भंग किंवा इतर गुन्हेगारी कृत्यांपासून गावाला सुरक्षित ठेवणे, गैरवर्तन किंवा दुर्लक्षाच्या घटनांची माहिती पोहोचवणे, अशा अनेक प्रकारची कामे पोलीस पाटील करतात.

> रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्यात यावी, यासाठी संघाच्यावतीने वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. जिल्हा स्तरावरून पोलीस पाटील यांची माहिती मागविण्याचे कामदेखील करण्यात आले आहे. परंतु, अद्यापपर्यंत पोलीस पाटील यांची पदे भरली नसल्याने कार्यरत पोलीस पाटील यांच्यावर कामाचा ताण पडत आहे. गुन्ह्यांची माहिती देण्याबरोबरच निवडणूक व इतर आपत्कालीन परिस्थितीत काम करताना अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे पोलीस पाटील यांची पदे तात्काळ भरण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.
> – विकास पाटील, अध्यक्ष, रायगड पोलीस पाटील संघ

**१,०९१ पदे रिक्त**

जिल्ह्यातील गावांची संख्या दोन हजारांच्या आसपास आहे. ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारांहून अधिक आहे. जिल्ह्यासाठी एक हजार ९९५ पोलीस पाटील यांची पदे मंजूर आहेत. यापैकी फक्त ९०४ पदे भरण्यात आली आहेत. जिल्ह्यातील गावे, वाड्यांमधील कायदा व सुव्यवस्थेची माहिती देण्याचे तसेच महसूल प्रशासनाला मदत करण्याचे काम पोलीस पाटील करीत असतात. जिल्ह्यात एक हजार ९१ पोलीस पाटील यांची पदे रिक्त आहेत.

कोरोना काळात महसूल, आरोग्य प्रशासनासह पोलीस प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून पोलीस पाटील काम करीत होते. लॉकडाऊनच्या वेळी गावागावात जाऊन जनजागृती करण्याचे काम पोलीस पाटील यांनी केले. गावागावात दवंडीच्या माध्यमातून सतर्क राहण्याबरोबरच सुरक्षा राखण्याचे आवाहन पोलीस पाटील यांनी केले. त्यामुळे महसूल प्रशासन, पोलीस व नागरिक यांच्यामधील मधला दुवा म्हणून पोलीस पाटील यांच्याकडे पाहिले जाते. ग्रामीण भागात शांतता राखण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा असतो.

ऐन निवडणुकीच्या कालावधीतदेखील पोलीस पाटील यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. मात्र, रायगड जिल्ह्यात गेल्या काही वर्षांपासून पोलीस पाटील यांची भरती केली नाही. पान २ वर

## मुंबईत रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनात चौघांचा मृत्यू



| मुंबई | प्रतिनिधी |

ऐन गर्दीच्या संध्याकाळी रेल्वे कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले आणि प्रवाशांना वेठीला धरले. कर्मचाऱ्यांचे हे आंदोलन प्रवाशांच्या जीवावर बेतले आहे. लोकल अपघातात चार प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. ही भीषण दुर्घटना गुरुवारी घडली.

मुंब्रा रेल्वे अपघातप्रकरणी रेल्वेच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल केल्याच्या मुद्द्यावर रेल कामगार सेनेने आक्रमक भूमिका घेतली होती. सीएसएमटी स्थानकावर कर्मचाऱ्यांनी आंदोलन केल्याने लोकलसेवा ठप्प झाली होती. त्यामुळे मुंबईच्या सर्व स्थानकांवर चाकरमान्यांची मोठ्या पान २ वर

**आंदोलन का केले?**

मुंब्रा येथे ९ जून रोजी दुर्घटना घडली होती. यात पाच प्रवाशांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी चौकशी अहवालात रेल्वेच्या दोन अभियंत्यांवर ठपका ठेवण्यात आला होता. याविरोधात सेंट्रल रेल्वे मजदूर संघाने आंदोलनाचा इशारा दिला होता. यानुसार गुरुवारी संध्याकाळी मजदूर संघाच्यावतीने सीएसएमटी स्थानकावर आंदोलन करण्यात आले.

## बाहे गावात बिबट्याची दहशत

- पावलांचे ठसे दिसल्याने ग्रामस्थांमध्ये घबराट

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावाच्या हद्दीत बिबट्याच्या पावलांचे ठसे उमटले असल्याचे आढळून आले आहे. बुधवार, दि.५ रोजी बाहे गावाच्या हद्दीतील शेतजमिनीच्या भागात बिबट्याच्या पावलांचे ठसे उमटले असल्याचे येथील काही नागरिकांना आढळून आले. यामुळे परिसर खळबळ माजली असून, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

दरम्यान, बिबट्याच्या पावलांचे ठसे ही बातमी खरी आहे की निव्वळ अफवा आहे, याबाबत खातरजमा करण्यासाठी येथील जागरूक नागरिकांनी त्वरित वन विभाग व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था कोलाड यांच्याशी संपर्क साधला असता दोन्ही पथक बाहे गावाच्या हद्दीतमध्ये आले असता काही प्राण्यांच्या पावलांचे उमटलेले ठसे व बिबट्याच्या पावलांचे ठसे आढळून आले.



(छायाचित्र : नंदकुमार मरवडे)

> **बुधवारी सायं. सहा वाजल्याच्या सुमारास बाहे गावच्या हद्दीत नदीवर पाणी पिण्यासाठी अथवा डुकराचा मागोवा घेण्यासाठी बिबट्या आला असावा. आम्ही पायाचे ठसे तपासले असून, ते बिबट्याचे असल्याचे निदर्शनात आले आहे.**
> **– अक्षय लाटे, वनरक्षक, रोहा**

> **या भागात बिबट्या फिरत असल्याचे काही ग्रामस्थांनी सांगितले होते; परंतु याला कोणताही पुरावा नव्हता. परंतु, काल आढळून आलेले ठसे व वनविभाग अधिकारी वर्गाने याबाबत संशोधनात्मिकपणे सिद्ध केल्याने हे वृत्त खरे असल्याने ग्रामस्थांचे म्हणणेही बरोबर असल्याची प्रतिक्रिया काही ग्रामस्थांनी दिली आहे.**
> **– बाहे ग्रामस्थ**

## रस्त्याचा निधी कोणाच्या घशात?

- अलिबाग-रोहा रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार
- सर्वसामान्य नागरिकांकडून आरोप

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |



अलिबागपासून ८६ किलोमीटरच्या रस्त्याचे काम मंजूर होऊन चार वर्षे उलटून गेली. मात्र, आजही अलिबाग-रोहा मार्गावरील प्रवाशांचा प्रवास खड्ड्यांतूनच होत आहे. या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या रस्त्यासाठी १०४ कोटी रुपये खर्च केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे हा निधी नक्की कोणाच्या घशात गेला, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

अलिबागपासून रोहा त्यानंतर माणगावमधील साईपर्यंतच्या रस्त्यासाठी १७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. गुजरात येथील अग्रवाल मेसर्स एका कंपनीला काम देण्यात आले होते. या कामावरुन भाजप आणि शिवसेना शिंदे गटात श्रेयवादाची लढाई टोकाला गेली होती. मागील दोन वर्षांपूर्वी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर या रस्त्याचे काम सुरु करण्यात आले. रस्त्याचे काम सुरु झाल्याने या मार्गावरील प्रवासी सुखावून गेले होते. मात्र, त्यांचे हे सुख फार काळ टिकले नाही. 'नव्याचे नऊ दिवस' या उक्तीप्रमाणे रस्त्याचे काम करण्यात आले.

गेल्या तीन वर्षांपासून रस्त्याचे काम रखडले आहे. वेलवली खानाव, उसर, कुरुळ ते अलिबाग मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहे. या खड्ड्यातून वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खड्डे चुकविताना अपघातदेखील झाले आहेत. खड्ड्यांमुळे चालकांसह प्रवासी त्रस्त झाले आहेत. रस्त्याचे काम ५० टक्के पूर्ण झाल्याचा दावा बांधकाम विभागाकडून करण्यात आला आहे. मात्र, हा दावा फेल ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या रस्त्यासाठी १०४ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे नक्की करोडो रुपये खर्च कोणत्या रस्त्यावर करण्यात आले, असा प्रश्न सर्वसामान्य पान २ वर

## १८०० कोटींचा जमीन घोटाळा?
# अजित पवारांच्या लेकाच्या अडचणीत वाढ

| पुणे | प्रतिनिधी |

अजित पवारांचा मुलगा पार्थ पवारांवर सरकार मेहेरबान झालं आहे. पार्थ पवारांवर जमिनीची खैरात करण्यात आली आहे. मुळची महार वतनाची जमीन पार्थ पवारांच्या घशात घालण्यात आली आहे. सारखं फुकट, सारखं माफ असं कसं चालेल म्हणणाऱ्या अजित पवारांच्या लेकानेच जमीन लाटल्याचं प्रकरण समोर आलं आहे. पुण्यातल्या कोरेगाव पार्कमधील जवळपास ४० एकर जमीन, जिची किंमत १८०० कोटी आहे. ती पार्थ पवारांच्या अमेडिया कंपनीला अवघ्या ३०० कोटींना देण्यात आली आहे. सरकारी जमिनीवर डल्ला मारल्याचा आरोप विरोधकांनी केल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी चौकशीचे आदेश दिले असून, आतापर्यंत तहसीलदार आणि दुय्यम उपनिबंधकांना निलंबित करण्यात आले आहे.



एवढंच नव्हे तर, या व्यवहारासाठी लागणारी तब्बल २१ कोटींची स्टँपड्युटीही माफ करण्यात आली आहे. फक्त ५०० रुपयांच्या स्टँपपेपरवर या व्यवहाराचा करार करण्यात आला. सगळे नियम मोडून-तोडून अजित पवारांचा मुलगा पार्थ पवारांसाठी हा व्यवहार झाला आहे. पुण्यातला उच्चभ्रू कोरेगाव पार्क भागातल्या जवळपास ४० एकर जमिनीची पार्थ पवारांच्या अमेडिया कंपनीनं खरेदी केली. पार्थ पवारांच्या या कंपनीत त्यांचे मामेभाऊ दिग्विजय पाटील हे भागीदार आहेत. १८०० कोटींची जमीन फक्त ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली आहे. त्यासाठी जवळपास २१ कोटींची स्टँप ड्युटी माफ करण्यात आली.

कोरेगाव पार्क भागातील ही जमीन मूळ महार वतनाची आहे. आता ती सरकारी जमीन आहे. पान २ वर

**दोघांचे निलंबन**

याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यानुसार अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले आणि दुय्यम उपनिबंधक रवींद्र तारु यांना तात्काळ निलंबित करण्यात आलं आहे. फुटक मागू नका, असं शेतकऱ्यांना खडसावणारे उपमुख्यमंत्री अजित पवार आता मुलाला फुकट जमीन दिल्यावर काय प्रतिक्रिया देतात, याची उत्सुकता लागून राहिली आहे.

## दुरुस्तीसाठी पैसे नसल्याने घंटागाडी बंद

- रेवदंडा परिसरात कचऱ्याचे ढीग
- दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य थोक्यात

| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |



अलिबाग तालुक्यातील कोट्यवधींची उलाढाल असलेल्या रेवदंडा ग्रामपंचायतीकडे घंटागाडी दुरुस्तीसाठी पैसे नाहीत, याबाबतचे भीषण वास्तव समोर आले आहे. परिणामी, गावात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून, बाजारपेठा-मार्ग कुठेही जा, तिथे दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आजारांचा धोका वाढला आहे.

रेवदंडा ग्रामपंचायत महसुलात देशभरात प्रसिद्ध, पण आरोग्य सेवेत मात्र रद्दीचा आलेख! स्वच्छता अभियानाचा आवाज केवळ बोर्डावर किंवा सरकारी जाहिरातींमध्ये ऐकू येतो. सरकारचे 'ग्रामस्वच्छता अभियान' प्रत्यक्षात रेवदंड्यात गुदमरूनच गेलंय, अशी बिकट परिस्थिती सर्वत्र आहे. घंटागाडी बंद; पण घरपट्टी आणि आरोग्य करासाठी कपाट उघडं... पैसा येतो कुठे, खर्च कशावर? गावकरी विचारतात, प्रशासन मौन बाळगत असल्याने संताप व्यक्त होत आहे. वर्षानुवर्षे ऑडिट झालं नाही, खर्चाचे स्पष्टीकरण अद्याप नाही. ग्रामस्थांकडून कर वसूल करायचा, पण सेवा मात्र गुप्त गैरव्यवहाराच्या ढिगाऱ्यात लपवायची, हेच नवे व्यवस्थापन असल्याचा पान २ वर

## बहुप्रतिक्षेनंतर प्रवासी वाहतूक सुरू | स्थानिकांसह पर्यटकांची हाऊसफुल्ल गर्दी
# माथेरानची राणी आली हो..!



**असा असेल प्रवास!**

नेरळ येथून सकाळी मालवाहू गाडी सोडली जाणार आहे. त्यानंतर नऊ वाजता पहिली, तर साडेदहा वाजता दुसरी प्रवासी गाडी नेरळ येथून माथेरानसाठी सोडली जाणार आहे. माथेरान येथून नेरळसाठी पहिली गाडी पावणे दोन वाजता आणि दुसरी गाडी चार वाजतासाठी रवाना होणार आहे. त्या दोन्ही फेऱ्यांचा कार्यक्रम मध्य रेल्वेकडून जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे नवीन गाड्या वाढवून देण्याची अनेक वर्षांची मागणी आताही प्रलंबित आहे. मात्र, माथेरान ते अमन लॉज यादरम्यान शटल सेवा पूर्वीसारखी सुरू राहणार आहे.



| नेरळ | प्रतिनिधी |

पर्यटकांची लाडकी मिनीट्रेन गुरुवारी, सहा नोव्हेंबरपासून पर्यटक प्रवाशांच्या दिमतीस आली. नेरळ-माथेरान-नेरळ या पहिल्या गाडीला पर्यटकांनी हाऊसफुल्ल प्रतिसाद दिला. मात्र, वातानुकूलित गारेगार प्रवास करण्यासाठी जोडण्यात आलेला विस्टाडोम डब्बा मात्र पूर्णपणे रिकामा राहिला. दरम्यान, या पहिल्या प्रवासी गाडीला स्थानक प्रबंधक यांनी हिरवा झेंडा दाखवला आणि प्रवासी वाहतूक सुरू झाली. त्याआधी रेल्वे अधिकारी, कर्मचारी यांनी गाडीची भंडारा उधळून पूजाअर्चा केली.

नेरळ येथून माथेरानसाठी मिनीट्रेन सोडली जाते. नेरळ जंक्शन स्थानकातून १९०७ मध्ये मिनीट्रेन सुरू झाली आहे. पान २ वर

## जरांगेंना जीवे मारण्याचा कट

| जालना | प्रतिनिधी |

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्याची धमकी आणि त्यांच्या विरोधात कट रचल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबतची तक्रार जालना पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीची तातडीने दखल घेत जालना गुन्हे शोध पथकाने वेगाने तपासचक्र फिरवली. तपास पथकाने गुप्त माहितीच्या आधारे दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतलं असून, जालना पोलिसांकडून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.



बीड जिल्ह्यातील जरांगे पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी ही तक्रार दिली असून, बीडमधूनच हा कट रचला गेल्याचं प्राथमिक माहितीनुसार समोर आलं आहे. पोलिसांनी या प्रकरणी तातडीने कारवाई करत दोन संशयितांना ताब्यात घेतलं आहे. त्यांची सखोल चौकशी सध्या सुरू आहे. या कटामध्ये कोट्यवधी रुपयांच्या व्यवहाराचा उल्लेख असून, त्यासंदर्भात व्हिडिओ आणि इतर पुरावे मनोज जरांगे यांच्या सहकाऱ्यांकडे उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे. जालना पोलिसांकडून या प्रकरणाचा कसून तपास सुरू करण्यात आला असून, लवकरच यातील सत्य समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, ताब्यात घेण्यात आलेल्या संशयित आरोपींची सध्या कसून चौकशी सुरू आहे.

# ‘वंदे मातरम’ गीताला १५० वर्षे पूर्ण

## मुख्यमंत्रीच्या उपस्थितीत मंत्रालयात समूहगान

। मुंबई । प्रतिनिधी ।

स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी व शहिदांना वंदन आणि देशप्रेमाचे प्रतीक असलेल्या वंदे मातरम् गीताला १५० वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्त राष्ट्रभक्तीच्या भावनेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात उद्या शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.४५ वाजता वंदे मातरम्‌चे समूहगान होणार आहे. पुढील वर्षभर याअंतर्गत सार्ध शताब्दी महोत्सवाच्या माध्यमाने राज्यभरात कौशल्य विकास विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

थोर कवी आणि तंत्रज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली लिहिलेल्या वंदे मातरम् या गीताला ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्षे पूर्ण होत असल्याने मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यासंदर्भात मंत्री लोढा म्हणाले की, वंदे मातरम् गीताला ऐतिहासिक पार्श्वभूमी असून देशप्रेम निर्माण करण्याचे सामर्थ्य या गीतात आहे. स्वातंत्र्य लढ्यातील शहिदांना अभिवादन आणि मातृभूमीला वंदन करणारे संस्कार या गीताच्या समूह गायनातून होणार असल्याने शासकीय स्तरावरून शैक्षणिक संस्था आणि शासकीय आस्थापनांमध्ये वंदे मातरम् गीताचे समूहगान आयोजित करण्याबाबत परिपत्रक आणि अध्यादेश जारी करण्यात आले असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही यासंदर्भात देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात कौशल्य विभागानेही राज्यस्तरीय तसेच तालुका स्तरावर समित्या स्थापन केल्या आहेत. राज्यभरात निबंध लेखन, परिसंवाद, प्रदर्शने आणि वक्तृत्व स्पर्धा आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्यावतीने राज्यभरात सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

विविध सामाजिक संघटना, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये तसेच समाजमाध्यमांवर या ऐतिहासिक सोहळ्याला व्यापक रूप देण्याचा कौशल्य आणि सांस्कृतिक विभागाचा प्रयत्न आहे. देशभक्ती जागृत करणाऱ्या सार्ध शताब्दी महोत्सवात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहन मंत्री लोढा यांनी केले आहे.

### वंदे मातरम् सामूहिक गायनाचे आयोजन

बंकिमचंद्र चटर्जी लिखित ऐतिहासिक वंदेमातरम गीताच्या लिखाणास १५० वर्ष पुर्ण झाल्यानिमित्त सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून ‘‘वंदे मातरम् सार्ध शताब्दी महोत्सव’’ कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. महाराणा प्रताप औद्योगिक प्रशिक्षण संस्था कुर्ला, मुंबई शहर व उपनगर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.४५ ते १०.३० या कालावधीत ‘‘वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सव’’ कार्यक्रम आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमासाठी खासदार वर्षा गायकवाड, आमदार पराग शाह जिल्हाधिकारी, तहसीलदार व अन्य अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाची सुरुवात लघु नाटिकेच्या सादरीकरणाने होणार आहे. त्यानंतर डॉ. प्रेरणा प्रमोद क्षीरसागर, राष्ट्र सेविका समिती कोकण प्रान्त बौध्दिक प्रमुख यांचे व्याख्यान होणार आहे. यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ५००० हून जास्त विद्यार्थी एकाच वेळी उपस्थित राहून वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करणार आहेत.

# सहाय्यक अधीक्षकांची नियुक्ती रद्द करा

## बहुजन विद्यार्थी संघटनेची मागणी

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

भिवंडी शहरातील इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाच्या सहाय्यक अधीक्षक शुभांगी रसाळ यांची उसनवारी नियुक्ती रद्द करून त्यांना तात्काळ त्यांच्या मूळ पदस्थापनेवर हजर राहण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी बहुजन विद्यार्थी संघटनेच्या वतीने इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांकडे करण्यात आलेली आहे.

शुभांगी रसाळ या सहाय्यक अधीक्षक म्हणून उपजिल्हा रुग्णालय भिवंडी येथे ज्या दिवशी कामावर रुजू झाल्या, त्याच दिवशी कुठलेही लेखी आदेश नसतानाही त्यांची उसनवारी तत्त्वावर उपसंचालक आरोग्य विभाग ठाणे येथे नियुक्ती करण्यात आली. शुभांगी रसाळ यांचे प्रमोशन वादाच्या भोवऱ्यात असून, रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धनच्या जसवली ग्रामीण रुग्णालयात त्यांची पदोन्नती झाली होती; परंतु त्या तिथे हजरच झाल्या नाहीत.

उपसंचालक कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी शैलेश पाटणकर हे त्यांना पाठीशी घालत असून, शुभांगी रसाळ यांचा डीपीसीचा कार्यकाळ संपल्यानंतरसुद्धा शैलेश पाटणकर यांच्या हट्टापायी शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून पदोन्नतीने पुन्हा त्यांची पदस्थापना इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय भिवंडी येथे करण्यात आल्याचा आरोप बहुजन विद्यार्थी संघटनेने केला आहे. नियमाप्रमाणे शुभांगी रसाळ यांनी पदोन्नतीच्या आस्थापनेवर हजर न झाल्याने आणि त्यांची डीपीसी रद्द झाल्याने साहजिकच त्यांची पदोन्नती बाद झाली होती. परंतु, मुख्य प्रशासकीय अधिकारी शैलेश पाटणकर यांनी शासन निर्णयाला तिलांजली देऊन शुभांगी रसाळ यांना भिवंडी येथे पदस्थापना दिली, असा आरोप होत आहे.

शुभांगी रसाळ यांना ताबडतोब आपल्या मूळ पद स्थापनेवर भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात हजर राहण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी बहुजन विद्यार्थी संघटनेच्या वतीने करण्यात आली असून, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेकडून देण्यात आलेला आहे.

# सायबर सुरक्षेबाबत जनजागृती अभियान

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

नवी मुंबईतील एपीएमसी पोलिस, तुर्भे आणि एपीएमसी परिसरात सातत्याने सायबर सुरक्षेबाबत जनजागृती अभियान राबवत आहेत. पोलिसांनी तुर्भे गावात आयोजित भागवत कथेदरम्यान तसेच एपीएमसी परिसरातील विविध कार्यालयांमध्ये जाऊन नागरिक, कर्मचारी व विद्यार्थी यांच्यात जागृती निर्माण केली. या अभियानांतर्गत ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्याचे विविध उपाय सविस्तर समजावून सांगण्यात आले.

अभियानादरम्यान लोकांना सांगण्यात आले की, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस ओटीपी किंवा वैयक्तिक माहिती देऊ नका, अज्ञात लिंकवर क्लिक करू नका आणि डिजिटल अरेस्टच्या नावाखाली घाबरून कोणतेही आर्थिक व्यवहार करू नका. तसेच बनावट गुंतवणूक योजना, दुप्पट पैसे देण्याचे आमिष किंवा झटपट कर्ज देणारे संदेश यांपासून सावध राहा.

जर कधी सायबर फसवणुकीचा बळी पडलात तर तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधा किंवा १९३० किंवा १९४५ या क्रमांकांवर संपर्क करून माहिती द्या, असे आवाहन करण्यात आले. याप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय शिंदे यांनी सांगितले की, आज प्रत्येकाच्या हातात मोबाईल डिव्हाइस आहे आणि त्याबद्दल संपूर्ण माहिती नसल्याचा फायदा सायबर गुन्हेगार घेतात. पोलीस विभागाकडून सतत जनजागृती केली जात आहे. आपण पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन केले, तर कुणालाही आपली फसवणूक करता येणार नाही.

# दोन लाखांच्या आमिषापोटी २३ हजारांची फसवणूक

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

दोन लाख रुपयांच्या आमिषापोटी २३ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात २९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

निलेश दडस हे टाकेवाडी, सातारा येथे राहात असून, ते २९ ऑक्टोबर रोजी बँकेतून २३ हजार रुपये काढून दुसऱ्या बँकेत गेले. यावेळी शेजारील इसमांकडून त्यांनी बँकेत स्लिप भरून घेतली. यावेळी बँकेत आलेला दुसरा इसम हा हिंदीतून बोलू लागला. त्याने गोव्यावरून दोन लाख रुपये चोरून आणले असून, पैसे खात्यावर जमा करून द्या, अशी विनंती त्यांनी केली.

बोलण्यात गुंतवून ते दोघे दडस यांना बाहेर घेऊन गेले आणि दोन लाख रुपये त्यांच्याकडे ठेवण्यास सांगितले. दडस यांनी नकार दिला. त्यावेळी दहा-पंधरा मिनिटांत येतो असे सांगितले आणि विश्वास नसेल तर तुझ्याकडचे २३ हजार माझ्याकडे ठेवायला दे असे सांगून काळ्या रंगाच्या प्लास्टिक पिशवीतून दोन लाख रुपये दडस यांना दिले आणि ते पायी निघून गेले. दोघांची वाट पाहिली असता ते आले नाहीत. दडस यांनी पिशवी उघडून पाहिली असता रुमालात पैसे होते. रुमाल उघडून पाहिला असता कागदांचे बंडल दिसून आले आणि फसवनूक झाल्याचे लक्षात आले.

# आचारसंहिता जाहीर होताच होर्डिंग हटवले

। खोपोली । प्रतिनिधी ।

नगरपालिका निवडणुकीसाठी अचारसंहिता जाहीर होताच पालिका प्रशासनाने शहरातील मुख्य रस्ते तसेच गल्लीबोळातील नेते, कार्यकर्ते यांचे होर्डिंग्ज, पोस्टर आणि बॅनर हटविण्याचे काम अतिक्रमण टीमच्या कर्मचाऱ्यांनी सुरू केले आहे.




रस्त्यावर, बाजारपेठ, बसस्थानक अशा गर्दीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जाहिराती दिसून येतात. धार्मिक, व्यावसायिक जाहिरातीही झळकत असल्या, तरी त्या माध्यमातून राजकीय नेत्यांच्या, पदाधिकाऱ्यांच्या जाहिराती मोठ्या संख्येने लावल्याचे दिसून यायचे. मुख्याधिकारी प्रशासक पंकज पाटील यांच्या आदेशानुसार कर विभागाचे अधिकारी गौतम भगळे यांच्या अधिपत्याखाली अतिक्रमण टीम कर्मचारी, सर्व मुकादम सफाई कामगार या मोहिमेत सहभागी होते.

# शिबिरातून साधला परिसंवाद



## कॉन्ट्रॅक्टर आणि इंजिनिअरकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

बांधकाम, रसायन क्षेत्रातील नामांकित कंपनी कृष्णा कॉनकॅम लि. मुंबईच्या वतीने जिल्ह्यातील कॉन्ट्रॅक्टर आणि इंजिनिअर यांच्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून कॉन्ट्रॅक्टर आणि इंजिनिअरसोबत परिसंवाद साधण्यात आला. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अलिबागमधील वेश्वी येथील मॅपल आयव्हीमधील सभागृहात २१ ऑक्टोबरला हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रात्यक्षिकाबरोबरच व्याख्यानाच्या माध्यमातून बांधकामाची माहिती देण्यात आली. बांधकामबाबत असलेल्या त्रुटी दुर करण्याची माहिती प्रात्यक्षिकांद्वारे सांगण्यात आली. यावेळी बांधकाम दर्जा वाढविण्यावर कशा पध्दतीने भर द्यावे याचे मार्गदर्शन करण्यात आले. माणगावमधील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजी युनिवर्सिटीमधील स्ट्रक्चरल कन्सल्टंट प्रा. सचिन मोरे, नामांकित स्ट्रक्चरल कन्सल्टंट महेश चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. या शिबिरात १७० हून अधिकहून अधिकजण सहभागी झाले होते.

या एकदिवसीय शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अलिबाग तालुक्यातील बांधकाम व्यावसायिक, इंजिनिअर, आर्किटेक्ट, आरसीएफ व जिल्हा परिषदमधील अधिकारी, कृष्णा कॉनकेम प्रा. लि. मुंबई यांचे सलील गाडगीळ टेकनिकल डायरेक्टर तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# मजदूर सभेचा दणदणीत विजय

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारत सरकारच्या मुंबई टांकसाळ कंपनीमध्ये ४ नोव्हेंबर रोजी युनियन मान्यतेसाठी झालेल्या चुरशीच्या निवडणुकीमध्ये हिंद मजदूर सभेसी संलग्न असलेल्या टांकसाळ मजदूर सभेने टांकसाळ कामगार सेनेचा पराभव करून दणदणीत विजय मिळविला आहे. टांकसाळ कामगारांनी पुन्हा एकदा टांकसाळ मजदूर सभेला मान्यता मिळून दिली आहे. टांकसाळ मजदूर सभा ही गेल्या ६० वर्षांपासून सलगपणे मान्यताप्राप्त संघटना म्हणून कार्यरत आहे. यापूर्वी या संघटनेचे नेतृत्व कामगार नेते अशोक मेहता, एफ.एम.पिंटो, वसंत भाष्टे यांनी केले आहे. आता संघटनेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ कामगार नेते ॲड. एस.के. शेट्ये हे तीन दशके अध्यक्षपद भूषवित असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेने अनेक ऐतिहासिक विजय यापूर्वीदेखील संपादन केलेले आहेत. कॉ. विद्याधर राणे आणि कॉ. मुकुंद वाजे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत, तर कॉ. संजय सावंत संघटनेचे सरचिटणीस आहेत. शेवटी सरचिटणीस कॉ. संजय सावंत यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# पान १ वरून

## अधिराज टॉवरच्या ५१ व्या मजल्यावर आग

अग्निशमन दलाचे जवान अग्निशमन बंब आणि पाण्याचे टँकर घेऊन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आगीची तीव्रता जास्त असल्याने काळंबोली अग्निशमन दलाच्या पथकालाही तातडीने मदतीसाठी पाचारण करण्यात आले. पनवेलचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांनी दिलेल्या माहितीनुसार, बंद असलेल्या ५१ व्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये शॉर्ट-सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. टॉवरची उंची जास्त असल्यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना आग विझवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागले. अग्निशमन दलाच्या एका पथकाने पायऱ्या चढून थेट ५१व्या मजल्यावर प्रवेश केला, तर दुसऱ्या पथकाने लिफ्टचा वापर ४८ व्या मजल्यापर्यंत करून, त्यानंतर पायऱ्या चढून ५१व्या मजल्यावर आग विझवण्याची मोहीम सुरू केली. अग्निशमन दलाच्या जवानांनी सुमारे तीन तास केलेल्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. मात्र, या दुर्घटनेत ५१ व्या मजल्यावरील फ्लॅट पूर्णपणे जळून खाक झाला.

## पोलीस पाटीलविना

त्यामुळे कार्यरत असलेल्या पोलीस पाटील यांच्यावर कामाचा ताण पडला आहे. एका पोलीस पाटलांकडे दोन ते तीन गावांचा भार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे गावांतील गुन्हे व इतर माहिती पोलीस व प्रशासनाकडे पोहोचविताना कार्यरत पोलीस पाटलांना अडचण निर्माण होत आहे. काही पोलीस पाटील सेवानिवृत्त झाले. परंतु, त्या जागी नवीन पोलीस पाटील यांची भरती केली नसल्याने ही पदे रिक्तच राहिली आहेत. त्यामुळे पोलीस पाटीलविना गाव अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील गावांची लोकसंख्या दोन हजारांच्या आसपास आहे. ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारांहून अधिक आहे. जिल्ह्यासाठी एक हजार ९९५ पोलीस पाटील यांची पदे मंजूर आहेत. यापैकी फक्त ९०४ पदे भरण्यात आली आहेत. जिल्ह्यातील गावे, वाड्यांमधील कायदा व सुव्यवस्थेची माहिती देण्याचे तसेच महसूल प्रशासनाला मदत करण्याचे काम कार्यरत पोलीस पाटील यांच्यामार्फत केले जात आहे. जिल्ह्यात एक हजार ९१ पोलीस पाटील यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे एक हजार ९१ गावे पोलीस पाटीलविना, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. गावांतील काही गुन्ह्यांची माहिती पोलीस पाटील यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी नागरिकांना दुसऱ्या गावातील पोलीस पाटील यांच्याकडे जावे लागत आहे. पोलीस पाटील यांची भरती तात्काळ करण्यात यावी, अशी मागणी मागील अनेक वर्षांपासून पोलीस पाटील संघटनेकडून करण्यात आली आहे. मात्र, त्याची कार्यवाही केली नसल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे. याबाबत जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याशी संपर्क साधला; परंतु होऊ शकला नाही.

## अजित पवारांच्या लेकाच्या अडचणीत वाढ

या जमिनीचा व्यवहार हा शीतल तेजवानी यांच्या पॅरामाऊंट इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीसोबत अमेडिया कंपनीनं केल्याचं दिसत आहे. प्रत्यक्षात खरेदीखत हे गायकवाड आणि २७४ मूळ मालक यांच्यासोबत अमेडिया कंपनीनं केलं आहे. यावर आता विरोधकांनीही अजित पवारांना घेरलं आहे. १८०० कोटींची जमीन ३०० कोटींना घेतली. आता तुम्हाला कसं फुकट लागतं? असा प्रश्न शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. सरकारनं हा संपूर्ण व्यवहार रद्द करावा, अशी विरोधकांची मागणी आहे. त्याचबरोबर विरोधकांचा आणखी एक प्रश्न आहे. तो म्हणजे आता ईडी आणि सीबीआय झोपलेत का?

पार्थ पवारांच्या कंपनीचा हा सगळा घोटाळा येतो तो महसूल विभागाशी संबंधित आहे. यासंदर्भात महसूलमंत्र्यांना गाठल्यावर महसूलमंत्र्यांनी हात वर केलेत. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीशी याचा संबंध आहे, त्या राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षांनीही याबद्दल उत्तर देणं टाळलं आहे. माझ्याकडे मंत्री म्हणून माहिती आलेली नाही असं बावनकुळे म्हणाले आहेत. तर माहिती घेऊन बोलेन असं सुनिल तटकरे म्हणाले आहेत. कोरेगाव पार्कमधली ही जमीन पार्थ पवारांना फक्त ३०० कोटींना दिल्यानंतर मोठं राजकीय वादळ उठलंय. त्यात आता मुख्यमंत्र्यांची एन्ट्रीही झाली आहे. त्यांनी अखेर योग्य ते चौकशीचे आदेश दिल्याचं सांगितलं आहे.

पुणे जमीन गैरव्यवहारात पाणी मुरलंय आणि ते पार्थ पवारांच्या बाजूनं वळवण्यात आलंय, हे जवळपास स्पष्ट आहे. त्यामुळेच कारवाईची चक्रं भराभर फिरलीयत. याप्रकरणी अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलीय. पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले आणि दुय्यम उपनिबंधक रवींद्र तारु यांना तत्काळ निलंबित करण्यात आलंय. फुटक मागू नका, असं शेतकऱ्यांना खडसावणारे उपमुख्यमंत्री अजित पवार आता मुलाला फुकट जमीन दिल्यावर काय प्रतिक्रिया देतात, याची सर्वाधिक उत्सुकता आहे.

## माथेरानची राणी आली हो..!

पावसाळ्यात दरडी कोसळून अपघात होण्याची शक्यता असल्याने दरवर्षी १५ जून ते १५ ऑक्टोबर या कालावधीत नेरळ-माथेरान मार्गावरील प्रवासी वाहतूक बंद ठेवली जाते. यावर्षी मे महिन्यात पाऊस आला आणि १५ जून रोजी पावसाळा अपेक्षित धरून बंद होणारी मिनीट्रेन २६ मेपासून बंद करण्यात आली. त्यानंतर मोसमी पाऊस लांबला आणि १५ ऑक्टोबर रोजी नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन पुन्हा आपला प्रवास सुरू करू शकली नव्हती. अजूनही सरता पाऊस सुरू असताना पर्यटक प्रवासी वर्गाची प्रचंड मागणी असल्याने मिनीट्रेनचे नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावर मालवाहू गाड्यांची चाचणी घेण्यात आली. त्या चाचणीमध्ये २८ ऑक्टोबर रोजी नेरळ येथून निघालेली मालवाहू गाडी कोणत्याही अडथळ्याविना पोहोचली होती. त्यानंतर पुन्हा मालवाहू गाडी दोन नोव्हेंबरसाठी पाठवण्यात आली आणि या मालवाहू गाडीचा प्रवास सुखरूप झाल्यानंतर नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनची प्रवास सुरू करण्याचा निर्णय मध्य रेल्वे प्रशासनाने घेऊन गुरुवारी प्रवासी गाडी सुरू केली. तब्बल २० दिवस उशिरा मिनीट्रेन सुरू झाली आहे. याबाबत मध्य रेल्वे प्रशासनाने वेळापत्रक जाहीर केले होते.

नेरळ येथून सहा प्रवासी डब्बे लावलेली पावसाळ्यानंतरच्या हंगामातील पहिली मिनीट्रेन माथेरानसाठी रवाना झाली. त्याआधी नेरळ स्थानकात या गाडीच्या इंजिनची पूजा करण्यात आली. या पहिल्या गाडीचे सारथ्य अनुभवी चालक हरीश चिंचोळे यांनी केले, तर त्यांना सहाय्यक म्हणून मुकेश योगी यांनी साथ दिली. या गाडीचे गार्ड म्हणून हरदेव मीना, तर तिकीट तपासनीस भगत हे होते. पहिल्या गाडीमधील द्वितीय श्रेणीची सर्व ९० तिकिटे संपली, तसेच प्रथम श्रेणीची २२ तिकिटे तिकीट खिडकी उघडल्यावर काही मिनिटात संपली. पहिली तिकीट दहा जणांच्या ग्रुपने मिळविली असून, या गाडीसाठी लावण्यात आलेला वातानुकूलित डब्बा मात्र रिकामा राहिला. या पहिल्या गाडीला प्रभारी स्थानक प्रबंधक धीरेंद्र सिंह यांनी हिरवा झेंडा दाखवला. त्यावेळी स्थानक प्रबंधक पाटील, वाहतूक निरीक्षक अनुप कुमार सिंह, मुख्य तिकीट निरीक्षक जे.जी. विनोद, बिर्जन कुमार तर बुकिंग क्लार्क योगेंद्र राजावत, प्रेम चंद ऑड यांनी काम पाहिले. दरम्यान, या रेल्वे मार्गाची देखभाल ठेवणारे कनिष्ठ अभियंता सानप यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून गाडी सुरू करण्यात आली.

**असे असेल वेळापत्रक**
**नेरळ येथून माथेरानसाठी**
**सकाळी ०८.५०, सकाळी १०.२५**
**माथेरान येथे पोहोचणार..**
**सकाळी ११.३०, दुपारी ०१.०५**
**माथेरान येथून नेरळसाठी..**
**दुपारी ०२.४५, दुपारी ०४.००**
**नेरळ येथे पोहचणार..**
**सायंकाळी.०५.३०, सायंकाळी ०६.४०**

## रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनात चौघांचा मृत्यू

प्रमाणात गर्दी झाली होती. तेव्हा सीएसएमटी ते मस्जिद बंदरदरम्यान चार प्रवासी धावत्या लोकलमधून पडले, असे सांगण्यात येत आहे. त्याचवेळी रुळावरून फास्ट लोकलने या प्रवाशांना उडवले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे राष्ट्रीय रेल्वे मजदूर संघाने आंदोलन केले असून, या आंदोलनात रेल्वे कर्मचारी सहभागी झाल्याने रेल्वे सेवा विस्कळीत झाली होती. संध्याकाळी सहा ते सात या कालावधीत सीएसएमटी स्थानकात प्रवाशांची गर्दी झाली होती. संध्याकाळी सहाच्या सुमारास मजदूर संघाच्यावतीने आंदोलनाला सुरूवात झाली. तासभर हे आंदोलन सुरू होते. यामुळे संध्याकाळी सहा ते सात या कालावधीत रेल्वे सेवा विस्कळीत झाली. मध्य रेल्वेवरील वाहतूक ठप्प पडल्याने प्रवाशांचे हाल झाले. मध्य रेल्वेच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, लोहमार्ग पोलिसांनी दोन अभियंत्यांविरोधात गुन्हा दाखल केल्याने गुरुवारी रेल्वे कर्मचाऱ्यांनी सीएसएमटी स्थानकात आंदोलन केले. संध्याकाळी पावणे सात वाजता मध्य रेल्वेवरील वाहतूक पूर्ववत झाली आहे.

## रस्त्याचा निधी कोणाच्या घशात?

नागरिकांना पडला आहे. १०४ कोटी रुपये कोणाच्या घशात गेले, असा सवाल उपस्थित केला जात आहे. रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत आहे. याबाबत उपअभियंता डोंगरे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु तो होऊ शकला नाही.

## दुरुस्तीसाठी पैसे नसल्याने घंटागाडी बंद

आरोप नागरिकांकडून होत आहे. सामाजिक संस्था स्वखर्चाने वर्षातून चार-पाच वेळा रस्ते घासून काढतात, पण लोकप्रतिनिधी आणि अधिकारी मात्र फोटो-ओढून वाहवा लाटतात. रेवदंडा हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे श्रद्धास्थान, मग या श्रद्धास्थानात असा दुर्गंधीचा विटाळ कसा सहन केला जातो? ग्रामविकास अधिकारी सुदेश राऊत म्हणतात, ‘‘निधी मिळाला की घंटागाडीचा मार्ग निघेल.’’ निधी कुठे जातो, घंटागाडीला तेल किंवा रिपेअरची व्यवस्था ग्रामपंचायतीकडे का नाही, ग्रामस्थांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यपाल देवव्रत आचार्य, मुख्य सचिव राजेंद्र कुमार यांच्यापर्यंत सवाल पाठवला आहे.

## भीषण अपघातात एक ठार..

तर, मोटारससायकल चालक संतोष हिलम आणि ऑटो रिक्षातील चालक आणि एक प्रवासी जखमी झाला आहे. जखमींवर कर्जतमधील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या अपघाताचा अधिक तपास कर्जत पोलीस करीत आहेत.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000037894**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-24/ 2025-2026.**<br>RFx e-tender for Supply of various type of Nut, bolts at various substation under EHV (O&M) Division Panvel..... **3rd call.**<br>**Tender amount Rs. 9,87,151/-, EMD amount Rs. 9,872/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **06.11.2025, 18:00 Hrs. to 16.11.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 16.11.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **17.11.2025 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(A. P. Joshi)**
**Executive Engineer**
**E.H.V.(O&M) Dn. Panvel**



**ग्रुप ग्रामपंचायत दापोली**
**पो. सानेगाव, ता. रोहा, जि. रायगड.**

जा.क्र. दिनांक : ०६/११/ २०२५

**निविदा सुचना**

ग्रुप ग्रामपंचायत दापोली ता.रोहा, जि.रायगड यांच्याकडून ग्रामनिधी १५/मागासवर्गीय खर्च सन २०२५/२०२६ व स्वच्छ भारत अभियान ग्रामिण टप्पा २ सन २०२५/२०२६ अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी नोंदणीकृत ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर संस्था यांचेकडून टक्केवारी दराची लिफाफा पद्धतीने सिल बंद निविदा मागवण्यात येत आहेत. निविदा दिनांक ०७/१०/२०२५ ते १३/१०/२०२५ या कालावधीत सुट्टीचा दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात पाठवाव्यात पोस्टाने आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच अपुर्ण निविदा उशिरा आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदा दिनांक १४/१०/२०२५ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा.सरपंच अध्यक्षतेखाली उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाचा प्रकार | अंदाजपत्रकीय | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे दापोली येथे श्री.जिवन पाटील यांच्या घरापासून ते श्री.प्रितेश ठाकूर यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. | ग्रामनिधी १५/ मागासवर्गीय निधी | ८४०१२ | १ टक्का | २०० | ६ महीने |
| २ | मौजे करंजविरा येथे बापदेव मंदिर शेजारी सार्व.शौचालय बांधकाम करणे | स्वच्छ भारत अभियान ग्रामिण टप्पा २ | ३००००० | १ टक्का | २०० | ६ महीने |

**अटी व शर्ती खालील प्रमाणे**

१ निविदा दिनांक ०७/१०/२०२५ पासून दिनांक १३/१०/२०२५ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून ग्रा. प. कार्यालयात मिळतील व दिनांक १४/१०/२०२५ रोजी मा.सरपंच दापोली यांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील.
२ प्रत्येक निविदा स्वतंत्र असावी व सोबत GST प्रमाणपत्र, पॅनकार्ड, सुशिक्षित बेरोजगार अभियंता प्रमाणपत्र एकाच लखोटयात असावे.
३ ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
४ निविदा फॉर्म फी परत मिळणार नाही.
५ काम करणेपुर्वी जागेवरचा फोटो व काम पुर्ण झाल्यावरचा फोटो ठेकेदाराने दिल्याशिवाय कामाचे बिल अदा केले जाणार नाही.
६ काम मंजूर झाल्यावर ठेकेदाराने रूपये ५०० चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारासह स्वखर्चाने करारनामा करून दयावा लागेल.
७ काम पुर्ण झाल्यावर ठेकेदाराने कामाची माहीती दर्शविणारा बोर्ड जागेवर लावणे आवश्यक आहे.
८ कामाची देखरेख पंचायत समितीच्या तांत्रिक इंजिनियर यांच्या आदेशाप्रमाणे व आराखडयाप्रमाणे होणे बंधनकारक आहे.
९ ठेकेदाराच्या बिलातून GST, सुरक्षा अनामत, रॉयल्टी सरचार्ज, तसेच अन्य कपाती शासनाच्या नियमानुसार करण्यात येतील.
१०. ग्रामपंचायतीकडे जसा निधी उपलब्ध होईल तसा ठेकेदाराला देण्यात येईल त्याची कोठेही तक्रार करता येणार नाही.
११ काम पुर्ण झाल्यापासून ६ महीन्यानंतर कामाची स्थिती पाहून सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.
१२ ठेकेदार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे PFMS प्रणालीशी सलग्न असावे.

सही/-
**(श्री.समिर सदानंद पाटील)**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत दापोली**
**ता.रोहा, जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत दापोली**
**ता.रोहा. जि.रायगड**

# सायबर टोळी गजाआड

## 12 गुन्हेगारांना केली अटक



**सुमारे ८४ कोटींची केली फसवणूक**

अटक आरोपीकडे असणारे लॅपटॉप व मोबाईल यांचा तांत्रिक तपास केला असता अशा ऑनलाईन प्रतिबंधीत गेमींग वेबसाईड ऑपलिकेशन व ऑनलाईन सायबर फसवणुकीकरीता त्यांनी विविध बँकांच्या ८८६ खात्यांचा वापर केला आहे. देशभरातील एन.सी. सी.आर.पी. पोर्टलवर दाखल ३९३ तकारीमध्ये शेअर मार्केटींग फॉर्ड, जॉब रॅकेटींग, वर्क फॉर्म होम इत्यादी हेडचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

पोर्टलवरील तक्रारीमध्ये नागरिकांची ८३,९७,४८,२७८ रूपयांची फसवणूक झाली आहे. अटक संशयित आरोपीकडून ५२ मोबाईल फोन,०७ लॅपटॉप, ९९ वेगवेगळ्या बँकांचे डेबिट कार्ड, ६४ बँकांचे धनादेश पुस्तिका, १ टाटा सफारी कार असे १८ लाख ५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

। पनवेल । प्रतिनिधी ।

राज्यात सर्वत्र राष्ट्रीय सायबर सुरक्षा सप्ताह सुरु असून याच सप्ताहात प्रतिबंधित ऑनलाईन गेमिंगद्वारे फसवणूक करणारी टोळी नवी मुंबई पोलिसांनी उद्ध्वस्त केली आहे. टोळीतील १२ जणांना अटक करण्यात आली आहे. संशयित आरोपींनी देशभरातील विविध बँकेच्या ८८६ खात्यांचा वापर केल्याचे निष्पन्न झाले आहे. शिवाय त्यांच्या विरोधात भारतातील एन.सी. सी.आर.पी. पोर्टलच्या एकुण ३९३ तक्रारी उघड झाले आहे. आरोपींनी आता पर्यंत ८३ कोटी ९७ लाख ४८ हजार २७८ रूपयांची फसवणूक झाल्याचे प्रथमदर्शी तपासात निष्पन्न झाले आहे.

इसाण उस्मानी मिनहाज शेख, हितेश पुनाराम देवांगन, सुनिल श्रवण देवांगन, तोमेशकुमार मोहीत उईके, राहुल राजु देवांगण,अंकीत रमेश सिंग, अभिषेक संजय सिंग, हरिषकुमार मदनलाल अर्पित संतेन्द्रकुमार सोनवाणी, रजत दिलीप शर्मा, लालबाबु राजेश्वर राम कुमार, कृष्णा अंशु, अमित विश्वास असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.अवैध्यरित्या गेमिंग ॲप चालविणाऱ्या आरोपींना बँक खाती पुरवणारा आरोपी इसम इम्रान शेख हा सीबीडी रेल्वे स्टेशन येथे येणार असल्याची बातमी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार राहुल पवार यांना मिळाली होती. त्यांनी इम्रान उस्मानी मिनहाज शेख याला सीबीडी रेल्वे स्टेशन येथुन ताब्यात घेतले.

त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर ऑनलाईन गेमिंग फसवणूक केल्याचे कबूल केल्यावर सीबीडी बेलापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

इम्रान उरुमानी मिनहाज शेख याने ऑनलाईन गेमिंगकरीता बँक खाते उघडुन दिल्यास काही रक्कम देण्याचे अमिष नवी मुंबई परिसरातील नागरिकांना दिले होते. तसेच आरोपीने नागरिकांना बँक खाते उघडण्यास लावुन बँकेचे पासबुक, एटीएम कार्ड, बँक खात्यास लिंक मोबाईल सिम कार्ड, धनादेश पुस्तिका इत्यादीचे किट स्वत: कडे घेतले होते. हे किट आरोपी हा रूनावल गार्डन डोंबिवली येथे पाठवित असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या ठिकाणी पंच व तज्ञांच्या सहायाने मध्यवर्ती कक्ष पोलीस पथकाने धाड टाकली असता तेथे प्रतिबंधीत गेमींग व सायबर फसवणुकीचे ऑनलाईन प्रकार चालु असल्याचे दिसून आले. तेथील ऑनलाईन फसवणूक करीता असलेल्या साहित्यासह ५ आरोपींना पंचनामा कारवाई करून अटक करण्यात आलेली आहे.

गुन्ह्यातील अटक आरोपीकडे केलेल्या कौशल्यपूर्ण अधिक तपासानंतर अशाच प्रकारे ऑनलाईन सायबर फसवणूक व प्रतिबंधीत ऑनलाईन गेमिंग खेळविणारे इतर आरोपीत हे पिंपरी चिंचवड येथे असल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर ठिकाणी देखील पंच व तज्ञांच्या सहायाने पोलीस पथकाने धाड टाकली असता तेथे प्रतिबंधीत गेमींग व सायबर फसवणुकीचे ऑनलाईन प्रकार चालु असल्याचे दिसून आले. तेथील ६ आरोपींना पंचनामा कारवाई करून अटक करण्यात आली आहे.

हि कामगिरी ही सहाय्यक पोलीस आयुक्त, अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक श्रीनिवास तुंगेनवार,सचिन कोकरे, सतिश भोसले, महेश जाधव, पोलीस उपनिरीक्षक राहुल भदाने, मंगेश वाट, पोलीस हवालदार अनिल यादव, नितीन जगताप, महेश पाटील, संजय राणे, पोलीस नाईक सतिश चव्हाण, निलेश किंद्रे, सचिन टिके, अजय कदम, दिलीप ठाकूर, सोमनाथ काळे, राहुल वाघ, नवनाथ पाटील, ओंकार भालेराव, पुजा वैद्य या पथकाने केली आहे.

# अध्यात्मिक परिषद उत्साहात

। भाकरवड । प्रतिनिधी ।



आगरी सामाजिक संस्था अलिबाग आयोजित अध्यात्मिक परिषद देहेन येथे डॉ.अविनाश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड मानसी म्हात्रे, ॲड.गौतम पाटील, साहित्यिक चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

यावेळी मानसी म्हात्रे म्हणाल्या, आगरी संस्था उपक्रमशील संस्था असून दरवर्षी या संस्थेमार्फत गुणवंतांचा सन्मान केला जातो. ही प्रशंसनीय बाब आहे. आगरी भवन निर्माण झाले कि, संस्थेचे सामाजिक कार्य आणखीन गतिमान होईल, असा मला विश्वास वाटतो.

गौतम पाटील म्हणाले, जे गुणवंत जे कर्तृत्ववंत ते आगरी होय.आगरी नेहमीच प्रत्येक कार्यात पुढे असतात.कोकणसिंह नारायण नागू पाटील यांच्यापासून सुरू झालेली ही कार्यकर्तृत्वाची पताका अशीच फडकत राहील. अध्यक्षीय भाषणात अविनाश पाटील म्हणाले, अलिबाग म्हणजे ज्ञानाचे आगर असून इथे अनेक चळवळी व आंदोलने यशस्वीपणे पार पडली आहेत.वारकरी संप्रदायाचे उगम व प्रवास या बाबत त्यांनी ऊहापोह केला. चंद्रकांत पाटील यांनी आपल्या भाषणातून वारकरी संप्रदाय व संतजन यांचा संबंध आपल्या भाषणातून स्पष्ट केला. प्रारंभी सुवर्णा भगत यांनी ईशस्तवन सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह.भ.प.जगन्नाथ राऊत यांनी केले तर, उपस्थितांचे स्वागत संस्थाध्यक्ष कैलास पिंगळे यांनी केले. आभार प्रदर्शन संदेश पिंगळे यांनी केले. सूत्रसंचालन सुदेश जुईकर यांनी केले. सुभाष म्हात्रे, सिद्धेश पाटील, रवी पाटील, रेखा मोकल, वनिता पिंगळे, जयश्री म्हात्रे, किमया पिंगळे, राजश्री पाटील, प्रकाश मिसाळ, गोरख पाटील, पद्माकर म्हात्रे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

चंद्रकांत म्हात्रे,मिरीग पाटील, मच्छिंद्र पाटील, शैलेश पाटील, महेंद्र ठाकुर, गोरखनाथ पाटील,सौ.विद्या म्हात्रे,सौ.वनिता पाटील, प्रमोद पाटील, सुनील म्हात्रे,धनाजी पिंगळे,प्रमोद जुईकर, महेंद्र जुईकर, शशिकांत पाटील, प्रल्हाद पाटील,अरुण पाटील, अमरनाथ भगत, संतोष पाटील यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. श्रेया पिंगळे, श्रमिका पाटील, सृष्टी पाटील, डॉ.श्रद्धा शेळके, शंतनु मोकल, शुभम पिंगळे, आकाश पिंगळे, नंदेश गावंड यांचा सत्कार करण्यात आला. काव्य लेखन स्पर्धेतील विजेते नरेश पाटील, बी.एन.पाटील, शिवाजी मोकल, रवींद्र पाटील यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमासाठी पत्रकार जीवन पाटील, काशिनाथ नागावकर, विलास म्हात्रे, संतोष पिंगळे, सुरेश खडपे असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

## महिलेची फसवणूक

। पनवेल । प्रतिनिधी ।

लग्नाचे आमिष दाखवून कामोठे येथील महिलेची तब्बल १६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कामोठे येथील पीडित महिलेने एका कंपनीच्या संकेतस्थळावर त्यांची वैयक्तिक माहिती संकलित केली होती. याच संकेतस्थळावर नलेश निफाडे पाटील याची पीडितेसोबत ओळख झाली. निलेशने ओळख करताना व्यावसायिक असल्याचे सांगून महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने लग्नाचे आश्वासन देत वेळोवेळी १६ लाख रुपये पीडितेकडून घेतले.

# पनवेल तालुक्यात कुष्ठरोग शोधमोहीम

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम अभियान राबविण्यात येणार असून २०२७ पर्यंत जिल्ह्यात कुष्ठरोग्यांची संख्या शून्यावर आणण्यासाठी अर्थात शून्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्हा प्रशासन काम करीत आहे.

या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकूण ७८ हजार ७३५ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून एकूण ३ लाख ९३ हजार ६७९ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तरी या मोहिमेदरम्यान घरी येणाऱ्या आरोग्य पथकास सहकार्य करावे, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा खेडेकर यांनी नागरिकांना केले आहे.

समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करुन होणारा प्रसार कमी करणे, समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे. सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार रोखणे, हे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करणे. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे नावाच्या जंतूमुळे होतो. या जंतमुळे त्वचेवर, नास्तवर आणि शरीराच्या नसा इतर अवयवावर परिणाम होतो. ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. तालुक्यातील एकूण ७८ हजार ७३५ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून ३,९३,६७९ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

## निवडक



### मानवता हाच खरा धर्म : महेंद्र घरत

**उरण :** महान संत साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. याच साईबाबांची पालखी श्री साई सेवा मंडळ उरण काढते. त्यांचे यंदा पालखीचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे, ही गौरवास्पद बाब आहे. त्यांचा आदर्श घेऊन उरण परिसरात शिर्डीला पालखी निघण्याची परंपरा सुरू झाली आहे. भर उन्हातून तरुण पायी शिर्डीला जातात, त्यांना सहकार्य करणे मी माझे कर्तव्य मानतो. मानवता हाच खरा धर्म आहे, असे मी मानतो आणि कृतीतून ते समाजात दाखवून देतो, असे काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी सोनारी येथे आपले मत व्यक्त केले. आई-वडिलांची सेवा करा, त्यांची सेवा केलीत तर आयुष्यात काहीही कमी पडणार नाही, मी सेवेचे व्रत हाती घेतले आणि सुखकर्ता बंगल्यावरून ते चोवीस तास चालते. वेगवेगळ्या सेवेचा यात समावेश आहे. त्यात खंड पडू देत नाही, असेही महेंद्र घरत यावेळी म्हणाले. महेंद्र घरत यांच्यातर्फे शिर्डीला जाणाऱ्या तरुणांना टी-शर्ट देण्यात आले.




### उरणचे पेन्शनर्स पार्क केवळ नावापुरते

**उरण :** शहरातील उरण मोरा मार्गावर उरण नगर परिषेदेने पेन्शनर्स पार्कचा फलक बसविला आहे. मात्र पार्कसाठी उभे राहण्यासाठीही जागा शिल्लक राहिलेली नाही. त्यामुळे येथील पेन्शनर्स पार्क हे केवळ फलकापुरते उरले आहे. या पार्कात ज्येष्ठ नागरिकांना बसायला एकही आसन व्यवस्था नाही. यामुळे ज्येष्ठांची मोठी कुचंबना होत असल्याने या पार्ककडे पाठ फिरवली आहे. शहरात ज्येष्ठ नागरिक आणि पेन्शनर्सची संख्या वाढली आहे. सकाळी व सायंकाळी ज्येष्ठ नागरिक व्यायाम करण्यासाठी पार्क, बागेत फिरण्यासाठी येतात. येथे ज्येष्ठांना विश्रांती घेण्यासाठी किमान बाकड्याची व्यवस्था असावी अशी अपेक्षा आहे. उरणच्या या पेन्शनर्स पार्कमधून अनेक उपक्रम राबवले जातात. शहरात नगर परिषदेच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या विमला तलाव या ठिकाणी विविध प्रकारच्या सुविधांचा वापर केला जात आहे.

### निवडणुकीसाठी रात्र थोडी, सोंगे फार

**अलिबाग :** निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. पहिल्याच टप्प्यात राज्यातील नगर परिषदा आणि नगरपंचायतीसाठी मतदान २ डिसेंबरला होणार असल्याचे जाहीर झाले आहे. त्यामुळे राजकीय पक्ष आणि इच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू झाली आहे. निवडणुकीत उमेदवारांचे अंतिम चित्र २५ नोव्हेंबरला स्पष्ट होणार असल्याने, केवळ सहा दिवसांत उमेदवारांना संपूर्ण प्रचार यंत्रणा राबवित, मतदारांपर्यंत पोहोचण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे रात्र थोडी, सोंगे फार या उक्तीप्रमाणे पक्ष आणि उमेदवारांची स्थिती झाली आहे. रायगड जिल्ह्यातील १० नगर परिषदांसची निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी १० ते १७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. १८ रोजी अर्जांची छाननी, तर २१ नोव्हेंबरला अर्ज माघारीची शेवटची तारीख आहे. यावर हरकती आणि अपिलाची मुदत २५ नोव्हेंबर आहे. त्यानंतर उमेदवारीचे निर्णायक चित्र स्पष्ट होणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात युती आणि आघाडीचे गणिते जुळलेली नाहीत. त्यामुळे कार्यकर्ते आणि मतदारांमध्ये संभ्रमावस्था आहे. या निवडणुकीत थेट नगराध्यक्ष निवडला जाणार आहे. त्यामुळे उमेदवारीसाठी राजकीय पक्ष सक्षम उमेदवारांची अजूनही पडताळणी करत आहेत.

## सोन्याच्या चेनसह अंगठीची चोरी

। पनवेल । प्रतिनिधी ।

राहत्या घरातून सोन्याची चेन आणि अंगठी चोरून नेल्या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात एक नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे या बाबत पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

लीला मालू या बालाजी सिम्फनी, पनवेल तालुक्यातील सुकापुर येथे राहत असून त्यांनी सोन्याची चेन आणि सोन्याचे अंगठी मेहंदी लागून खराब होईल म्हणून बेडरूममध्ये असलेल्या कपाटातील खणामध्ये ठेवले.

त्यांनी दुसऱ्या दिवशी कपाटातील ड्रॉवरमध्ये ठेवलेली चैन अंगठी पाहिले असता ती सापडून आली नाही. २१ ग्रॅम वजनाचे दागिने चोरीला गेल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# नागावमध्ये सैनिक सन्मान सोहळा

। रायगड । जिल्हा । प्रतिनिधी ।



देशासाठी त्याग, बलिदान देणाऱ्या सैनिकांच्या कार्याचा गौरव व्हावा, यासाठी नागावमध्ये एक ऋणानुबंध सोहळा आयोजित करण्यात आला. शहिद निलेश तुणतुणे यांच्या आई, वडीलांसह सेवानिवृत्त झालेल्या सैनिकांचा सन्मान मोठ्या उत्साहात करण्यात आला.

वीर माता अनुराधा गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा विद्या गोखले यांच्या माध्यमातून बुधवारी(दि.५) झाला. या नाविन्य उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

या सन्मान सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून वीरमाता अनुराधा गोरे आणि सैन्य दलातील पॅरा, स्पेशल फोर्समधील पांडुरंग आंब्रे, सरपंच हर्षदा मयेकर, अमरनाथ राणे, डॉ. सुरेश गोरेगावकर, सेवानिवृत्त कॅप्टन उन्मेश वाणी, आदींसह सैन्य दलातील सेवानिवृत्त हवालदार, कर्नल व नागावमधील ग्रामस्थ, उपस्थित होते.

विद्या गोखले यांनी हा सोहळा नागावमध्ये घडवून आणला. ऋणानुबंध नावाचा अगळा वेगळा कार्यक्रम घेऊन सैनिकांची देशभक्ती, त्याग, कर्तव्यनिष्ठा, आणि पराक्रमाप्रती आजच्या युवा पिढीमध्ये सैनिकांबद्दल आदर, प्रेम व देशसेवेची इच्छा व्हावी म्हणून हा कार्यक्रम नागाव येथील मांजरेकर कॉलनी येथे आयोजित करण्यात आला. विद्या गोखले यांच्या सैनिकांप्रती असलेल्या भावनांचा आदर म्हणून सरखेल कान्होजी आंग्रे सामाजिक संस्था, अखिल भारतीय पूर्ण सैनिक सेवा परिषद रायगड यांच्याकडून विद्या गोखले यांचा सन्मान करण्यात आला.

# तिसऱ्या महामुंबईच्या निर्मितीला वेग

**नैना प्रकल्पातील पाच गावांचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात**

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन झाल्यानंतर तिसरी महामुंबई साकारण्यासाठी आखलेल्या नैना प्रकल्पाला अखेर गती मिळू लागली आहे.

नैना क्षेत्रातील पहिल्या पाच गावांचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. नांदगाव, देवद, कुडावे, उसर्ली आणि वडवली या गावांमधील जवळपास ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. ४६ गावांचा समावेश असलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेत शहर नगर नियोजन क्रमांक १ ते १२ सिडकोने जाहीर केली असून, पुढे गावनिहाय संवाद साधून सर्वे क्षण पूर्ण करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या चमूने नवी मुंबई विमानतळ प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर नैना प्रकल्पाकडे पूर्ण लक्ष केंद्रित केले आहे. त्यांनी या योजनेची जबाबदारी सह-व्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल यांच्याकडे सोपवली असून, मुख्य नियोजनकार आशुतोष उईके यांच्या समन्वयातून भूमापन, अभियांत्रिकी आणि भूमिअभिलेख विभाग सुसंवादात काम करत आहेत. नांदगावमध्ये सर्वेक्षणानंतर रस्ता मार्किंगचे काम सुरू झाले असून, लवकरच प्रत्यक्ष रस्ते बांधकाम सुरू होणार आहे.

## वकिलांसाठी मेडीएशन प्रशिक्षण सुरु



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्हा विधिसेवा प्राधिकारण रायगड-अलिबागच्या वतीने जिल्हयातील वकिलांसाठी ४० तासाचे मेडीएशन प्रशिक्षण आयोजित केले. जिल्हा न्यायाधीश एक तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश माणगाव व प्रशिक्षक एस. टी. भालेराव यांच्या हस्ते या प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी रायगड जिल्हा विधिसेवा प्राधिकारणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून प्रशिक्षण वकिलांसाठी कसे उपयुक्त आहे याची माहिती दिली. रायगड जिल्हा व अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील यांनी मेडीएशनचे महत्व सांगताना मेडिएशनमुळे वादातील पक्षकारांना लवकर वादाचे निराकारण करता येते.

त्यामुळे पक्षकारांचा वेळ, पैसा वाचतोच शिवाय न्यायालयाला जटील प्रकरणात पुरेसा वेळ देता येतो. न्यायालयावरील प्रकरणांचे ओझे कमी होण्यास मदत होते असे सांगितले. पुर्वी मेडीएशन प्रशिक्षणासाठी ठाणे येथे जावे लागत होते.परंतु हे प्रशिक्षण या ठिकाणी उपलब्ध करून दिल्याबद्दल ॲड. प्रसाद पाटील यांनी जिल्हा विधिसेवा प्राधिकरणाचे आभार मानले.

# स्व.महेश देशमुख पतसंस्थेचा गौरव

**ॲड. परेश देशमुख यांचा आदर्श पतसंस्था पुरस्काराने सन्मान**

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।




महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी अलिबाग येथील स्व. महेश देशमुख नागरी सहकारी पतसंस्था अलिबाग यांना नवराष्ट्र को-ऑपरेटिव्हह अवॉर्ड्स २०२५ मध्ये आदर्श पतसंस्था पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते हा सन्मान देत संस्थेचे चेअरमन ॲड. परेश देशमुख यांचा गौरव करण्यात आला. हा सन्मान स्वीकारण्यासाठी महेंद्र पाटील, संचालक संदीप घरत, संचालक संतोष पालकर, कर्मचारी प्रतिनिधी प्रकाश जाधव उपस्थित होते.

सहकार चळवळीतील दूरदृष्टी, समर्पण आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना गौरवण्यासाठी या पुरस्कार वितरण सोहळा मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटर, नरिमन पॉईंट येथे मंगळवारी(दि.४)आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आ.प्रवीण दरेकर, आ. डॉ. विनय कोरे, प्रवीण दराडे, आ. सचिन अहिर, श्रीनिवास राव, संजय मलमे आदी मान्यवर उपस्थित होते. ॲड. परेश देशमुख यांनी या सन्मानाबद्दल आभार व्यक्त करीत संस्थेच्या कार्याची माहिती दिली. स्व. महेश देशमुख नागरी सहकारी पतसंस्था या माध्यमातून समाजात आर्थिक आणि सामाजिक बदल घडवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना या पुरस्काराने आणखी बळ मिळाले आहे, असे सांगितले.

## ज्वेलर्सच्या दुकानातून हातातील कड्याची चोरी

**पनवेल :** सोन्याच्या दुकानातून शेहेचाळीस हजार रुपये किमतीचे सोन्याचे लहान बाळाच्या हातातील कडे बुरखा घातलेल्या महिलेने चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पनवेल शहरातील मलाबार गोल्ड अँड डायमंड रिचेस ज्वेल आर्केड प्रायव्हेट लिमिटेडमध्ये काळ्या रंगाचा बुरखा परिधान केलेली महिला लहान बाळाच्या हातातील सोन्याचे कडे घेण्यासाठी आली होती. यावेळी सेल्समनने तिच्यासमोर कड्यांचा ट्रे ठेवला. यावेळी त्यातून पसंतीचे कडे शोधत असताना हातचलाखी करून ४.७ ग्राम वजनाचे सोन्याचे कडे हातात लपवून ती बुरख्याच्या खिशात घालून चोरी करून निघून गेली. हा सर्व प्रकार दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरात दिसून आला आहे.

**प्रवास होणार अधिक सुरक्षित | आयपीएस अधिकाऱ्याची होणार नियुक्ती**

# एसटी प्रवाशांच्या सुरक्षितेत वाढ

। रायगड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सुरक्षा व दक्षता विभागात लवकरच भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हे पद रिक्त असून, या नियुक्तीमुळे एसटी प्रवाशांच्या सुरक्षितेत वाढ होणार आहे.

स्वारगेट बस स्थानकात फेब्रुवारी महिन्यात महिला अत्याचाराच्या प्रकणानंतर राज्यभरात याचे पडसाद पडले होते. एसटीला लवकर आय़पीएस दर्जाचा अधिकारी देण्यात येईल, असे आश्वासन परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधिमंडळात उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दिले होते. यानुसार गृह विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच आयपीएस दर्जाच्या अधिकारी पदाला मंजुरी दिली. त्यामुळे लवकरच एसटीच्या सुरक्षा विभागात या पदावर नियुक्ती करण्यात येणार असल्याचे एसटी महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले. एसटी महामंडळात राज्यभरातून दररोज लाखो प्रवाशांना सेवा पुरवते. मात्र, गेल्या काही वर्षांत आगार आणि स्थानकामध्ये प्रवाशांसोबत होणारे गैरव्यवहार, सामान, वस्तूंची चोरी, स्थानकातील मालमत्तेची तोडफोड प्रामुख्याने महिलांची छेडछाड आणि हिंसाचाराच्या घटनांमुळे सुरक्षा विभागाची जबाबदारी महत्त्वाची होती. गेल्या अनेक वर्षांपासून सुरक्षा आणि दक्षता विभागातील हे पद रिक्त असून, संबंधित आगारप्रमुख आणि विभागीय अधिकाऱ्यांच्या जबाबदारीवर स्थानकात खासगी सुरक्षारक्षकांच्या माध्यमातून सुरक्षितता पुरवली जात होती. स्वारगेट महिला अत्याचाराच्या घटनेनंतर एसटीने सुरक्षा कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली, सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आणि गस्तही वाढवली. पण, विभागप्रमुख नसल्याने निर्णय प्रक्रिया मंदावली होती. आयपीएस अधिकाऱ्याची नियुक्तीमुळे हे दोष दूर होतील, असा दावा करण्यात येत आहे.

नियुक्तीमुळे एसटीच्या सुरक्षा विभागात गती आणि सुरक्षितता प्राप्त होणार आहे. आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जीपीएस ट्रॅकिंग, तात्काळ प्रतिसाद पथके आणि महिलांसाठी विशेष मदत कक्ष स्थापन करून प्रवाशांचा विश्वास दृढ करण्यात येणार आहे. तसेच, तक्रारींचा वेळेवर निपटारा होईल. सुरक्षारक्षकांमधील शिस्तीचा अभाव दूर होईल. तसेच, महामंडळाच्या इतर विभागांशी समन्वय वाढेल, ज्यामुळे एकूण कार्यक्षमता सुधारणार आहे.

**सुरक्षिततेसाठी उपाय**

- आगार, स्थानकातील मालमत्तेपासून प्रवाशांची सुरक्षितता निश्चित होणार
- तक्रारींचा वेळेत निपटारा होण्यास मदत होणार
- महिलांसाठी स्वतंत्र मदत कक्ष, निगराणी कक्ष स्थापना करण्यात येणार
- राज्यभरातील स्थानकांवर एकाच ठिकाणावरून नियंत्रण
- ई-बस आणि स्मार्ट सिक्युरीटी यांची माहिती वेळोवेळी कार्यान्वित
- पॅनिक बटन किंवा अतिसंवेदनशील काळात तत्पर मदत मिळणार

> प्रवाशांची सुरक्षा ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे. ही नियुक्ती त्या दिशेने मोठे पाऊल आहे. या निर्णयाने केवळ सुरक्षितता नाही, तर त्याबरोबर महामंडळावरील विश्वासार्हता, वाहतूक सेवा आणि कारभारात गती येऊन नवसंजीवनी मिळेल.
> – प्रताप सरनाईक, परिवहनमंत्री



# आवाज वाढव ट्रम्प तुला...

अमेरिका ही भांडवलदारांची मक्का. आणि न्यूयॉर्क ही त्या मक्केतल्या इमामांची गुहा. जगातील सर्वाधिक श्रीमंतीने माजलेले आणि धनदांडगे लोक न्यूयॉर्कमध्ये राहतात. न्यूयॉर्कचा जीडीपी सुमारे अडीच लाख कोटी डॉलर्स आहे. जगातील चीन, जर्मनी, जपान, फ्रान्स, ब्रिटन, इटली आणि भारत या केवळ आठ देशांचा जीडीपी किंवा सकल राष्ट्रीय उत्पादन न्यूयॉर्कहून अधिक आहे. बाकी जगातले तब्बल १८० देश असे आहेत ज्यांच्यापेक्षा न्यूयॉर्कचे उत्पन्न जास्त आहे. गंमत म्हणजे या १८० देशांमध्ये श्रीमंत असे कोरिया, बेल्जियम, नेदरलँड्स वगैरेही आहेत. तर अशा या न्यूयॉर्कच्या महापौरपदी जोहरान ममदानी निवडून आले आहेत. त्याबद्दल भारताने आणि त्यातही डाव्या लोकांनी आनंद व्यक्त करायला हवा. त्याला अनेक कारणे आहेत. एक म्हणजे, ममदानी हे भारतीय वंशाचे आहेत. मान्सून वेडिंग, सलाम बॉंबे यासारखे सिनेमे काढणाऱ्या दिग्दर्शिका मीरा नायर म्हणजे ममदानींची आई. पण याहून अधिक महत्वाचे म्हणजे उघडपणे समाजवादी घोषणा देऊन ममदानी जिंकले आहेत. त्यांचा निवडणुकीचा सर्व प्रचार हा गरिबांसाठी होता. अमेरिकेतला आणि जगातला सर्वात मोठा शेअर बाजार न्यूयॉर्कमध्ये आहे. जगभरात लाखो कोटी रुपये इकडून तिकडे फिरवण्याचे दर मिनिटाला निर्णय न्यूयॉर्कमध्ये होत असतात. या मंडळींना ममदानी यांच्यासारखे नेते निवडून येणे म्हणजे कोण्या फाटक्या माणसाने यांच्या आलिशान घरांमध्ये किंवा पार्ट्यांमध्ये आल्यासारखे वाटते. त्यामुळेच ममदानी यांना हरवण्यासाठी या भांडवलदारांनी कोट्यवधी डॉलर्स खर्च केले. बिल एकमन नावाचा एक बडा गुंतवणूकदार आहे. लाखो कोटींचा मालक आहे. त्याने ममदानी यांच्या विरोधातील उमेदवारांना कोट्यवधी डॉलर्स दिले. ममदानी त्याला प्रचारात म्हणाले देखील की, मी एकमनकडून करापोटीदेखील इतका पैसा गोळा करणार नाही. वॉल स्ट्रीटवरच्या अनेक कंपन्या व बँकांनी आपल्या कर्मचाऱ्यांना खास पत्रे पाठवून ममदानींच्या विरोधात मतदान करण्याचे आवाहन केले होते. ममदानी सत्तेत आले तर आपले काही खरे नाही असे या सर्वांना वाटते आहे.

### मोफत बस, आरोग्यसेवा

ममदानी यांनी जो कार्यक्रम जाहीर केला आहे तो सर्व श्रीमंतांना धडकी भरवणारा आहे. अमेरिकेमध्ये शहराच्या महापौरांना जवळपास आपल्या मुख्यमंत्र्यांइतके अधिकार असतात. शहराची पोलिस यंत्रणा त्यांच्या अखत्यारीत येते. शिवाय, ते शहराचा अर्थसंकल्प स्वतः तयार करतात. त्यानुसार ममदानी यांनी सर्व कोट्यधीशांवर सरसकट जादा दोन टक्के प्राप्तिकर बसवण्याचे जाहीर केले आहे. न्यूयॉर्कमध्ये एकीकडे मूठभर दोन-तीन टक्के लोकांकडे ९० टक्के संपत्ती एकवटली आहे. भारतात अंबानी नावाचा उद्योगपती आपल्या मुलाच्या लग्नासाठी पाच हजार कोटी रुपये हसत हसत खर्च करतो. कारण, त्याची लाखो कोटींची संपत्ती दरवर्षी वाढत असते. दुसरीकडे अंबानी राहतो त्याच मुंबईत महिना १० हजार रुपयांवर काम करणारे व त्यातही ३-४ हजार गावाला पाठवणारे कोट्यवधी गरीब लोक राहतात. आपल्या खेड्यांमध्ये अनेक लोक जेमतेम एक वेळचे जेऊ शकतात. अनेकांची मुले परवडत नाही म्हणून शाळा सोडून देतात, वीटभट्टीवर किंवा शेतात कामाला लागतात. न्यूयॉर्कमध्येही हीच स्थिती आहे. तेथेही जवळपास दर ५ लोकांपैकी एक जण भीषण गरिबीत राहतो. रस्त्यावर, फूटपाथवर झोपतो. भीक मागून खातो. नोकरी असेल तरीही त्याला घर, कुटुंब वगैरे परवडू शकत नाही. भारत, पाकिस्तान, बांगलादेश, अरब देश इत्यादी ठिकाणांहून गेलेले अनेक जण तेथे दिवसरात्र टॅक्सी चालवतात. किंवा कष्टांची कामे करतात. यांच्या डोळ्यादेखत तेथील शेअर बाजाराच्या जोरावर लोकांची संपत्ती दर मिनिटाला एकेक लाख अशी वाढत जाते. ममदानी यांनी याच विषमतेवर बोट ठेवले व त्यामुळेच त्यांना जनतेचा प्रतिसाद मिळाला. न्यूयॉर्कमधील घरांची भाडी आपल्या मुंबईप्रमाणेच सामान्यांना परवडू शकत नाहीत. अनेक जण कर्जत, कसारा किंवा पालघरइतक्या लांब राहतात व रोज दोन-दोन तासांचा प्रवास करून न्यूयॉर्कमध्ये नोकरीपुरते येतात. यास्तव न्यूयॉर्कमधील घरांच्या भाड्यांवर अंकुश लावण्याचा ममदानींचा इरादा आहे. न्यूयॉर्कमधील बसप्रवास मोफत करण्याचा त्यांचा संकल्प आहे. याचा दुहेरी हेतू आहे. एक म्हणजे गरिबांना त्याचा फायदा व्हावा व दुसरे म्हणजे रस्त्यावरची मोटारींची वाहतूक कमी व्हावी. श्रीमंतांवर कर लावून या योजनांसाठी पैसा उभा करण्याचा ममदानींचा इरादा आहे. तोच या धनदांडग्यांना खटकतो आहे.

### डाव्यांच्या लढ्यांना उभारी

अमेरिकेमध्ये समाजवादी किंवा कम्युनिस्ट असणे ही एक शिवी आहे. कम्युनिस्ट आहे असे म्हणून कोणाही राजकीय विरोधकाला तिथे संपवता येते. गेल्या ८० वर्षांपासून तेथील नागरिकांचे इतके ब्रेनवॉशिंग केले गेले आहे की, कम्युनिस्ट म्हणजे लोकांना दहशतवादी आणि देशद्रोही वाटतात. ममदानी यांचा विजय म्हणजे या ब्रेनवॉशिंगला दिलेला जबर तडाखा आहे. आपण समाजवादी आहोत असे उघडपणे त्यांनी जाहीर केले व तरुणांसह सर्वांनीच त्यांना जबरदस्त पाठिंबा दिला. ममदानींसारख्या मुस्लिमाला न्यूयॉर्कचे महापौर कसे करणार असा सवाल थेट ट्रम्प यांच्यापासून अनेकांनी उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. वर्ल्ड ट्रेड सेंटरवरच्या हल्ल्यानंतर अमेरिकेतही मुस्लिम विरोध प्रचंड प्रमाणात वाढला आहे. त्या पार्श्वभूमीवर ममदानी यांनी होय मी मुस्लिम आहे असे सांगून खुलेपणाने प्रचार केला. पॅलेस्टिनी लोकांची बाजू घेतली. इस्रायलवर टीका केली. अमेरिकेत बहुतेक सर्व संपत्ती ज्यू लोकांच्या हातात एकवटली आहे. त्यांचा इस्रायलला पाठिंबा असतो. यावर मात करून ममदानी यांनी हे यश संपादन केले आहे. न्यूयॉर्कमध्ये लहान मुलांसाठी मोफत आरोग्यसेवा, गरिबांना अन्न इत्यादी योजना देण्याचा ममदानी यांचा मानस आहे. त्या अमलात आणणे सोपे राहणार नाही. ममदानी अंमलबजावणीत फसले तर लोकांचा मोठा भ्रमनिरास होईल. विरोधकांचे फावेल. ममदानी केवळ ३४ वर्षांचे आहेत. त्यांना कारभाराचा फार अनुभव नाही. त्यातच डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरुद्ध त्यांनी थेट पंगा घेतला आहे. त्यामुळे न्यूयॉर्क शहराला केंद्र सरकारकडून मिळणारी अब्जावधी डॉलर्सची मदत बंद करण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. ट्रम्प हे मूळचे न्यूयॉर्कचेच आहेत. त्यामुळे ममदानी यशस्वी झाले तर आपल्या धंद्याच्या नाड्या आवळल्या जाणार आहेत हे ट्रम्प यांना दिसते आहे. त्यामुळेच ममदानी यांनी हरवण्यासाठी त्यांनी आकाशपाताळ एक केले होते. आता ते अधिक खवळून उठतील. काल आपल्या विजयी मेळाव्यात ममदानी यांनी ट्रम्प तुम्ही माझे भाषण ऐकत असालच. तर थोडा आवाज वाढवा आणि जनतेचे म्हणणे ऐका असे ललकारले. त्यावेळी जमलेल्या हजारो समर्थकांनी प्रचंड गजर केला. एका अर्थी,'आवाज वाढव ट्रम्प तुला न्यूयॉर्कची शपथ आहे', असेच जणू ममदानी म्हणाले. ममदानी यांना यश मिळाले तर जगभरातील ट्रम्प, एर्दोगान किंवा मोदी इत्यादी प्रवृत्तींविरुद्ध लढणाऱ्यांना बळ मिळेल. त्यामुळे ममदानी यांचे अभिनंदन व शुभेच्छा.

विचार

# गंजाची समस्या आणि सरकारी उपाय

*भारताच्या किनारी आणि दमट प्रदेशात एक मोठी समस्या ठरणारे गंज केवळ सामग्रीची ताकद कमी करत नाही, तर दीर्घकालीन देखभाल खर्चदेखील वाढवते. स्टीलऐवजी पॉलिमरिक स्ट्रॅप्स गंजण्यास अत्यंत प्रतिरोधक असतात. त्यामुळे दमट वातावरणात वापरण्यासाठी ते आदर्श बनतात. त्यांच्या उभारणीची यंत्रणा नियंत्रित करणारे 'नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाइपलाइन' एक महत्वाची भूमिका बजावत आहे. त्या निमित्ताने...*



**प्रा. सुखदेव बखळे**

देश अभूतपूर्व वेगाने पायाभूत सुविधांमध्ये वाढ अनुभवत आहे. महामार्गांच्या जलद विस्तारापासून विमानतळ, रेल्वेमार्ग आणि स्मार्ट शहरांच्या विकासापर्यंत वाहतूक आणि शहरी प्रणालींचे आधुनिकीकरण करण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. तथापि, कोणत्याही मोठ्या प्रमाणात विकासाला असंख्य आव्हानांना तोंड द्यावे लागते. भारताचा विविध भूभाग पायाभूत सुविधांच्या विकासात एक मोठा अडथळा आहे. उत्तरेकडील खडकाळ आणि डोंगराळ प्रदेशांपासून दक्षिणेकडील पूरप्रवण मैदानांपर्यंत कंत्राटदारांना विविध वातावरणात माती स्थिर करण्याचे सतत आव्हान असते. भूस्खलनाच्या शक्यता असलेल्या भागात, मातीची धूप भिंती कमकुवत करू शकते आणि धोकादायक कोसळण्यास कारणीभूत ठरू शकते. स्टीलसारख्या पारंपरिक बांधकाम साहित्यात, विशेषतः भारताच्या किनारी आणि दमट प्रदेशात गंज ही एक मोठी समस्या आहे. गंज केवळ सामग्रीची ताकद कमी करत नाही, तर दीर्घकालीन देखभाल खर्चदेखील वाढवते. स्टीलऐवजी पॉलिमरिक स्ट्रॅप्स गंजण्यास अत्यंत प्रतिरोधक असतात. त्यामुळे ते किनारी आणि दमट वातावरणात वापरण्यासाठी आदर्श बनतात. हे स्ट्रॅप्स पॉलिथिलीन किंवा पॉलिस्टरसारख्या सामग्रीपासून बनवले जातात, जे मातीमध्ये आढळणाऱ्या ओलावा किंवा रसायनांमुळे प्रभावित होत नाहीत. हा टिकाऊपणा सुनिश्चित करतो की, अक्षय ऊर्जा आणि सूक्ष्म आणि लघु उद्योग (एमएसई) भिंतींसारखे पायाभूत सुविधा प्रकल्प महागड्या गंज उपचार किंवा बदलीशिवाय दशकांपर्यंत त्यांची संरचनात्मक अखंडता टिकवून ठेवतात. परिणामी, पॉलिमरिक स्ट्रॅप्स दीर्घकाळात अधिक किफायतशीर ठरतात.

प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पात वेळ आणि बजेट मर्यादा हे एक सामान्य आव्हान आहे. कामगारांची कमतरता, साहित्याची उपलब्धता आणि अनपेक्षित जमिनीच्या परिस्थितीमुळे होणारा विलंब खर्च वाढवू शकतो. भारत अनेक सक्रिय टेक्टोनिक प्लेट्सवर वसलेला आहे. म्हणजेच अनेक क्षेत्रांमध्ये भूकंपीय क्रियाकलाप हा एक महत्त्वाचा धोका आहे. भूकंप आणि जमिनीच्या हालचालींमुळे पूल, संरक्षक भिंती आणि तटबंदीसारख्या पायाभूत सुविधा अस्थिर होऊ शकतात. संरचना योग्यरित्या मजबूत न केल्यास आपत्तीजनक नुकसान होऊ शकते. पॉलिमरिक स्ट्रॅप्समध्ये भूकंपाच्या क्रियाकलापांमुळे निर्माण होणारी शक्ती शोषून घेण्याची आणि वितरित करण्याची अद्वितीय क्षमता असते. त्यांची लवचिकता संरचनांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय जमिनीच्या हालचालीदरम्यान किंचित वाकण्याची परवानगी देते. यामुळे ते भूकंपप्रवण भागात विशेष प्रभावी बनतात. पायाभूत सुविधा प्रकल्पांना त्यांचा पर्यावरणीय प्रभाव कमी करण्यासाठी वाढत्या दबावाचा सामना करावा लागत आहे. काँक्रिट आणि स्टीलसारख्या पारंपरिक साहित्यांमध्ये उच्च कार्बन फूटप्रिंट असते आणि प्रकल्पाच्या जीवनचक्राच्या शेवटी त्यांचा पुनर्वापर करणे कठीण होऊ शकते. पॉलिमरिक स्ट्रॅप्स पारंपरिक साहित्याला अधिक शाश्वत पर्याय देतात. त्यांच्या उत्पादनात स्टीलपेक्षा कमी कार्बन फूटप्रिंट आहे आणि प्रकल्पाच्या जीवनचक्राच्या शेवटी त्यांचा पुनर्वापर करणे सोपे आहे.

याव्यतिरिक्त, पॉलिमरिक पट्ट्या अधिक टिकाऊ असल्याने आणि कालांतराने कमी देखभालीची आवश्यकता असल्याने, ते भविष्यातील साहित्य उत्पादन आणि बदलण्याची आवश्यकता कमी करतात. त्यामुळे पर्यावरणीय शाश्वततेत आणखी योगदान मिळते. 'नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाइपलाइन' (एनआयपी) अनेक बाबतीत नियोजन आयोगाच्या पंचवार्षिक योजनेशी साम्य आहे, कारण त्यात देशासाठी पाच वर्षांच्या क्षेत्रनिहाय गुंतवणूक योजनेची रूपरेषादेखील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात 'एनआयपी'ची घोषणा केली होती. 'एनआयपी' तयार करण्यासाठी आर्थिक व्यवहार सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय टास्क फोर्स स्थापन करण्यात आला होता. २०२१ ते २०२५ या आर्थिक वर्षांसाठी टास्क फोर्सचा अंतिम अहवाल २९ एप्रिल २०२० रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी प्रसिद्ध केला. त्यात पाच वर्षांच्या कालावधीत पायाभूत सुविधांमध्ये १११ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. 'एनआयपी'मध्ये समाविष्ट असलेला प्रत्येक प्रकल्प शंभर कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणुकीचा आहे. यामध्ये नवीन आणि विद्यमान दोन्ही प्रकल्पांमधील गुंतवणूक समाविष्ट आहे. 'एनआयपी'चा आढावा घेतल्यास काही क्षेत्रांमध्ये मूळ योजनेतील काही उल्लेखनीय कामगिरी आणि विचलन दिसून येते.

'एनआयपी'मध्ये प्रस्तावित केलेली सुरुवातीची गुंतवणूक आणि डेटा सादर करण्याची आणि अपडेट करण्याची सध्याची पद्धत यांच्यातील संरेखन कठीण आहे. 'एनआयपी'च्या प्रगतीचा मागोवा घेणारे 'इंडिया इन्व्हेस्टमेंट ग्रीड पोर्टल' त्वरित अपडेट होते. त्यात १६८.९३ लाख कोटी गुंतवणूक करण्याचे नियोजन आहे. तथापि, 'उपलब्धी'चे आकडे सुरुवातीला आश्चर्यकारक आहेत. ११ मार्च २०२५ पर्यंत एकूण ३१.१ लाख कोटी रुपये गुंतवले गेले होते, जे सुरुवातीच्या १११ लाख कोटी रुपयांपैकी फक्त २८ टक्के आहे. ६१ टक्के प्रकल्प अजूनही अंमलात आणले जात आहेत. त्याची किंमत ८३.७५ लाख कोटी रुपये आहे. पायाभूत सुविधा प्रकल्पांची संकल्पना, डिझाइन आणि अंमलबजावणी चार वर्षांपेक्षा जास्त काळ घेते. त्यामुळे अपूर्ण प्रकल्प प्रत्यक्ष भांडवली गुंतवणूक म्हणून गणले जाणे योग्य आहे. यामुळे एकूण ११५ लाख कोटी रुपये गुंतवणूक होईल. हे मूळ योजनेच्या १०३ टक्के आहे! हा आकडा केंद्र, राज्य, बिगर-अर्थसंकल्पीय संसाधने आणि खासगी क्षेत्रातील पायाभूत सुविधा गुंतवणुकीसाठीच्या २० लाख कोटींच्या वार्षिक अंदाजाशीदेखील जुळतो. एकूण पायाभूत सुविधा गुंतवणुकीपैकी सार्वजनिक क्षेत्राचा वाटा अंदाजे ८० टक्के आहे. म्हणून खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे होते. हे लक्षात घेऊन, २०२१ च्या सुरुवातीला राष्ट्रीय मुद्रीकरण पाइपलाइन (एनएमपी) लाँच करण्यात आली.

'एनआयपी'सोबत त्याचे एकत्रीकरण सर्व विद्यमान सरकारी मालकीच्या पायाभूत सुविधा मालमत्ता खासगी क्षेत्राला अंशतः किंवा पूर्णपणे विकण्याचे उद्दिष्ट ठेवते. हे काम चार वर्षांमध्ये पार पाडायचे असून सहा लाख कोटी उभारण्याचे उद्दिष्ट आहे. २०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, 'एनएमपी'चे निकाल खूपच उत्साहवर्धक आहेत. सरकारने याद्वारे आतापर्यंत तीन लाख ८६ हजार कोटी उभारले आहेत. त्यात रस्ते, वीज, कोळसा आणि खाण क्षेत्रांचा सर्वाधिक वाटा आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये 'एनएमपी'द्वारे आणखी एक लाख ९१ हजार कोटी रुपये उभारण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. नीती आयोग पायाभूत सुविधांच्या मुद्रीकरणासाठी पंचवार्षिक योजना तयार करत आहे. 'एनएमपी'चे नूतनीकरण करण्यासाठी नवी उद्दिष्टे समाविष्ट केली जाण्याची अपेक्षा आहे. अंदमान बेटांमधील गलाथिया खाडीपासून महाराष्ट्रातील वाढवणपर्यंत प्रमुख बंदरांच्या विकासावर काम सुरू आहे. नवीन आणि प्रमुख विमानतळदेखील वेगाने बांधले जात आहेत. शंभर गीगावॅट अणुऊर्जा क्षमता साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवून अणुऊर्जेमध्ये महत्त्वपूर्ण गुंतवणुकीची तयारी सुरू राहील. महामार्ग, सौर आणि पवन ऊर्जाक्षेत्रात महत्त्वपूर्ण गुंतवणूक सुरूच राहील, तर पंप केलेल्या साठवण प्रकल्पांमध्ये आणि ट्रान्समिशन आणि वितरण नेटवर्कमध्ये नवी गुंतवणूक वेगाने येईल. शिवाय, पुढील 'एनआयपी' आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण, डिजिटल पायाभूत सुविधा आणि शेती यासारख्या सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीवर अधिक भर देण्याची शक्यता आहे. असे असले, तरी पुरेशी तरतूद, गतीने भूसंपादन, कामाची गती आणि दर्जा तसेच भ्रष्टाचारावर नियंत्रण ही आव्हाने कायम आहेत. त्यावर मात करण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांपुढे आहे.

# आजचे राजकारण लोकसेवेचे नव्हे ...

**सुयोग आंग्रे**

महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री, जयप्रकाश नारायण इत्यादींनी भारतीय राजकारणात साधी राहणी, साधेपणा, संयम आणि उच्च विचारसरणीचा प्रसार केला, पण गेल्या दोन-तीन दशकांत भारतीय लोकशाहीचा मूळ उद्देश बाह्य दिखाऊपणा, ग्लॅमर आणि महागड्या प्रसिद्धी व्यवस्थेकडे झुकलेला दिसतो आणि लोकसेवा, उत्तरदायित्व या ऐवजी लोकसेवा मोठेपणा आणि फायद्यासाठीचआहे असा प्रश्न कोणालाही पडावा. कारण पूर्वीचे नेते सामान्य गाड्यांमधून प्रवास करायचे, आज त्यांच्या ताफ्यात ४०-५० महागड्या गाड्या असणे सामान्य आहे. नेत्यांसोबत धावणाऱ्या वाहनांच्या रांगा, कमांडो स्टाईल सुरक्षा आणि समर्थकांमध्ये ताकद दाखवण्याचे वातावरण हेच एका नव्या प्रकारच्या राजकारणाचा संदेश देते. राजकारणात आता विचार, धोरण आणि काम याऐवजी दिखाऊपणाची भाषा होत आहे. हे दृश्य आता सर्वसामान्य झाले आहे, पण त्यात लोकशाहीचा आत्मा दिसून येतो की सत्ता हे प्रदर्शनाचे माध्यम बनलेल्या नव्या राजकारणाचे वैशिष्ट्य आहे? याकडे प्रकर्षाने लक्ष वेधावे वाटते. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स च्या विश्लेषणानुसार, लोकसभेतील ५४३ सदस्यांपैकी २५१ सदस्यांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी १७० (३१ टक्के) विरुद्ध गंभीर गुन्हे दाखल आहेत. विधानसभांचीही परिस्थिती वेगळी नाही. २८ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांतील ४०९२ आमदारांपैकी १८६१ (४५ टक्के) आमदारांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात स्वतः विरुद्ध गुन्हेगारी खटले जाहीर केले आहेत. राजकारणाचे गुन्हेगारीकरण निवडणुकीनंतर संस्थात्मक निवडणुका होत आहे. सध्याच्या लोकसभेत ९३ टक्के सदस्य करोडपती आहेत. हा आकडा २००९ मध्ये ५८ टक्के, २०१४ मध्ये ८२ टक्के आणि २०१९ मध्ये ८८ टक्के होता. २०२४ मध्ये पुन्हा निवडणूक लढवणाऱ्या खासदारांच्या सरासरी मालमत्तेत पाच वर्षांत ४३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हा डेटा दर्शवितो की विजेचा प्रवेश आर्थिक भांडवलाला चालना देतो. गाड्यांच्या ताफ्याची लांबी आणि 'शो-ऑफ'चे बजेट इथून पुढे येते. हा बदल हे नव्या राजकारणाचे वैशिष्ट्य आहे, जिथे नेते राजासारखे दिसतात. लोकशाही राजकारणात गर्दी आणि मिरवणुकांना पारंपरिक स्थान आहे, परंतु आज ते केवळ समर्थन दर्शवत नाही तर वर्चस्व दर्शविताना दिसतात. वाहनांचा लांबचा ताफा नेता 'शक्तिशाली' आहे आणि 'आपल्या लोकांचे' 'संरक्षण' करू शकतो याची 'आश्वासन' देतो. या मनसशास्त्रामुळे निवडणुकीपूर्वीची भीती आणि समर्पणाची भावना निर्माण होते. ड्रोन शॉट्स आणि इंटरनेट मीडियाच्या रील्सने हे आणखी वाढवले आहे. जितका मोठा आणि सिनेमॅटिक काफिला दिसतो, तितका मोठा नेता मानला जातो. मोठा काफिला, भव्य टप्पे, चोवीस तास ब्रँडिंग, एआय-चालित व्हिडिओ आणि डिजिटल जाहिराती हे आता राजकारणाचे मध्यवर्ती स्तंभ बनले आहेत. तिकीट वाटप, उमेदवारी, धोरण ठरवणे आणि मतदारांवरही त्याचा परिणाम होतो. या चौकटीतून, गुन्हेगारी आणि पैशाची शक्ती यांचा संबंध लोकशाहीत नवीन सामान्य होत चालला आहे. सेंटर फॉर मीडिया स्टडीजने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाचा अंदाज वर्तवला आहे. त्यानंतर सुमारे ९,००० कोटी रुपयांची रोकड, दारू, ड्रग्ज, मौल्यवान धातू आणि 'फुकट' जप्त करण्यात आले. हा आकडा प्रचार युद्धाच्या शिखराची व्याख्या करतो आणि हे देखील सूचित करतो की भारतातील निवडणूक प्रक्रिया जगातील सर्वात महागड्या लोकशाही व्यायामांपैकी एक बनली आहे. खऱ्या अर्थाने निवडणूक वित्तपुरवठा आणि गुन्हेगारी नेटवर्क यांच्या संगनमताची ही साक्ष आहे. जेव्हा निवडणूक देणग्या धोरणनिर्मितीवर प्रभाव पाडतात, तेव्हा सार्वजनिक हित निश्चितपणे 'गुंतवणुकीवर परतावा' घेईल. नियमांची काटेकोर अंमलबजावणी करून ही रचना बदलावी लागेल. राजकारणात गांधी, शास्त्री, पटेल यांच्यासारखे आदर्श बहाल करायचे आहेत. तिकीट वाटप करताना पक्षांनी ग्लॅमर न देता गुणवत्ता, चारित्र्य आणि सेवा यांना प्राधान्य द्यावे. गुन्हेगारी नेटवर्क आणि मनी पॉवर हे तिकीट वाटपाचा आधार बनतील तेव्हा प्रामाणिक कामगार निराश होतील. प्रसारमाध्यमांनाही आपली जबाबदारी समजून घेऊन तपास आणि तथ्यात्मक पत्रकारितेला प्रोत्साहन द्यावे लागेल. लोकशाहीचा आत्मा वाचवायचा असेल तर जनतेचा दृष्टिकोनही बदलावा लागेल. भारताची लोकशाही हे जगातील सर्वात मोठे नागरिक-सहभागाचे व्यासपीठ आहे. जेव्हा धोरण, स्पर्धा, शाळा, रुग्णालये, रोजगार, स्थानिक पायाभूत सुविधा केंद्रस्थानी असतात तेव्हाच या व्यासपीठाचा अर्थ होतो. साधेपणा ही शोभेची वस्तू नसून तो भारतीय राजकारणाचा आत्मा आहे. ते सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी पक्ष, संस्था आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मतदारांची आहे.

## लोकसंसद

### तंत्रज्ञान नव्हे, तंत्रज्ञ हवेत

मुंबई महापालिकेने अलीकडेच सर्व रुग्णालयांना स्पष्ट आदेश दिला आहे ''ईसीजी तपासणी केवळ प्रशिक्षित तंत्रज्ञांनीच करावी.'' हा आदेश कागदावरचा औपचारिक निर्णय वाटू शकतो, पण यामागे गंभीर वास्तव आहे. गोवंडीच्या शताब्दी रुग्णालयात वॉर्डबॉय आणि सफाई कामगारांकडून ईसीजी काढले जात असल्याचे उघड झाल्यानंतर मानवाधिकार आयोगालाही हस्तक्षेप करावा लागला. ईसीजी ही अत्यंत तांत्रिक प्रक्रिया आहे. इलेक्ट्रोडचे योग्य स्थान, मशीनचे सेटिंग्ज आणि परिणामांचे तांत्रिक ज्ञान आवश्यक असते. त्यात किंचित चूक झाली तरी निदान चुकीचे ठरू शकते. महापालिकेच्या रुग्णालयांत तंत्रज्ञांची कमतरता असल्याने ही जबाबदारी परिचारिका किंवा वॉर्डबॉयवर टाकली जात होती, हेच खरे कारण आहे. आता तरी ही त्रुटी लक्षात घेऊन सर्व रुग्णालयांत प्रशिक्षित तंत्रज्ञांची पदे तातडीने भरली जावीत, तसेच अल्पकालीन प्रशिक्षण योजना सुरू करून आवश्यक मनुष्यबळ तयार केले जावे. रुग्णसेवेचा पाया केवळ औषधोपचारात नसून अचूक निदानात आहे. तेच सुरक्षिततेचे पहिले पाऊल ठरते.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी**

### भारतात तुलनेने सर्वात स्वस्त इंटरनेट

जगभरातील अब्जावधी लोकांच्या दैनंदिन जीवनाचा इंटरनेट हा एक अत्यावश्यक भाग बनला असून ऑक्टोबर २०२५ पर्यंत जगातील ६.०४ अब्ज लोक (जगाच्या लोकसंख्येपैकी सुमारे ७३.२ टक्के) इंटरनेट वापरत आहेत. गेल्या वर्षभरात २९.४ कोटी नवीन इंटरनेट वापरकर्ते जोडले गेल्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत जगातील इंटरनेट वापरकर्त्यांच्या संख्येत ५.१ टक्के वाढ झाली आहे. यावरून इंटरनेटचा वापर किती वेगाने वाढत आहे आणि एकूणच जगाची वाटचाल डिजिटलायझेशनकडे किती वेगाने होत आहे हे प्रकर्षाने जाणवत आहे. आजच्या डिजिटल जगात काम, शिक्षण, संशोधन, मनोरंजन, बँकिंग, ऑनलाइन शॉपिंग, संवाद अशा जीवनातील सर्वच क्षेत्रांसाठी इंटरनेट आवश्यक बनले आहे. पायाभूत सुविधांचा विकास, आर्थिक परिस्थिती आणि भौगोलिक स्थान यासारख्या घटकांमुळे जगातील अनेक देशांमध्ये इंटरनेटच्या किंमती कमीजास्त असून युक्रेन, इराण, रशिया, भारत आणि इतर काही देशांमध्ये इतर विकसित देशांच्या तुलनेत इंटरनेटचा मासिक खर्च खूप कमी आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा इंटरनेट वापरणारा देश असून देशात सध्या ८० कोटींहून अधिक इंटरनेट कनेक्शन आहेत.

**–प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा महामंत्र : वंदे मातरम्'- प्रा.महेश बिऱ्हाडे

आज दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ आजपासून बरोबर १५० वर्षांपूर्वी एक गीत जन्माला आले ज्यांनी वंदे मातरम् हे गीत लिहून त्याद्वारे भारतीयांच्या मनामध्ये क्रांतीज्योत पेटवली ते बंकिमचंद्र चटर्जी. त्यांचा जन्म कंतालपाडा या गावी २६ जून १८३८ मध्ये झाला. वंदे मातरम गीताची जन्म कहाणी मोठी रोचक आहे या गीताचे गीतकार श्री बंकिमचन्द्र चटर्जी किवा चटोपाध्याय यांनीच ते सांगितले आहे की १८७५मध्ये पूर्ण झालेल्या वंदे मातरम या गीतातील वंदे मातरम या शब्दांचा सबंध त्यावेळी निर्सगाने धारण केलेल्या रौद्र रूपाशी होता . कार्तिक शुद्ध नवमीच्या दिवशी बंकिमचंद्र यांना रत्नजडित सिंहासनावर विराजमान झालेल्या भारत मातेचे उत्कट आणि विलोभनीय दर्शन झालं आणि त्याच क्षणी त्यांच्या तोंडून उत्स्फूर्त उद्गार बाहेर पडले 'वंदे मातरम' बंकिमचंद्रांनी या लेखरूपी रोपातून उमललेल्या अतीश्श सुंदर अशा पुष्पाला जन्म दिला, ते पुष्प होते 'वंदे मातरम'

वंदे मातरम् या शब्दाचा अर्थ.. आईला केलेला नमस्कार ,हे माते तुला वंदन असो . १८७५ मध्ये संस्कृतमय बंगाली भाषेत बंकिमचंद्र यांनी वंदे मातरम् हे एकूण सहा कडवी असलेलं गीत लिहिलं. यातील पहिल्या दोन कडव्यांमध्ये देशाला मातृभूमी म्हणत तिच्या सृष्टीसौंदर्याचे वर्णन केले आहे. भारतीयांना भारताकडे भारतभूमीकडे माता म्हणून पाहण्याची दृष्टी बंकिमचंद्र यांनी दिली. ते नमस्काराऐवजी 'वंदे मातरम'चाच उच्चार करू लागले. १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता येथील अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी ते प्रथम गायले. १९०५ साली टागोर यांची पुतणी सरलादेवी यांनी बनारस येथील अधिवेशनात हे गीत पुन्हा म्हटले. २० जुलै १९०५ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड कर्झनने लोकमताचा विचार न करता बंगालची फाळणी केली. वरून दिसायला ही राज्य कारभाराची सोय असली तरी बंगालच्या एकात्मतेला सुरुंग लावून फोडा आणि झोडा या नीतीप्रमाणे हिंदू मुसलमानांत वैमनस्य निर्माण करण्याचे ते कुटिल कारस्थान होते. खरं तर २० जुलै १९०५ हा दिवस भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे. दिनांक २० ऑगस्ट १९०५ या दिवशी भरलेल्या सभेत कोणीतरी घोषणा केली वंदे मातरम आणि याचे अनुकरण संपूर्ण सभागृहाने केले. बंकिमचंद्र यांनी लिहिलेले वंदे मातरम् हे गीत राष्ट्रगीत म्हणून लोक रस्त्याने गाऊ लागले. हे गीत गाण्याच्या आरोपाखाली फटक्यांसारख्या अमानुष शिक्षा लोकांना होऊ लागल्या. जसजसा ''वंदे मातरम'' चा प्रचार वाढू लागला तसतशी इंग्रजांची क्रूरताही वाढू लागली. वंदे मातरम् चा उच्चार करणं म्हणजे राजद्रोह आहे, अशी घोषणा करून इंग्रज सरकारने साऱ्या देशभक्तांवरती अनन्वित अत्याचार केले.

१९०६ मध्ये हिंदू वृत्तपत्रसृष्टीत अमर ठरलेले 'वंदे मातरम' हे वृत्तपत्र निघाले. त्याची मुख्य जबाबदारी अरविंद घोष यांच्यावर होती. हे वृत्तपत्र क्रांतिकारक विचारप्रणालीचा पुरस्कार करणारं होतं म्हणून या वृत्तपत्राविरुध्द ब्रिटिशांनी राजद्रोहाचा खटला सुरू केला. या खटल्याचं काम सुरू असताना नेहमीप्रमाणे न्यायालयाबाहेर हजारो युवक उभे होते. सर्वजण शांत होते, परंतु वाढती गर्दी पाहून एक इंग्रज अधिकारी संतापला आणि त्याने एका युवकाला आपल्या दंडुक्याने बेदम मारायला सुरुवात केली. आता मात्र त्या युवकाने तोंडाने वंदे मातरमचा जप सुरू केला. त्यामुळे तो अधिकारी अधिकच जोराने त्या युवकावर दंडुक्याचे प्रहार करू लागला. गर्दीमधील सुशीलकुमार सेन हे दृश्य पाहून संतप्त झाला आणि त्यांनी त्या अधिकाऱ्याच्या नाकावर जोरदार ठोसा लगावला 'वंदे मातरम' चा जयघोष इतका तीव्र झाला की ब्रिटिशांना बंगालची फाळणी रद्द करावी लागली. वंदे मातरमचा जयघोष करत भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, खुदीराम बोस असे कितीतरी क्रांतिकारक फासावरती गेले. १९३७ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसने वंदे मातरम् गीताचे पहिले दोन श्लोक राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले. २४ जानेवारी १९५० मध्ये भारतीय संविधान सभेने वंदे मातरम् हे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले. ग,दि,माडगूळकर यांनी असे म्हटले आहे की ''वेद मंत्राहुनी वंद्य वंदे मातरम'' ह्या अजरामर झालेल्या वंदे मातरम् गीताच्या जनक असलेल्या बंकिमचंद्र चटर्जींना माझा त्रिवार मुजरा..... वंदे मातरम

# रेशनदुकानदारांवर उपासमारीची वेळ

## ● पाच महिन्यांपासूनचे कमिशन रखडल्याने आर्थिक कोंडी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**रत्नागिरी जिल्ह्यातील रेशनदुकानदारांकडून अंत्योदय, प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना धान्य दिले जाते. मात्र राज्यासह जिल्ह्यातील रेशन दुकानदारांना मागील पाच महिन्यापासूनचे कमिशन अद्याप मिळालेले नाही. दिवाळी सण होऊनसुद्धा त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. यामुळे उपासमारीची वेळ आली असून रेशनदुकानदार अद्याप कमिशनच्या प्रतीक्षेत आहेत.**



रेशनदुकानदारांना १०० किलो धान्य विक्रीवर १५० रुपये कमिशन मिळत होते. दरम्यान, २० ऑगस्टपासून हा दर वाढवून १७० रुपये प्रतिक्विंटल करण्यात आला आहे. त्यामुळे सुरळीत कमिशन मिळत असताना जून महिन्यापासून रेशन दुकानदारांना कमिशन मिळाले नसून रखडले आहे. ऐन सणासुदीत कमिशन येईल या प्रतीक्षत दुकानदार होते. मात्र कमिशन अद्याप न मिळाल्यामुळे दुकानदार आर्थिक कोंडीत अडकला आहे. वारंवार जिल्हापुरवठा अधिकाऱ्यांना विचारून, मागणी करूनही अद्याप कमिशन मिळत नसल्यामुळे रेशनदुकानदारांनी संताप व्यक्त केला आहे. शासनाने लवकरात लवकर रेशनदुकानातील कमिशन द्यावे अशीच मागणी दुकानदार करीत आहेत.

> रत्नागिरी जिल्ह्यातील रेशनदुकानदारांना जून महिन्याचे कमिशन देण्यास सुरुवात झाली आहे. जुलै, ऑगस्ट महिन्याचे कमिशन शासनाकडून अद्याप जमा झाले नाही. जिल्हापुरवठा विभागाकडून सर्व माहिती शासनास पाठवली आहे.
> –रोहिणी रजपूत, जिल्हा पुरवठा अधिकारी, रत्नागिरी

> रत्नागिरी जिल्ह्यातील रेशनदुकानदारांना चार महिन्याचे कमिशन अद्याप मिळालेले नाही. जून महिन्याचे कमिशन देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने सांगण्यात आले आहे. लवकरात लवकर रेशन दुकानदारांचे कमिशन मिळावे, यासाठी पाठपुरावा सुरू आहे.
> –अशोक कदम, अध्यक्ष, रेशन दुकानदार संघटना, रत्नागिरी

रत्नागिरी जिल्ह्यात एकूण ९५२ रेशन दुकान आहेत. त्यापैकी ८४२ रेशनदुकान सध्या सुरू आहेत. रेशनदुकानदारांना जून-जुलै ते ऑक्टोबर या काळातले कमिशन मिळालेले नाही. यात रत्नागिरी जिल्ह्यातील ९५२ दुकानदारांचा समावेश आहे. रेशन दुकानदारांचा उदरनिर्वाह संपूर्णतः या कमिशनवर अवलंबून असल्यामुळे त्यांच्यात असंतोषाचे वातावरण तयार झाले आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

७ नोव्हेंबर

१) श्री.वसंत अनंत साळवी
मारूती-नाका, अलिबाग,
७-११-१९४५

२)श्री.जयप्रकाश शांताराम वेदक
बाजारपेठ, अलिबाग
७-११-१९४१

३)श्रीम.मनोरमा रमाकांत शिंदे
शितोळेआळी, अलिबाग
७-११-१९४५

## मंगळसूत्र चोरणाऱ्याला न्यायालयीन कोठडी

**सिंधुदुर्ग :** वेंगुर्ला शहरातील विनायक रेसिडेन्सी येथील एका महिलेचे मंगळसूत्र १ नोव्हेंबर रोजी चोरीस गेले होते. दरम्यान वेंगुर्ला पोलिसांच्या पथकाने संबंधित संशयितास गुरुवारी (दि.६) सकाळी ८.१५ वाजता सातारा येथून ताब्यात घेतले. त्याला आज वेंगुर्ला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालल्याने त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. संतोष वसंत माळकर (वय ४३, रा. शिर्डी) असे संबंधित संशयिताचे नाव आहे. विनायक रेसिडेन्सी येथील रहिवासी प्रतिमा प्रकाश जाधव यांनी वेंगुर्ला पोलिसांत मंगळसूत्र चोरीची फिर्याद दिली होती. त्यानुसार अज्ञाताविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार केवळ ४ दिवसांत वेंगुर्ला पोलीस निरीक्षक निसर्ग ओतारी यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय योगेश राठोड, पोलीस हवालदार जयेश सरमळकर, वाहतूक पोलीस अंमलदार मनोज परुळेकर आदीच्या पथकाने संशयितास ताब्यात घेऊन गुरूवारी न्यायालयात हजर केले. याप्रकरणी पोलीस हवालदार भगवान चव्हाण व महिला पोलीस हवालदार दिपा मठकर पुढील तपास करीत आहेत.

## वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

ईश्वर भरडे हे शेतातील कापसाच्या पिकाची पाहणी करण्यासाठी गेले होते. मात्र सायंकाळी ६ वाजेपर्यंत ते घरी परतले नाहीत. यानंतर नातेवाईक आणि गावकऱ्यांनी शेतावर जाऊ पाहणी केला असता तिथे रक्ताचे डाग आणि फाटलेले कपडे आढळले. तिथून थोड्याच अंतरावर भरडे यांचा मृतदेह आढळला. त्यांच्या शरीरावर वाघाच्या नखांच्या खोल जखमा होत्या आणि हाताचा एक भागही वाघाने खाल्ला होता.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी वाघ पकडण्यासाठी तातडीने उपाय योजना करण्याची मागणी केली. गावकऱ्यांनी ईश्वर भरडे यांचा मृतदेह उलचून आणून शंकरपूर भिसी रस्त्यावरील आंबोली गावाजवळ रस्त्याच्या मधोमध ट्रॅक्टवर ठेवला. जोपर्यंत वाघाला ठार मारण्यात येत नाही तोपर्यंत मृतदेहाचे शवविच्छेदन होऊ देणार नाही, अशी संतप्त भूमिका नागरिकांनी घेतली. यामुळे वातावरण चांगलेच तापले असून प्रशासनाकडून गावकऱ्यांची समजूत काढली जात होती.

## कृषी तंत्रज्ञानातील देवाणघेवाण वाढणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



मॉरिशसचे मंत्री आणि शिष्टमंडळाने महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील नवकल्पना, संशोधन आणि उत्पादनक्षमतेच्या धोरणांचे कौतुक केले. दोन्ही राज्यामध्ये राबविण्यात येणारे कृषी विषयक तंत्रज्ञानाचीही देवणाघेवाण करण्याबाबत मॉरिशसचे कृषी मंत्री डॉ. अरविन बुलेल आणि शिष्टमंडळाने मंत्रालयात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासोबत यांनी सविस्तर चर्चा केली. या बैठकीत राज्यातील कृषी विकासाचा सविस्तर आढावा कृषीमंत्री यांनी यावेळी सादर केला.

दोन्ही देशांमध्ये ऊस उत्पादन, साखर उद्योग, जैवऊर्जा, इथेनॉल उत्पादन, आणि सेंद्रिय शेती क्षेत्रात सहकार्य आणि ज्ञान देवाणघेवाण वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीदरम्यान दोन्ही देशांमधील कृषी संशोधन, हवामान बदलाशी सुसंगत तंत्रज्ञानाचा वापर आणि कृषी निर्यात वाढविण्यासाठी सामंजस्य करार करण्याबाबतही चर्चा झाली. यावेळी नैसर्गिक शेती, हवामान-समर्थ शेती, इथेनॉल उत्पादन, कृषी यांत्रिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांविषयी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली.

या बैठकीत महाराष्ट्र आणि मॉरिशस यांच्यात भविष्यात संयुक्त कृषी प्रकल्प राबविण्याबाबत प्राथमिक सहमती झाली.



## भात कापणीसाठी शेतकऱ्यांची लगबग

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

पावस पंचक्रोशीत गेले दोन दिवस पावसाने पूर्ण विश्रांती घेतल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मुसळधार पावसामुळे पंचक्रोशीतील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, पंचनामे सुरू आहेत. दोन दिवस पावसाने विश्रांती घेतल्याने जमीनदोस्त झालेली शेतीची कापणी करण्यास सुरुवात केली असून, नाचणी पीक वेचण्यास सुरुवात झाली आहे. अरबी समुद्रातील वादळी स्थितीमुळे पंधरा दिवस पावस पंचक्रोशीत पावसाने धुमाकूळ घातला. त्यामुळे तयार भातपिकाचे प्रचंड नुकसान झाले. त्यातही सकाळच्या टप्प्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी भातकापणी सुरू केली होती; परंतु कापलेले भात सुकवण्यातही अडचणी आल्याने नुकसान झालेच. मात्र दोन दिवस पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकरी उर्वरित भिजून गेलेली भातशेती वाळवून उर्वरित पीक घरी नेण्यासाठी धडपड करत आहेत. भातशेतीसह अनेक ठिकाणी नाचणीचे पीकही आडवे झाले होते. हे पीकही वेचण्यास शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे.

# तीन दिवस कल्याण-शीळ मार्ग बंद

## ● निळजे रेल्वे उड्डाणपुलाची करणार पुनर्बांधणी

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर दरम्यान डबल डेकर कंटेनरची माल वाहतूक सुलभपणे व्हावी यासाठी सध्याचा निळजे रेल्वे उड्डाणपूल जमीनदोस्त करून तेथे नवा प्रशस्त पूल रेल्वेच्या वतीने उभारण्यात येणार आहे. या कामाकरिता शुक्रवार दि.७ नोव्हेंबरपासून तीन दिवस कल्याण-शीळ मार्ग बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येथील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली असली तरी वाहतूककोंडी होण्याची शक्यता आहे.



रेल्वे प्रशासनाच्या डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर प्रकल्पाचे काम टाटा प्रोजेक्ट लिमिटेड कंपनीमार्फत सुरू करण्यात आले आहे. कल्याण-शीळ महामार्गावरील लोढा पलावा एक्सपेरिया मॉलजवळ कल्याणहून शीळफाट्याकडे जाणाऱ्या वाहिनीवर ते सुरू आहे. निळजे येथील रेल्वे मार्गावर असलेल्या उड्डाणपुलाची उंची कमी असल्याने तो तोडून त्याची पुनर्बांधणी केली जाणार आहे. या कामासाठी तीन दिवसांचा कालावधी लागणार असून ७ नोव्हेंबरला मध्यरात्री १२ वाजल्यापासून ते ९ नोव्हेंबर रात्री १२ वाजेपर्यंत हे काम करण्यात येणार आहे. या कामासाठी कल्याण-शीळ महामार्गावरील वाहतुकीत तात्पुरत्या स्वरूपात बदल करण्यात आला आहे. कल्याणहून शीळफाट्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना कल्याण-शीळ रोड, निळजे कमानीजवळ प्रवेश बंद करण्यात आला आहे. ही वाहने निळजे कमानजवळून उजवीकडे वळण घेऊन लोढा पलावाकडून कल्याणकडे येणाऱ्या वाहिनीवरून महालक्ष्मी हॉटेलपर्यंत जाऊन पुढील प्रवास करतील. तर लोढा पलावा, कासाबेला, लोढा हेवन, एक्सपिरिया मॉलकडून कल्याणकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना निळजे पूल चढणीजवळ प्रवेश बंद आहे. ही वाहने देसाई खाडी पुलावरून सरस्वती टेक्सटाईल समोरून उजवीकडून वळण घेऊन नवीन पलावा उड्डाणपुलावरून जातील.

## मुंबई एपीएमसीला फेरीवाल्यांचा विळखा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) परिसरात दिवसेंदिवस अतिक्रमणाचा विळखा घट्ट होत आहे. तर भाजीपाला, फळ, धान्य आणि मसाला बाजारांच्या वेशीवर अनधिकृत फेरीवाले मोठ्या प्रमाणात बसू लागल्यामुळे नियमित व्यापाऱ्यांसह वाहनधारकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.



मुंबई एपीएमसी येथे दररोज हजारो शेतकरी, व्यापारी आणि ग्राहक येथे व्यवहार करतात. मात्र गेल्या काही महिन्यांपासून रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना आणि बाजार प्रवेशद्वारांवर अनधिकृत फेरीवाल्यांची गर्दी वाढली आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत ही गर्दी सुरू असल्याने या परिसरात वाहतूक कोंडी आणि अस्वच्छतेची समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहे. स्थानिक व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनाने अनेक वेळा कारवाई केल्याचे सांगितले जाते; परंतु ती केवळ दिखाऊ असते. काही तासांतच हे फेरीवाले पुन्हा त्याच ठिकाणी येऊन बसतात. अनेकदा हे फेरीवाले आपला उरलेला माल रस्त्याच्या कडेला फेकून देत असल्याने एपीएमसी परिसरात अस्वच्छतेमुळे दुर्गंधी वाढून स्थानिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

## तीन कोटींचा हुक्का जप्त

**मुंबई :** परदेशातून आयात केलेला तीन कोटी रुपयांचा हुक्काचा मोठा साठा मुंबई गुन्हे शाखेने जप्त केला. उमरखाडी येथील आनंदराव सुर्वे मार्गावरील एका गोदामात शासनाने बंदी घातलेला निकोटीनयुक्त व वैधानिक इशारा नसलेला विविध फ्लेवर्सचा हुक्काचा साठा करून ठेवण्यात आला असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार युनीट-१च्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला असता कोट्यवधी किंमतीचा हुक्काचा साठा जप्त केला. अलबखर पंपनीचा विविध फ्लेवर्सचा हुक्का परदेशातून आयात करण्यात आला होता.

## हमरापूर येथे अवजड वाहनांची झडती

**। पालघर । प्रतिनिधी ।**

मनोर-वाडा महामार्गावर पाली व करळगाव असे दोन नद्यांवरील पुल कमकुवत झाले आहे. त्यामुळे अवजड वाहनांना या महामार्गावर मज्जाव करण्यात आला होता. बंदी झुगारून या पुलांवरून राजरोस अती अवजड वाहतूक सुरूच असून हमरापूर फाट्यावर वाहनांची झाडाझडती सुरू असल्याचे बुधवारी पाहायला मिळाले. अती अवजड वाहनांवर कारवाई करण्यात आली की कारवाईच्या नावे केवळ दिखावा करण्यात आला याबाबत अनेकांनी शंका उपस्थित केली आहे.

पाली गावाजवळ पिंजाळ व करळगाव जवळ देहर्जे नदीवरील पूल जुने व कमकुवत झाले असून नुकताच या पुलांची तपासणी व दुरुस्ती करण्यात आली होती. अवजड वाहतुकीसाठी या मार्गावर ३४ टनांहून अधिक क्षमतेच्या वाहनांसाठी बंदी आहे. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या बंदीला कुणीही जुमानत नसल्याचे पहायला मिळत आहे. वाडा परिसरातील देसई, कंचाड, खरिवली अशा विविध भागातून अत्यंत अवजड हायवा ट्रक दिवसरात्र ये-जा करतात असे लोकांचे म्हणणे आहे.

**सार्वजनिक आरोग्य विभागाचा महत्वपूर्ण निर्णय** | **६० कोटी रुपयांच्या प्रस्तावासही मान्यता**

# राज्यात उभारणार विषाणूशास्त्र संस्था

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नव्याने उत्पन्न होणाऱ्या विषाणूजन्य आजारांचे मोठे आव्हान जगासमोर उभे राहिले आहे. देकोव्हिड, कांजण्या, जीबीए विषाणू अशा विविध प्रकारच्या विविध विषाणूंचे भविष्यातील आव्हान लक्षात घेऊन नॅशनल इस्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजीच्या (एनआयव्ही) धर्तीवर राज्यात महाराष्ट्र विषाणू शास्त्र संस्था (एमआयव्ही) स्थापन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतली आहे. या संस्थेसाठी ६० कोटी रुपयांच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली आहे.



विषाणूजन्य आजारांवरील संशोधनासाठी भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदे अंतर्गत कार्यरत असणारी नॅशनल इस्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी ही संस्था पुण्यात आहे. १९५२मध्ये या संस्थेची स्थापना विषाणू संशोधन केंद्र म्हणून झाली आहे. विषाणूजन्य रोग व सांसर्गिक आजारांच्या संशोधन करून त्यावर प्रतिबंध व नियंत्रणासाठी काम करते. मात्र या संस्थेवर असलेल्या ताणाचा विचार करून राज्यात अशी संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

कोविडच्या काळात तर प्रचंड ताण पडला होता. विषाणूचे कोणतेही नमुने तपासणीसाठी पाठवल्यावर अनेकदा विलंब होते. त्यामुळे उपचार आणि प्रतिबंध करण्यास विलंब होतो. त्यामुळे पुण्यातील राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेच्या उपसंचालकांनी एनआयव्हीच्या धर्तीवर राज्यात एमआयव्ही स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाला सार्वजनिक आरोग्य विभागाने मान्यता दिली असून जागा, आवश्यक यंत्रसामुग्री व मनुष्यबळासाठी ६० कोटी रुपयांच्या रक्कमेच्या प्रस्तावाला राज्य सरकारने मान्यता दिली आहे.

त्यानुसार एमआयव्ही हा प्रकल्प संपूर्णपणे टर्न की पध्दतीने चालवण्यात येणार आहे. मात्र सेवा व वस्तू पुरवणाऱ्या कंत्राटदारामार्फत हा प्रकल्प चालवण्यात येणार आहे. मुख्य म्हणजे या संस्थेत सर्व उपकरणे आंतरराष्ट्रीय दर्जा व मानके असलेली वापरण्यात येणार आहेत. अनेकदा प्रकल्पांसाठी उपकरणे विकत घेतली जातात किंवा आयात केली जातात. पण प्रत्यक्षात प्रकल्प पूर्ण होऊन कार्यान्वित होण्यासाठी विलंब लागतो. त्यामुळे महागडी उपकरणे नादुरुस्त होण्याची शक्यता असते. त्यामुळे या प्रकल्पासाठी अत्यावश्यक असलेल्या बीएसएल-तीन (व्हायरॉलॉजी व बॅक्टिरयालॉजी) पायाभूत सुविधा व प्रयोगांसाठी आवश्यक यंत्रणा सुविधा निर्माण केल्यावरच उपकरणे खरेदी करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य विभागाने जारी केल्या आहेत. या प्रकल्पासाठी उपकरणे यंत्रे व इतर साहित्य सामुग्रीची खरेदी ही मुंबईतल्या आरोग्य भवनातील महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरणाकडून खरेदी करण्याच्या सूचनाही जारी करण्यात आल्या आहे.

## निवडक

### ठाण्यातील रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा

**ठाणे :** ठाण्यात केवळ पाच दिवस पुरेल इतकाच रक्ताचा साठा असल्याचे समोर आले आहे. दिवाळीत रक्तदाते सुट्टीवर असल्याने रक्तदान मोहीम थंडावली आहे. त्याचा फटका सरकारी रक्तपेढ्यांना बसला आहे. जिल्हा रुग्णालय, उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय, छत्रपती शिवाजी महाराज कळवा रुग्णालय, कल्याण-डोंबिवली महापालिका, नवी मुंबई पालिका आणि मीरा-भाईंदर महापालिका या सहा ठिकाणी सरकारी रक्तपेढ्या आहेत. मात्र सहा सरकारी रक्तपेढ्यांमधील साठा कमी झाला आहे. यामुळे आरोग्य यंत्रणेवर ताण येऊ लागला आहे. या रक्तपेढ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात साठा कमी झाल्याने अपघातग्रस्त, कॅन्सरग्रस्त, गर्भवती माता आणि डायलिसिस रुग्णांची फरफट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने चिंता व्यक्त केली आहे. रुग्णांच्या शस्त्रक्रिया, अपघात, महिलांना प्रसूतीवेळी रक्ताचा पुरवठा रुग्णालयांना करावा लागतो. सध्या जिल्ह्यातील रुग्णालये विविध साथीच्या आजारांनी फुल्ल झाली आहेत. त्यातच अनेक रुग्णांना रक्ताची गरज भासू लागल्याने रक्त मिळवण्यासाठी नातेवाईकांना जिल्ह्याबाहेर वणवण भटकावे लागत आहे. इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी, महाविद्यालयीन तरुणींनी रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि गरजू रुग्णांना मदत करावी व रक्तदान करून या सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.





### मोनोरेलची सेवा बंद करा

**शिवसेना, मनसेची आग्रही मागणी**

**मुंबई :** वडाळा डेपो परिसरात मोनोरेलच्या गाडीला अपघात झाल्यानंतर शिवसेना आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक बनलेल्या मोनोरेलची सेवा बंद करा आणि या मार्गावर बेस्टची सुरक्षित बससेवा सुरू करा, अशी आग्रही मागणी शिवसेना आणि मनसेतर्फे करण्यात आली. मोनोरेल मार्गिकेखालील रस्त्यावरून प्रतीक्षानगर, चुनाभट्टी, वडाळा, चेंबूरला ये-जा करणाऱ्या वाहनांची वर्दळ सुरू असते. त्या वाहनांमधून प्रवास करणारे प्रवासी, स्थानिक नागरिक आणि मोनोरेलचे प्रवासी या सर्वांना मोनोरेलच्या सदोष सेवेचा धोका संभावत आहे. त्याकडे शिवसेना आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी लक्ष वेधले. याच पार्श्वभूमीवर अपघाताबाबत प्रशासनाला जाब विचारण्यासाठी शिवसेनेच्या महिला विभागप्रमुख पद्मावती शिंदे, विभाग संघटक गजानन पाटील, उपविभागप्रमुख प्रभाकर भोगले, वाहतूक सेनेचे विशाल आमकर, युवती शाखा अधिकारी किंजल कोळी, युवासेना उपविभाग अधिकारी सिद्धेश कवटकर, उपशाखाप्रमुख गणेश शिंदे, मनसेचे विभाग अध्यक्ष संजय भोगले, शाखा अध्यक्ष लवू नर यांच्यासह दोन्ही पक्षांचे इतर कार्यकर्ते जमा झाले होते.



### विद्यार्थ्यांनीच केली पेरणी अन् कापणी

**ठाणे :** शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना पर्यावरण आणि शेतीचे ज्ञान मिळावे यासाठी नौपाडा येथील सरस्वती मंदिर ट्रस्टच्या शाळेने अनंताश्रम ट्रस्ट आणि शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाखाली पेरणी ते कापणी हा उपक्रम सलग दुसऱ्या वर्षी राबवला. पावसाळ्याच्या सुरुवातीला या विद्यार्थ्यांनी केलेल्या पेरणीनंतर डोलणारी भात पिके कापणीचा अनुभवही विद्यार्थ्यांनी घेतला. पर्यावरण आणि शेतीचा अनोखा अनुभव घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर स्वतः कष्ट करून पेरणी केलेला भात कापताना आनंद ओसंडून वाहत होता. येऊर येथील पाटोणपाडा येथे ५ नोव्हेंबर रोजी सरस्वती शाळेने कापणीचा उपक्रम आयोजित केला होता. यावेळी कार्यकारी विश्वस्त सुरेंद्र दिघे, माजी विद्यार्थी रोहित जोशी, अनंताश्रम ट्रस्टचे कार्यकर्ते आणि स्थानिक शेतकरी आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. भाताची कापणी करताना विद्यार्थ्यांनी निसर्गाप्रती आपले प्रेम, संगीत आणि नृत्याद्वारे व्यक्त केले. हा महोत्सव विद्यार्थ्यांबरोबरच पालकांसाठी सुद्धा आनंददायी आणि प्रेरणादायी ठरला आहे.

### १६८ गावांत नुकसानाचे संयुक्त पंचनामे

**चिपळूण :** परतीच्या पावसाने चिपळूण तालुक्यातील शेतकऱ्यांचे भात व नाचणी या प्रमुख हंगामी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाकडून नुकसानाचे पंचनामे सुरू असतानाच महसूल विभाग, पंचायत समिती, ग्रामपंचायत विभाग मिळून तिन्ही यंत्रणांकडून तालुक्यातील १६८ गावांत संयुक्त पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तहसीलदार प्रवीण लोकरे, पंचायत समिती गटविकास अधिकारी उमा घारगे-पाटील आणि तालुका कृषी अधिकारी शत्रुघ्न म्हेत्रे या तीन अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने तालुक्यातील १३० ग्रामपंचायत क्षेत्रात संयुक्त पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तहसील कार्यालयाच्या आदेशानुसार तालुक्यातील एकूण १६८ गावांमध्ये संबंधित गावचे ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी यांच्या संयुक्त पथकांकडून पंचनामे करण्यात येणार आहेत. सर्व अधिकाऱ्यांना तात्काळ कामाला लागण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, शेतकऱ्यांचे नुकसान वास्तव स्वरुपात नोंदवून लुकास्तरीय समितीकडे अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.



### वारकरी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्हा वारकरी संप्रदायातर्फे रविवारी (दि.९) कणकवलीत वारकरी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज यांचे ७५० वे जयंती वर्ष व संत तुकाराम महाराज यांचे ३७५ वे वैकुंठगमन वर्ष यानिमित्त वारकरी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सकाळी ९ वाजता एसटी वर्कशॉप येथील गणेश मंदिर येथून दिंडी सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. तेथून कणकवली बाजारपेठमार्गे परमहंस भालचंद्र महाराज आश्रमपर्यंत हा दिंडी सोहळा होणार आहे. दुपारी १२ वाजता भजन व आरती, तर १ वाजता महाप्रसाद, २ वाजता वारकरी सन्मानपत्र वितरण करण्यात येणार आहेत.

## निवडक

### नृत्य स्पर्धेत रितिका शिंदे प्रथम



**पाली/गोमाशी :** स्वरंग आयोजित पेण फेस्टिवलमध्ये नुकतेच वैयक्तिक नृत्य स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत सुधागड तालुक्यातील भार्जे येथील रितिका नरेश शिंदे हिने प्रथम क्रमांक मिळविला. तर सिया पाटील पेण द्वितीय क्रमांक, आर्या नारंगीकर उरण तृतीय क्रमांक या विजयी स्पर्धकांना रोख रक्कम व सत्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस काव्या जठार-पेण हिला देण्यात आला. स्वरंग आयोजित पेण फेस्टिवला प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दाखविली होती. स्पर्धेतील सर्वच कलाकारांनी आपल्या नृत्य आविष्कारातून प्रेक्षकांची मने जिंकली. या सर्व विजयी स्पर्धकांच्या नृत्याचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे.

### आमिषापोटी हातचे पैसे गमावले

**पनवेल :** दोन लाख रुपयांच्या आमिषा पोटी २३ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलेश दडस असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव असन ते टाकेवाडी, सातारा येथे राहत असून ते बँकेतून २३ हजार रुपये काढून दुसऱ्या बँकेत गेले. यावेळी शेजारील इसमांकडून त्यांनी बँकेत स्लिप भरून घेतली. यावेळी बँकेत आलेला दुसरा इसम हा हिंदीतून बोलू लागला. त्याने गोव्यावरून दोन लाख रुपये चोरून आणले असून पैसे खात्यावर जमा करून द्या, अशी विनंती त्यांनी केली. त्यांना बोलण्यात गुंतवून ते दोघे दडस यांना बाहेर घेऊन गेले, आणि दोन लाख रुपये त्यांच्याकडे ठेवण्यास सांगितले. दडस यांनी नकार दिला. त्यावेळी दहा-पंधरा मिनिटात येतो असे सांगितले आणि विश्वास नसेल तर तुझ्याकडचे २३ हजार माझ्याकडे ठेवायला दे असे सांगून काळ्या रंगाच्या प्लास्टिक पिशवीतून दोन लाख रुपये दंडस याना दिले आणि ते पायी निघून गेले. दोघांची वाट पाहिली असता ते आले नाहीत. दडस यांनी पिशवी उघडून पाहिली असता रुमालात पैसे होते. रुमाल उघडून पाहिला असता कागदांचे बंडल दिसून आले आणि फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

### फ्लॅट देण्याच्या बहाण्यात फसवणूक

**पनवेल :** स्वस्तात फ्लॅट देतो असे सांगून, प्रत्यक्षात फ्लॅट न देता भरलेली रक्कमही परत न केल्याप्रकरणी संभाजी शिवाजी सपकाळ नावाच्या व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दिलीप दळवी हे फणसपाडा, सीबीडी बेलापूर येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. त्यांनी संभाजी सपकाळ यांच्या ऑर्चिड ब्लोसॉम या नावाच्या प्रोजेक्टमध्ये फ्लॅट घेण्याचे ठरवले. यावेळी त्यांनी सात लाख आठ हजार रुपये चेक द्वारे दिले. यावेळी सपकाळ यांनी भरलेली रक्कम परत केली नाही किंवा व्यवहार रद्द झाल्यास व्याजासह रक्कमेचा एक चेक दिला होता. यावेळी प्रोजेक्टचे काम पूर्ण झाल्यानंतर बुकिंग प्रमाणे फ्लॅट देण्यात येतील असे सांगितले. २०१६ पासून पैसे घेऊन फ्लॅट देखील दिलेला नव्हता. दळवी है कंपनीच्या ऑफिसवर गेले असता ऑफिस बंद मिळून आले. मोबाईल क्रमांकवर संपर्क साधला असता उडवाउडवीची उत्तरे देऊन फोन उचलण्याचे बंद केले. दळवी यांच्याकडे दिलेला चेक त्यांनी बँकेत टाकला असता तो देखील बाऊन्स झाला.

### परतावा न मिळाल्यामुळे आत्महत्या

**पनवेल :** महिलेला मानसिक त्रास देऊन पैशांकरता तिच्या मागे तगादा लावून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी रवी हरेशभाई भडका, रा. सुरेंद्रनगर, गुजरात नावाच्या व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. अनघा पाटील यांची शेअर मार्केट ट्रेडिंग ऑनलाईन कोर्समध्ये रवी भडका यांच्याशी ओळख झाली. त्यानुसार त्यांनी यात पैसे गुंतवले. रवी भडका याने परतावा म्हणून काही रक्कम त्यांच्या बँक खात्यात परत केले. मात्र ठरल्याप्रमाणे परतावा येत नसल्याने अनघा, तिचा पती हे रवी भडका याला वारंवार संपर्क करून परतावा परत देण्याबाबत संपर्क करत होते. मात्र तो वारंवार वेगवेगळी कारणे सांगून टाळाटाळ करत होता. रवी भडका हा परतावा देत नसताना सुद्धा अनघा हिला मानसिक त्रास देऊन तिच्याकडून आणखी रक्कम घेतली. या मानसिक त्रासातून अनघा हिने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी रवी हरेशभाई भडका याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### समुद्राचे पाणी गेले मागे

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती नवीन जेट्टी विकसित करण्यात येत आहे. या जेट्टीच्या कामासाठी खूप मोठ्या प्रमाणावर दगडांचा भराव करण्यात आल्याने समुद्राच्या पाण्याने आपला प्रवाह बदललेला आहे. जीवनाबंदर जुनी जेट्टी व खालचा जीवना हा परिसर पूर्णपणे वाळूने भरून गेला आहे. फेस्टिवल बीच, शासकीय विश्रामगृह तसेच दांडे स्मशानभूमी या परिसरात लाटा खूप मोठ्या प्रमाणावर किनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर आदळत आहेत. मागील एक महिन्यांच्या कालावधीपासून ओहोटीच्या वेळी देखील समुद्राचे पाणी फारसे मागे जात नव्हते. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत होती. समुद्रकिनारी कोणत्याही प्रकारचे वॉटर स्पोर्ट्स पाणी मागे जात नसल्याने उपलब्ध होत नव्हते. ज्याप्रमाणे जीवनाबंदर या ठिकाणी जेट्टी बांधली जात आहे. त्याचप्रमाणे श्रीवर्धन दांडे येथील बंदर परिसरात देखील जेट्टी उभारण्यात येत आहे. त्यासाठी दगडांचा भराव करून रस्ता तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे समुद्राचे पाणी मागे गेले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contant - 9823585321

● "जन्नावार हॉस्पीटल" अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509

● ऑफिस वर्कसाठी मुलगा/मुलगी पाहिजे. वेळ : १० ते ६ वेतन : ५०००/- कॉम्प्युटर नॉलेज व मराठी टायपिंग आवश्यक. धुमाळ हॉस्पिटल जवळ, चेंढरे-अलिबाग. संपर्क : ७२६३८८५७९०

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# किशोरावस्था : मुला-मुलींच्या समस्या

डॉ. राजेंद्र चांदोरकर
बालरोगतज्ज्ञ, अलिबाग-रायगड



मुला-मुलींच्या वाढीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे किशोरावस्था (टिनेज स्टेज). साधारणतः १०-१४ वर्षांच्या मधला कालावधी म्हणजेच किशोरावस्था. झपाट्याने होणाऱ्या वाढीच्या या टप्प्यात मुला-मुलींना अनेक नैसर्गिक/सामान्य समस्यांना सामोरं जावं लागतं. बऱ्याचदा याची जाणीव देखील त्यांना नसते. या टप्प्यात मुला-मुलींमध्ये विशिष्ट शारीरिक बदल होत असतात. वेगवेगळ्या मानसिक अवस्थेतून त्यांना जावं लागतं तसेच समाजातील प्रवाहात/प्रवासात त्यांना परिस्थितीनुसार मिळतं-जुळतं घ्यावं लागतं. याचाच मतितार्थ म्हणजे, या वयोगटात निर्माण होणाऱ्या शारीरिक, मानसिक व सामाजिक समस्या आपण कशा ओळखाव्या व त्या समस्यांना त्यांनी कसं सामोरं जावं, याची योग्य वेळी पालक, शिक्षक व तज्ज्ञांनी घेतलेली दखल व त्यानिमित्तानं केलेली उपाययोजना याला सध्याच्या युगात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालं आहे. पाहुयात या वयोगटातील समस्या...

**शारीरिक समस्या**

**लैंगिक विकास**

लैंगिक विकास म्हणजे मुला-मुलींच्या शारीरिक वाढीतील अतिशय महत्त्वाचा मुद्दा. या वयात शरीरातील काही विशिष्ट संप्रेरकांच्या (हॉर्मोन्स) प्रभावामुळे मुलींमध्ये मासिक पाळी येणे, छातीचा आकार वाढणे, काखेत-जांघेत केस येणे, उंची व वजन वाढणे इत्यादी महत्वाचे बदल होतात. शरीरातील हे सर्व बदल त्यांच्यासाठी नवीन असतात व त्याविषयी पालकांनी आपापल्या मुलींना पूर्वकल्पना देणं गरजेचं असतं. यासंदर्भात मासिक पाळी आल्यावर घ्यावयची काळजी याविषयीही त्यांचं संमोहन होणं गरजेचं असतं. पाळी १० वर्षांच्या आत आल्यास, १६ वर्षांपर्यंत न आल्यास, पाळी अनियमित असेल तर अथवा त्या काळात रक्तस्त्राव वाजवीपेक्षा अधिक होत असल्यास तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणं अनिवार्य होऊन जातं.

मुलांमध्ये मात्र उंची-वजन वाढण्याव्यतिरिक्त त्यांचा आवाज बदलणे, स्नायुंची वाढ होणे, गुप्तांगाची वाढ होणं, काखेत-जांघेत केस येणे इत्यादी बदल दिसून येतात.

✻ चेहऱ्यावर मुरमं (तारुण्यपिटीका) येणं हे या वयात सामान्य असतं व वयानुरूप शरीरातील हॉर्मोन्सच्या बदलामुळे ही मुरमं येत असतात, जी कालांतराने निघून जातात.

✻ या वयोगटात खाण्या-पिण्याच्या आवडी-निवडी, सवयी बदलत असतात व त्यामुळे सतत बाहेरच्या जंक फूड/फास्ट फुड सेवनाचा अतिरेक झाला तर मुलांना लठ्ठपणा येऊ शकतो, पोटाचे विकार जडू शकतात, याची मुला/मुलींनी व पालकांनी नोंद घेणं गरजेचं आहे. घरातील सकस व सत्वयुक्त आहाराचं सेवन कमी केल्यामुळे त्यांना अनेमियाला (पंडुरोग/रक्तक्षय) सामोरं जावं लागतं. या सर्वाचा त्यांच्या प्रतिकारशक्तीवरदेखील परिणाम होऊ शकतो.

**मानसिक व भावनिक विकास....**

✻ टिनेज मुला-मुलींमध्ये मुख्यत्वेकरून मानसिक व भावनिक परिवर्तन घडत असते. त्यांच्या स्वभावात, वागण्यात-बोलण्यात, प्रत्युत्तर करण्यात फार चढ-उतार दिसून येतात.

✻ कोणत्याही गोष्टीचा आळस येणे, उगाच छोट्या-छोट्या कारणाने चिडचिड करणे किंवा कारण नसताना उदासीनता येणे इत्यादीना त्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्यामध्ये मानसिक ताण-तणाव, नैराश्य आणि चिंतेची भावना वाढू लागते.

✻ अनेकदा काहीं मुला-मुलींमध्ये कोणतीही गोष्ट, काम इत्यादी सहजतेने करण्याचा आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो. कधी कधी तर ही मुलं साध्या-साध्या कारणांनी आक्रमक बनतात व रौद्ररूप धारण करतात. क्वचित एखादा टीनेजर गुंडगिरीची शिकार बनू शकतो.

**सामाजिक विकास...**

✻ किशोरवयीन मुला-मुलींनी समाजात कसं वावरावं, लोकांबरोबर/मित्र-मैत्रिणींबरोबर कसं वागावं इत्यादींबाबतीत विकास हा त्यांच्या मुलांच्या वाढीतील महत्त्वाचा भाग समजला जातो.

✻ काही टिनेज मुलांमध्ये उद्धट किंवा सामाजिक दृष्टीने न पटणारं वर्तन दिसून येतं.

✻ मित्र-मैत्रिणींचा दबाव (peer pressure) जे की समवयस्क आहेत त्यांचं दडपण मग ते अभ्यासातील स्पर्धे चे असो अथवा अन्य कोणतंही!!...काही विशिष्ट दडपणात त्यांना व्यसनधिनतेला (धूम्रपान, मद्यपान) सामोरं जावं लागतं, तसेच ते समाजविरोधी बंडखोरी किंवा गुंडगिरीचा अवलंब करु शकतात. "तो किंवा ती करते तर मी का करु शकत नाही??..." हा विचार त्यांच्या मनात कास धरून बसतो आणि हे वाईट गोष्टींबाबतीत अधिक प्रमाणात घडत जाते.

✻ आजकाल इंटरनेट व सोशल मीडियानं किशोरवयीन पिढीला पुरतं घेरलंय व वेडं करुन टाकलंय. रिल्स व सेल्फी पिकनं त्यांना खूप प्रभावित केलंय. परंतु, त्यामुळे त्यांच्याकडून काही चांगलं घडण्याऐवजी अकार्यशीलताच अधिक दिसून येत आहे. मैदानी खेळांपासून ही पिढी वंचित राहात आहे, ज्यामुळे त्यांना लठ्ठपणाला सामोरं जावं लागत आहे. अभ्यासातील प्रगतीपासून ती दूर होत चाललीयेत. टिनेज वयोगटात दिवसेंदिवस सायबर क्राईम्सच्या घटना वाढताना दिसून येत आहेत.

✻ लैंगिक संबंधातील आकर्षण हा एक वेगळा चर्चेचा व विचारमंथनाचा विषय आहे. गर्ल फ्रेंड-बॉय फ्रेंडच्या चक्करमध्ये त्यांच्यातील कलह व वाद विकोपाला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुलींच्या बाबतीत म्हणायचं झाल्यास त्यांना अजाणतेपणात गर्भधारणेला सामोरं जावे लागू शकतं.

**आहारातील आवडी-निवडी**

खरं तर, किशोरावस्थेत मुला-मुलींनी सकस व पोषक आहार घेणं गरजेचं असतं. अभ्यासातील प्रगती, शारीरिक वाढ तसेच आजार व विकरांना सामोरं जाण्यासाठी लागणारी प्रतिकारशक्ती इत्यादी त्यांनी घेतलेल्या घरगुती सकस आहारात दडलेल्या आहेत; परंतु ही पिढी मात्र जंक व प्रोसेस्ड फूडच्या मागे लागलीये. Blinkit, स्विगी, झोमॅटो, ॲमेझॉनच्या मागे लागलेल्या या टिनेज पिढीला भविष्यातील वाईट पडसादांची कल्पना नसावी!

अशा प्रकारे वाईट व चुकीच्या प्रवाहात वाहवत जाणाऱ्या टिनेज पिढीसाठी आपण काय करु शकतो?

**सुसंवाद**

पालकांनी, शिक्षकांनी किशोरवयीन मुलं-मुली यांच्याशी मनमोकळे पणाने सुसंवाद साधणे गरजेचे आहे.

**समुपदेशन**

मानसिक व भावनिक समस्यांचे निवारण करण्यासाठी आवश्यकता भासल्यास व्यावसायिक तज्ज्ञांची... बालरोगतज्ज्ञ (Children Specialists) बालविकास तज्ज्ञ तसेच (Developmental Children & Adolescent Healkth Specialists) यांची मदत घेणे आवश्यक होऊन गेले आहे. किशोरवयीन मुला-मुलींना योग्य ते समुपदेशन करण्याची वेळ आली आहे.

**सकारात्मक सवयी**

टिनेज पिढीमध्ये सकस घरगुती आहार, नियमित व जमेल तसा व्यायाम, मैदानी खेळ इत्यादी निरोगी सवयी घडवून आणणे, ही काळाची गरज आहे.

**लैंगिक शिक्षण**

शाळांमध्ये टिनेज पिढीला लैंगिक शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगणे व या पिढीबरोबर लैंगिक समस्यांवर चर्चासत्रे घेणे आवश्यक आहे. मासिक पाळी, मासिक पाळीतील समस्या यावर पालकांनी विशेषतः मुलींच्या मातांनी मुख्यत्वेकरुन आपल्या पाल्यांचे समुपदेशन करणं गरजेचं आहे. मासिक पाळीतील समस्या, त्यांचे निवारण, सॅनिटारी नॅपकिनचा योग्य वापर यासंबंधित त्यांना वेळोवेळी तज्ज्ञांद्वारे योग्य ते मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

**जागरूकता**

सरते शेवटी... व्यसनाधिनता, गुंडगिरी तसेच सायबर सुरक्षा याबाबतीत समाजामध्ये व समज माध्यमांद्वारे टिनेज पिढीत-किशोरवयीन मुला-मुलींमध्ये जागरूकता होणे हि काळाची गरज आहे.

✻✻

# वाहनतळाअभावी वाहने रस्त्याच्या कडेला

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**




श्रीवर्धन शहरात दिवसेंदिवस वाढती पर्यटक संख्या या अनुषंगाने अद्यापही येथे नगरपरिषदेचे वाहनतळ नसल्याने पर्यटकही जागा मिळेल त्या ठिकाणी आपले वाहन उभे करीत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी समस्या निर्माण होऊ लागली आहे.

पर्यटन क्षेत्रात 'ब' दर्जा प्राप्त श्रीवर्धनला महाराष्ट्रातील पर्यटक हजेरी लावतात. वाढती पर्यटक संख्या या दृष्टीने अनेकांनी रिसॉर्ट, होम स्टे, लॉज, खाणावळ असे पर्यटन पूरक व्यवसाय सुरू करीत उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त केले आहे. आजच्या घडीला प्रत्येक पाखाडी, आळी मधून होम स्टे, लॉज बघावयास मिळतात. परंतु, अनेकांनी पर्यटन पूरक व्यवसाय सुरू करतांना एखाद दोन मुक्कामासाठी आलेल्या ग्राहकांची वाहने उभी करण्यासाठी जागेची व्यवस्था न केल्याने पर्यटक ही रस्त्याच्या कडेला वाहन उभे करीत निघून जातात.

गेल्या काही महिन्यांपासून वाहतूक कोंडी ही श्रीवर्धनसाठी मोठी समस्या झाली आहे.

> श्रीवर्धन हे ऐतिहासिक व सांस्कृतिक शहर आहे, भविष्यात पर्यटन, शिक्षण आणि विज्ञानाच एक केंद्र बनणार आहे. या सर्व दृष्टिकोनातून श्रीवर्धन येथे वाहनतळ आवश्यक आहे. त्यासाठी मी प्रयत्नशिल आहे.
> – खा. सुनील तटकरे.

नगरपरिषदे मार्फत येणाऱ्या पर्यटकांकडून पर्यावरण नियंत्रण कर व स्वच्छता उपविधी कर आकारला जातोय. परंतु, नगरपरिषदेकडून अद्यापपर्यंत वाहनतळाची सुविधा उपलब्ध करण्यात आली नाही. श्रीवर्धन येथील अरूंद रस्ते त्यातच मिळेल त्या मोकळ्या जागेवर आपले वाहन उभे करण्याची पर्यटकांची वृत्ती या कारणास्तव वाहतूक कोंडी समस्या बिकट व्हायला लागली आहे.

काही महिन्यात श्रीवर्धन येथे श्रीमंत पेशवे यांचे भव्य स्मारक व छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढपुतळा आणि शिवसृष्टीतसेच प्लॅनेटेरियम साकारले जात आहे. या अनुषंगाने देश विदेशातील पर्यटक संख्या ही वाढणार आहे. भविष्यात श्रीवर्धन शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था होणे गरजेचे आहे. जेणेकरून, वाहतूक कोंडी समस्येतून रस्ते मोकळे होतील.

### कोकण दिंडीत हरिनामाचा गजर

**रसायनी :** पायी कोकण दिंडी भाताण परिसर ते धाकटी पंढरी खालापूर साजगावं येथे जात असताना या दिंडीचे ठिकठ-ठिकाणी स्वागत करण्यात आले. यानंतर दिंडी बारवई श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात येताच नारायण महाराज मगर यांनी प्रवचन केले. तर साजगाव धाकटी पंढरीत दिंडी दाखल होताच नंदकुमार गावंड यांचे सुश्राव्य किर्तन झाले. श्री विठ्ठल रुक्मिणी दिंडीचे अध्यक्ष शिवचरित्रकार संतोष महाराज सते यांच्यावतीने गेल्या तेरा वर्षे श्री विठ्ठल रुक्मिणी पायी कोकण दिंडी काढण्यात येत आहे.

# अग्निशमन यंत्रणेचे नव्याने सर्वेक्षण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**




पनवेलमधील हजारो गृहनिर्माण सोसायट्या अग्निसुरक्षा यंत्रणेकडे दुर्लक्ष करत आहेत. बहुतांश सोसायट्यांमध्ये आग प्रतिबंधक व्यवस्था बंद किंवा अपुरी असल्याने आणीबाणीच्या परिस्थितीत मोठा धोका निर्माण होत असल्याचे पालिकेच्या अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे. या यंत्रणेचे नव्याने सर्वेक्षण होणार आहे.

मागील आठवडाभरात पनवेलमध्ये तीन आगीच्या घटना घडल्या आहेत. या तीन घटनात तीन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या तीनही घटनांमध्ये घटनास्थळी कोणतीही अग्निशमन यंत्रणा नसल्याने तत्काळ मदत मिळू शकली नसल्याने आग पसरली. दरम्यान, अग्निशमन यंत्रणेबाबत नागरिकांमध्ये उदासीनता असल्याचे समोर आले असुन पनवेल महानगरपालिका परिसरातसह तालुक्यात हजारो सोसायट्यांची अग्निशमन यंत्रणा बंद असल्याची माहिती समोर आली आहे. हजारों गृहनिर्माण सोसायट्यांपैकी केवळ ३४२ सोसायट्यांनी अग्निशमन विभागाकडे आवश्यक मफॉर्म बीफ सादर करून त्यांच्याकडील फायर सिस्टीम कार्यरत असल्याचे निश्चित केले होते. ही माहिती मे महिन्यातील असली तरी पालिकेने वारंवार लागणाऱ्या आगीच्या घटना लक्षात घेता पालिका हद्दीत सर्वेक्षणाला सुरुवात केली आहे. याबाबत पनवेल महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांनी याबाबत जनप्रबोधनाची गरज असल्याचे सांगितले. आग लागल्यास आपल्या सोसायटीत ती विझविण्यासाठी सक्षम यंत्रणा असावी. आग लागू नये यासाठी प्रतिबंध महत्त्वाचा असल्याचे बोडके म्हणाले. रहिवाशांनी आपल्या सोसायटीत अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे याकरिता जनजागृती मोहीमदेखील राबवावी.

आमच्याकडे रहिवाशांनी विनंती केल्यास आम्ही देखील सोसायटीमध्ये येऊन अग्निशमन यंत्रणेबाबत सोसायटीत येऊन जनजागृती करू, असे पनवेल मनपा मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये खड्डे दुरुस्तीला वेग

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पनवेल महापालिका क्षेत्रातील अनेक रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. सर्वत्र खड्डे पडल्याने नागरिकांना प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता महापालिकेतर्फे रस्ते दुरुस्तीच्या कामांना गती देण्यात आली आहे. त्यांमुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे, यासाठी बांधकाम विभागाला तातडीने व वेगाने कामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आता पावसाचा जोर कमी होईल. मुसळधार पावसामुळे रस्ता दुरुस्तीची कामे काही दिवस रोखली होती. आता मात्र, नवीन तंत्रज्ञानाच्या डांबरीकरणाला सुरुवात पनवेल शहरातील पडलेले खड्डे भरण्याचे काम पालिकेकडून सुरू करण्यात आले आहे. हुतात्मा हिरवे गुरुजी चौक परिसरात मोठ्या प्रमाणात खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी व धुळीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत होता.



# तळा बाजारपेठेत शुकशुकाट

**। तळा । प्रतिनिधी ।**



परतीच्या पावसामुळे यावर्षी भातशेतीचे काही प्रमाणात नुकसान झाले असून गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघाडी दिली असल्याने तालुक्यातील बळीराजा भात कापणीच्या कामात व्यस्त झाला आहे. याचा परिणाम बाजारपेठेवर झाला असून तालुक्यातील नागरिक भात कापणीच्या कामात व्यस्त असल्यामुळे बाजारपेठ परिसरात शुकशुकाट पसरला असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. लहरी पावसाचा भरोसा नसल्यामुळे तळा तालुक्यात शेतकरी वर्गाची भात कापणीची लगबग सुरू झाली असून तालुक्यातील शेतकरी वर्ग भात कापणीच्या कामात मग्न झाला आहे. परतीच्या पावसामुळे भात शेतीचे होणारे नुकसान वाचवण्यासाठी दिवसा कडक उन्हातही जस जमेल तसे शेतातील भात कापणी केली जात आहे. भात कापणीला मजुरांची देखील कमतरता जाणवत असून पावसामुळे भात भिजण्याची शक्यता असल्याने मिळेल ती मजुरी देऊन लवकरात लवकर भात कापणी केली जात आहे. तालुक्यातील शेतकरी वर्ग भात कापणीच्या कामात गुंतला असल्याने बाजारपेठ परिसरात देखील शुकशुकाट पसरला आहे.

# रेवदंड्यात धर्मसौहार्दाचा अनोखा संगम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



रेवदंड्यातील हजरत पीर शेहेनशा वली यांच्या पवित्र दर्ग्यात बुधवार (दि. ५) नोव्हेंबर रोजी पारंपरिक उरूस उत्सव आनंद आणि सौहार्दाच्या वातावरणात साजरा झाला. तब्बल १५० वर्षांपासून अविरत सुरू असलेली ही धार्मिक परंपरा आजही तितक्याच श्रद्धा, उत्साह आणि एकतेच्या भावनेने उजळून निघत आहे.

या उत्सवाचे अध्यक्ष आसिफ गोंडेकर यांनी आपल्या मित्रमंडळासह उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रमाचे सुरळीत आयोजन केले. या प्रसंगी हिंदू-मुस्लिम दोन्ही समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन दर्ग्यात चादर अर्पण करत धर्मसौहार्द, ऐक्य आणि बंधुत्वाचा संदेश दिला.

उत्सवाचे व्यवस्थापन आसिफ गोंडेकर आणि मित्रमंडळाने अत्यंत यशस्वीपणे पार पाडले. कार्यक्रमाच्या यशात इक्बाल फटाकरे, सलीम गोंडेकर, हानिफ गोंडेकर, मुजफ्फर मुकादम, सलीम तांडेल, सुहास घोणे, राहुल गणपत, सुजय घरत, दिपक वैद्य, प्रथमेश कोळसेकर, सचिन पवार आदींचा मोलाचा सहभाग होता.

या प्रसंगी सुरेंद्र म्हात्रे, वामन चुनेकर, अजित गुरव, राजेंद्र गुरव, राजेंद्र वाडकर, संदिप खोत, निलेश खोत यांच्यासह अनेक मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

# रुग्णवाहिका, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषदेच्या हद्दीतील गुंडगे-भिसेगाव विभागातील पॉल फाऊंडेशनच्या रुग्णवाहिकेचे तसेच विविध ठिकाणी बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमामुळे रुग्ण सेवा उपलब्ध होणार असून चोरटे व अन्य गैर प्रकारांना आळा बसणार आहे.

पाल फाऊंडेशनचे संस्थापक माजी उपनगराध्यक्ष लालधारी पाल यांनी गुंडगे या एका बाजूला असलेल्या परिसरातील नागरिकांना तातडीची आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हणून रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली. तसेच या परिसरात मध्यंतरीच्या काळात चोऱ्यांचे प्रमाण वाढले होते. त्याला आळा बसावा म्हणून विविध भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. उद्योजक अजय पाल यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या साधनांच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विजय पाल आणि अजय पाल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. माजी नगरसेवक दीपक मोरे यांनी प्रास्ताविक केले. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण करण्यात आले. तसेच, याप्रसंगी आदिवासिंना भांड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उप जिल्हाप्रमुख भाई गायकर, माजी उपनगराध्यक्ष लालधारी पाल, माजी नगरसेवक संकेत भासे, विजय हजारे, वैशाली मोरे, अभिषेक सुर्वे, शरद मोरे, शिवलाल गुप्ता, लालजी पाल, नदीम खान, सचिन भोईर, उमाशंकर गुप्ता, रॉली पाल आदी उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. रत्नाकर शंकर पाठारे, श्री. नंदकुमार गोविंद काळे यांचे कुलमुखत्यारी श्री. कैलास बांकेलाल अग्रवाल | १३/१ | एकुण क्षेत्र ५-८७-०० हे.आर. पॉ. यापैकी लिहुन देणार यांचे मालकीचे क्षेत्र २-९३-०० हे.आर.पॉ. | ४-७५ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०७/११/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड. मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक शिवदास लक्ष्मण नाईक व सुहासिनी शिवदास नाईक यांनी सदर मिळकत कायम खरेदीखताने देण्याचे ठरविले आहे. सदरची भातशेती मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिल विनोद धनुर्धर खोपकर रा. परहुरपाडा, केतन कृष्णा पाटील रा. जांभुळपाडा यांना दिला असून सदर मिळकतीचे व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार | भूधारणा पद्धती |
|---|---|---|---|---|
| जांभुळपाडा ता.अलिबाग | ४१ | क्षेत्र ०-०४-०० पो.ख.०-००-०० एकुण ०-०४-०० | ०.०८ | १ |
| जांभुळपाडा ता. अलिबाग | ४० | क्षेत्र ०-०५-०० पो.ख. ०-००-०० एकुण ०-०५-०० | ०.०८ | १ |

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दि. ०६/११/२०२५

**ॲड. विकास एच्. पाटील**
युगंधर सोसायटी, शॉप नं.६, युनियन बँकेजवळ,
ब्राम्हण आळी, ता.अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ७७९८८४४४३३

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे अशील यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शेखर मोरेश्वर शहासने, मु. पो. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ४९ | २/ब | ०-०५-१० पो.ख. ०-००-५० एकूण ०-०५-६० | ०.४५ |

सदरची शेतजमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशीलांस देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोण साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दिनांक : ०७/११/२०२५

अशिलांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. किशोर अनंता दिघे**
मु.तुलसी सेंटर पॉईंट ऑफीस नं. ४२,
पहिला मजला, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं. ८००७९७०१५१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक निला सिताराम पाटील यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे जांभिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५४/१ | एकुण क्षेत्र ०-३७-०० हे आर पॉ | ०-७२ |
| ४८/१/अ/१ | एकुण क्षेत्र ०-८९-२० हे आर पॉ यापैकी क्षेत्र क्षेत्र ०-४०-०० हे आर पॉं | ८-०७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०७/११/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड,
कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड.
कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३६४/२०२५

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. दिलनाज अ. करीम पुरकर, (माहेरील नाव) — अर्जदार
श्रीम. दिलनाज अखलाक बडे, (सासरचे नाव)
रा. दत्तवाडी, रस्ता पो.मुरुड, ता.मुरुड, जि.रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव,
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०३/०८/१९६२ रोजी मौजे नांदगाव, ता. मुरुड, जि.रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि.०३/०८/१९६२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

**सही/-**
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक सौ. मंजू रमेश अगरवाल, रा. मुंबई यांच्याकडून विकत घेण्याबाबत त्यांचेशी बोलणी सुरु आहेत. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| इंद्रपै तालुका अलिबाग, जिल्हा रायगड | ३८ | ००-१६-९० पो.ख. ००-०२-३० एकूण ००-१९-२० | ४.१२ |

**सदर मिळकत आणि त्या मिळकतीवरील ग्रामपंचायत आवास घर नं. २२८ ही मिळकत.**

सर्व व्यक्ती ज्यांचा सदर मिळकतीत विक्री, मालकी हक्क, हस्तांतरण, असाईनमेंट, विक्रीचा करार, भाडेकरार, भाडेपट्टा, ताबा, तारण, लिस पेंडेन्स, गहाण, देवाणघेवाण, भेट यांसह कोणताही आक्षेप, दावा, मागणी, हक्क, व्याज असलेल्या सर्व व्यक्ती, विभाजन, धारणाधिकार, शुल्क, देखभाल, वारसा, ट्रस्ट, सुलभता इतर अधिकार किंवा अन्यथा वर नमूद जागेच्या संदर्भात १५ दिवसांचे आत आक्षेपाच्या समर्थनार्थ सर्व मूळ कागदपत्रांसह खालील नमूद स्वाक्षरीकर्ता यांना लेखी कळविणे आवश्यक आहे. यानंतर मागाहून कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच अशी घेण्यात आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्व तमाम जनतेस कळविले.

अलिबाग,
दिनांक ७.११.२०२५

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १३/१ | एकूण क्षेत्र ५-८७-०० हे.आर. | ४.७५ |
| ३४/३ | एकूण क्षेत्र ४-०७-०० हे.आर. | ३.४० |

**मौजे बोरगाव, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १७४/९ | एकूण क्षेत्र २-५२-०० हे.आर.या पैकी अरविंद मोहनलाल जैन खाते क्र.७४२ ज्याचे क्षेत्र १-४४-०० हे.आर. या मिळकतीबाबत | ०.८१ |

**मौजे धामणी, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५४/४/अ | एकूण क्षेत्र १-४९-०० हे.आर. | १.३० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ (पाच) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही /-

दिनांक :- ०७/११/२०२५

**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फ सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे

मौजे फुफादेवीपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड व ग्रुप ग्रामपंचायत येथील खालील वर्णनाची मिळकत.

| मौजे | भुमापन क्र. /उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| फुफादेवीपाडा | १२/२/अ | १.२६.०० | १.३७ |
| | | पैकी ०.५०.४ | ०.५३ |

सदरहू मिळकतीपैकी पैकी ०.५०.४ हे.आर. इतके क्षेत्राची मिळकत, त्यात असलेला झाड झाडोरा वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरेसह अशा मिळकती बाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री.शरद शंकर थळे, श्री.भालचंद्र शंकर थळे, श्रीमती. माळुबाई दिनेश पाटील, सर्व आज मु.फुफादेवीपाडा, ता. अलिबाग, जि.रायगड यांनी माझे आशिल यांचेशी व्यवहार ठरविला असुन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची, कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्री. शरद शंकर थळे, वगैरे यांचे सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करणेच्या सुचना दिल्या आहेत. याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, लिन, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख ०५.११.२०२५

**(ॲड. एस.वाय.बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत व घरमिळकत संदर्भित मिळकतींचे विद्यमान मालक श्री.मनिष तुकाराम उमरेडकर यांच्याकडून कायम स्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली असून तशी बयाणा पावती देखील माझे अशील व विद्यमान मालक यांच्या दरम्यान स्वाक्षरीत झालेली आहे. संदर्भित जमीनमिळकत व घरमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित मिळकतींमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीन मिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**- संदर्भित मिळकतींचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र(हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| आगरसुरे, ता.अलिबाग, जि.रायगड. | २२२ | ०-०६-०० | ०.१० |

तसेच, ग्रामपंचायत आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडील मालमत्ता क्र. ४६२, क्षेत्र १०१० चौ.फूट. ही घरमिळकत.

अलिबाग,
दिनांक : ०७/११/२०२५.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट,
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी, कन्याशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, मो.९८२२५२८९३१,
ईमेल -adv.rdpatil@gmail.com

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३३८/२०२५

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. मालती मऱ्या पाटील, (माहेरील नाव) — अर्जदार
श्रीम. अर्चना ईश्वर मळेकर, (सासरचे नाव)
रा. कुभोशी शेडसई, ता.रोहा. जि. रायगड

विरुध्द

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत मिठेखार,
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १५/०१/१९७७ रोजी मौजे मिठेखार, ता.मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मिठेखार, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १५/०१/१९७७ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ११/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे.

आज ता.०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)

ज.म.र अर्ज ३६३/२०२५

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. नाजिमा इब्राहीम कादीरी (माहेरील नाव) — अर्जदार
श्रीम. नाजिमा इरफान धनसे, (सासरचे नाव)
रा. बोर्ली पंचायत, ता.श्रीवर्धन जि.रायगड

विरुध्द

मुख्याधिकारी — सामनेवाला
नगरपरिषद मुरुड-जंजिरा,
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि.२४/०६/१९७१ रोजी मौजे मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद मुरुड, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. २४/०६/१९७१ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे.

आज ता. ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे विद्यमान मालक सौ.सुप्रिया सचिन मंडलिक, रा.गौरकामत ता. कर्जत, जि.रायगड, पॅन नं CTYPM6570L यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे - गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ७७ | ३१ | ०-३७-०० | ०-२३ |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०६/११/२०२५

**ॲड. प्रविण पुंडलिक कराळे**
ओमकार अपार्टमेंट, डिकसळ,
पो.कोषाणे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९९७५०९०३०४

## पनवेल महानगरपालिका

**जाहिर ई निविदा सुचना**

महानगरपालिकेच्या सर्व प्रकारच्या सभा, मनपा तर्फे आयोजित कार्यक्रम, नागरिकांसाठी आयोजित शिबिरे, पनवेल महानगरपालिकेमार्फत साजरे करण्यात येणारे उत्सव समारंभ, शालेय, कॉलेजस्तरीय स्पर्धा व कार्यक्रम, विधानसभा, लोकसभा व स्थानिक निवडणुका, केंद्र व राज्य शासनातर्फे आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम व योजना राबविणे तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना अल्पोपहार, जेवण इत्यादी पुरविणे बाबत.

उपरोक्त कामाची सविस्तर माहिती www.mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(सही/-)
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/भांडार/२६२५/प्र.क्र.०१/९३२/२०२५
दिनांक ०४/११/२०२५

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

**जाहिर सुचना**
**महिला व बालकल्याण विभाग**

सन २०२५-२०२६ करीता महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांना MSCIT (Maharashtra State Certificate in Information Technology) म्हणजे महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम या संगणकावर आधारित प्रशिक्षण व CCC (Course on Computer Concepts) म्हणजे संगणक संकल्पनांचा अभ्यासक्रम कोर्स देणे करीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र. पमपा/मबाक/१३०/२०२५
दि.०६/११/२०२५

सही/-
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाची नमूद जमिन मिळकतीचे मुळ मालक आमचे अशिल श्री.अनंत तुकाराम चांदोरकर वगैरे १२ यांची वडिलोपार्जित मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नवीन सर्व्हे नं. | जुना सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| चांदोरे ता.माणगांव | १७/११ | २४०/११ | ४-८५-०० | १.५० |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

सदरच्या मिळकतीच्या बाबतीमध्ये मा. तहसिलदार माणगांव यांनी दिलेल्या कुळवहिवाट दावा १०४/२०२४ हया दाव्याचा निर्णय मा. उपविभागीय अधिकारी सो. माणगांव यांच्या न्यायालयाने रद्द केला असून संबंधित मिळकतीच्या बाबतीमध्ये मा. महाराष्ट्र महसूल न्यायालय मुंबई यांचे न्यायालयात टेनन्सी रिव्हीजन अर्ज दाखल असून सुनावणी कामी प्रलंबित आहे. सदर मिळकतीच्या बाबतीत गोविंद पांडुरंग तांबे यांचे बरोबर श्री. जयेश विजयकुमार मोरे यांनी मा.दुय्यम निबंधक माणगांव यांचे कार्यालयात खरेदीखत दस्त क. ४१/२०२५ दिनांक ०३/०१/२०२५ नोंदविला असून सदरच्या दस्तास आमचे अशिल अनंत तुकाराम चांदोरकर व इतर हे मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर माणगांव यांचे न्यायालयामध्ये खरेदीखताचा दस्त रद्द करणेकामी दिवाणी दावा ही दाखल करीत आहेत.

तरी या नोटीसीने सर्वांना सुचित करण्यात येत की, वर नमूद जमिन मिळकतीच्या संदर्भात श्री.जयेश विजयकुमार मोरे यांचेसोबत कोणीही खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये, तसा व्यवहार कोणी केला तर त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत असून संबंधितावर आमचे अशिल मिळेल त्या सल्ल्यानुसार दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कारवाई करतील.

अलिबाग
दिनांक : ०५/११/२०२५

सही
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाईन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## निवडक

### चौलमध्ये त्रिपुरी पौर्णिमेचा जल्लोष

**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरेचे केंद्र असलेल्या चौल गावात गुरुवारी कार्तिक पौर्णिमेनिमित्त त्रिपुरी पौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. श्री रामेश्वर मंदिर परिसर दिव्यांच्या तेजाने आणि भक्तिमय वातावरणाने उजळून निघाला. भगवान शंकर यांनी त्रिपुरासुर राक्षसाचा वध करून देवतांना दिलेल्या मुक्तीच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. याच कारणामुळे ही पौर्णिमा त्रिपुरारी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. सकाळपासूनच मंदिरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. दर्शन, पूजन, अभिषेक आणि दीपदानासाठी भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला. सर्वत्र हर हर महादेवच्या घोषांमध्ये भक्तीभाव ओसंडत होता. संध्याकाळी मंदिर परिसर मनमोहक विद्युत रोषणाईने उजळला. श्री रामेश्वर मंदिराच्या शिखरावर पारंपरिक त्रिपुरी दिवा प्रज्वलित करण्यात आला. खास वैशिष्ट्य म्हणजे मंदिरातील पवित्र पाण्याच्या कुंडाभोवती आकर्षक रंगीबेरंगी दिव्यांची लायटिंग करण्यात आली होती. या प्रकाशात संपूर्ण कुंड आणि मंदिर असे न्हाऊन निघाले की, दृष्य पाहताना स्वर्गीय सौंदर्य अनुभवत असल्याचा भास होत होता. प्रसन्न, निसर्गरम्य आणि आनंददायी वातावरणाने भाविकांना अविस्मरणीय अनुभव मिळाला.आरत्या, भजन, कीर्तन आणि जयघोषांनी वातावरण दुमदुमले. दीपोत्सवाचे सौंदर्य पाहण्यासाठी चौलसह परिसरातील विविध गावांमधील नागरिक आणि पर्यटक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थ, मंदिर समिती आणि स्थानिक युवक मंडळांच्या एकत्रित प्रयत्नांतून या उत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.त्रिपुरी पौर्णिमेच्या निमित्ताने चौलमधील श्री रामेश्वर मंदिर पुन्हा एकदा श्रद्धा, परंपरा आणि प्रकाशोत्सवाच्या उजेडात चमकले.




### 'निवडणुका बॅलेट पेपरवरच घ्याव्यात'

**पाली :** पारदर्शक व विश्वासहार्यतेसाठी निवडणुका बॅलेट पेपरवरच घ्याव्यात, अशी मागणी सुधागड तालुक्यातील नागरिकांनी केली आहे. या मागणीचे निवेदन शनिवारी (दि.१) पाली-सुधागड तहसीलदारांना देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही सुधागड वासियांच्यावतीने या अर्जाद्वारे आपल्या मार्फत महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगास विनम्र पूर्वक विनंती अर्ज करतो की, येणाऱ्या सर्व निवडणुका पारदर्शक व विश्वासाहार्य होण्यासाठी जुन्या बॅलेट पेपरवर निवडणुका घ्याव्यात. जगातील प्रगत देशात आणि विकसनशील देशात इव्हीएम मशीन वापरली जात नाही. तिथे आजही बॅलेट पेपरवर निवडणुका घेतल्या जातात. इव्हीएममध्ये छेडछाड होऊ शकते, ही त्यामागची कारणे आहेत. मताधिकार हा लोकशाहीचा श्वास आहे आणि संविधान लोकशाहीचा आत्मा आहे. तो सुरक्षित राहण्यासाठी बॅलेट पेपरवर निवडणुका घ्याव्यात, असे निवेदनात म्हंटले आहे.



### कोकण रेल्वेसाठी पाठपुरावा करणार

**महाड :** महाड शहराचे ऐतिहासिक, सामाजिक, पर्यटन आणि औद्योगिक महत्त्व लक्षात घेता, कोकण रेल्वेचा मार्ग महाड शहरातून नेण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. सध्या रेल्वेमार्ग शहरापासून जवळपास १५ किमी अंतरावरून गेला आहे. या मागणीचा ठोस पाठपुरावा करण्याची ग्वाही भिवंडीचे खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांनी दिली आहे. महाड येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मागील आठवड्यात पराग वडके यांनी या मागणीसाठी उपोषण केले होते. त्यानंतर तहसिलदार महेश शितोळे यांच्या अध्यक्षतेखाली कोकण रेल्वे अधिकारी आणि आंदोलनकर्त्यांची समन्वय बैठक झाली. या बैठकीस रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी अनुपस्थित राहिल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. जर प्रादेशिक वाहतूक व्यवस्थापकांना यायला वेळ नव्हता, तर आम्हीच रत्नागिरीला गेलो असतो, असेही ते म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, कोकण रेल्वेचा मूळ प्रस्तावित मार्ग वीर-गांधारपाले-महाड-महाबळेश्वर असा होता, मात्र तो वळसा घेऊन रोह्यातून नेण्यात आला. स्थानिक आमदार-खासदारांच्या निष्क्रियतेमुळेच हे घडले, असा आरोपही त्यांनी केला. या मार्गाबाबतचा प्रस्ताव आता मंत्रालयाकडे पाठवण्यात आल्याचे सांगत, तो मंजूर होण्यासाठी आपण केंद्रीय रेल्वे मंत्रालयात ठोस पाठपुरावा करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.



### शारदा मंदिरार तणाव मुक्त अभ्यास

**कर्जत :** आपल्या शाळेत तणाव मुक्त अभ्यास कसा करावा यासाठी शारदा मंदिर शाळेत मार्गदर्शन करण्यासाठी सेवा निवृत्ती विस्तार अधिकारी संग्राम सोलनकर याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी इयत्ता ८वी, ९ वी, १० वी चे विद्यार्थी मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापिका अंजली किसवे यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. संग्राम सोलनकर यांनी विद्यार्थ्यांना एक तास मार्गदर्शन केले यामध्ये अभ्यास कुठे करावा, किती वेळा एका ठिकाणी बसून अभ्यास करावा, सकाळी पहाटे केलेला अभ्यास तणावमुक्त असतो याची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना तणावमुक्त अभ्यासाची माहिती देण्यात आली सकाळी उठून गायत्री मंत्राचा जप व्यायाम करणे पालकांना दररोज नमस्कार करणे असे प्रयोजन व मार्गदर्शन सोलनकर सरांनी केले विद्यार्थ्यांना हे मोलाचे मार्गदर्शन खुप आवडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय सावंत यांनी केले.

# उरण-बेलापूर रेल्वेच्या फेऱ्या वाढवणार

- नवी स्थानके सुरू करण्याच्या हालचाली
- प्रवाशांना लवकरच मिळणार दुहेरी भेट




**| उरण | प्रतिनिधी |**

**मध्य रेल्वेच्या बेलापूर-उरण रेल्वेमार्गावरील प्रवाशांना आता दुहेरी भेट मिळणार आहे. रेल्वे प्रशासनाने या मार्गावर १० फेऱ्या वाढवण्याचे नियोजन पूर्ण केले आहे. त्याच बरोबर तरघर आणि गव्हाण या दोन रेल्वे स्थानकांची कामेदेखील पूर्ण झाली आहेत. फेऱ्या वाढीसह नवी स्थानके याच महिन्यात सुरू करण्याच्या हालचाली मध्य रेल्वेकडून सुरू झाल्या आहेत. नवी मुंबई विमानतळाच्या जवळ तरघर रेल्वे स्थानक असल्याने त्याचा फायदा प्रवासी आणि विमानतळ कर्मचाऱ्यांना होणार आहे.**

सध्या या मार्गावर लोकल गाड्यांची संख्या मर्यादित असल्याने प्रवाशांना गाडीसाठी बराच वेळ थांबावे लागत होते. गर्दीच्या वेळी लोकल एका तासाच्या अंतराने आणि इतर वेळी दीड तासांच्या अंतराने धावत असल्याने अनेकदा प्रवाशांना ताटकळत थांबावे लागत होते.

> **उरण तालुक्यातील प्रवाशी नागरीकांच्या हितार्थ रेल्वे प्रशासनाने रेल्वे फेऱ्यामध्ये वाढ करण्यासाठी निर्णय योग्य घेतला असला तरी जासई गावाजवळील गव्हाण रेल्वे स्टेशनचे नामकरण हे रेल्वे प्रशासनाने बदलून गव्हाण - जासई रेल्वे स्टेशन असे करावे अशी जासई ग्रामस्थांची मागणी आहे**
>
> **- संतोष घरत**
> **सरपंच जासई ग्रामपंचायत**

**४० वरून ५० फेऱ्या**

उरण- सीवूड -बेलापूर मार्गावर सुरुवातीला १० अप आणि १० डाउन लोकल फेऱ्या वाढवण्याचे नियोजन होते. मात्र प्रवासी तिकिट विक्री आणि प्रवासी संख्या लक्षात घेता एकूण १० लोकल फेऱ्या वाढवण्यावर एकमत झाले आहे. यामुळे उरण मार्गावरील एकूण फेऱ्यांची संख्या ४० वरून ५० वर पोहोचेल. वाढीव फेऱ्यांमुळे दोन फेऱ्यांमधील अंतर कमी होण्यास मदत होणार आहे, असे ही रेल्वे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

आता नव्या २० लोकल फेऱ्यांमुळे प्रवाशांना गाडीची वाट बघत बसावे लागणार नाही. त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. मध्य रेल्वेच्या मुख्य, हार्बर, ट्रान्स हार्बरच्या तुलनेत सीवूड बेलापूर-उरण मार्गावर लोकल फेऱ्या अत्यंत कमी आहेत.

उरण मार्गावर प्रवासी संख्या वाढत असतानाही, लोकल फेऱ्या वाढवण्यात आलेल्या नाहीत. उरण मार्गावर दीड तासाच्या अंतराने लोकल उपलब्ध आहे. यामुळे लोकल फेऱ्या वाढवण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात आली होती. सीवूड-बेलापूर-उरण मार्गावर पाच अप आणि पाच डाउन लोकल फेऱ्या वाढवण्यात येणार आहे. त्याचे नियोजन पूर्ण झाले आहे. सीवूड-बेलापूर-उरण मार्गावर पाच अप आणि पाच डाउन लोकल फेऱ्या वाढवण्यात येणार आहे. त्याचे नियोजन पूर्ण झाले आहे. यासह तरघर आणि गव्हाण ही दोन स्थानकेदेखील सुरू करण्यात येणार आहेत. दोन्ही रेल्वे स्थानकांतील कामे पूर्ण झाली आहेत. याच महिन्यात लोकल फेऱ्या आणि स्थानके एकाचवेळी खुली करण्यात येणार आहेत, असे रेल्वे अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.



• मुरुड येथील फणसाड अभयारण्यात 'ग्रीन बी' इतर नावाच्या दुर्मिळ पक्षाचे आगमन झाले आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## जोगेश्वरी मंदिरात तुलसी विवाह



**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता जोगश्वरी माता मंदिराच्या प्रांगणात त्रिपुरारी पौर्णिमे निमित्त जोगेश्वरी माता उत्सव समितीच्या वतीने आयोजित केलेला तुलसी विवाह सोहळा बुधवारी (दि.५) रात्री ८ वाजण्याच्या मुहूर्तावर मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. त्यावेळी यजमान म्हणून उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर व त्यांच्या पत्नी यांना पूजेचा मान मिळाला.

या तुलसी विवाह सोहळ्यास जोगेश्वरी देवस्थान विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्रश जैन, भाई टके, हरेश काळे, प्रकाश मोरे, चंद्रकांत ताडकर, संतोष चितळकर, विवेक देशपांडे, जितेंद्र कजबजे, उत्सव समितीचे पदाधिकारी, सर्व सदस्य आदींसह अनेक मान्यवर, नागोठणे शहरातील अबाल वृद्ध, नटून सजून आलेल्या महिला, तरुण-तरुणी व नागरिक या विवाह सोहळ्यास वऱ्हाडी मंडळी बनून मोठ्या संख्येने उपस्थित होते. विवाह सोहळा यशस्वी होण्यासाठी श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष नरेंद्रश जैन, भाई टके यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रकांत ताडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी अपार मेहनत घेऊन पूर्वापार चालत आलेली मंदिरातील तुलसी विवाहाची परंपरा अबाधित ठेवली आहे.



## श्री गुरुनानक जयंती साजरी

**| भाकरवड | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथे श्री गुरुनानक जयंती बुधवार (दि.५) नोव्हेंबर रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गुरुनानक यांच्या प्रतिमेचे पूजन करून करून आदरांजली वाहण्यात आली. यानिमित्त पोयनाड नाक्यावर चहा, नाश्ता, पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुखविंदर सिंग कोहली पाली, अरविंदर सिंग भाटिया, जितेंद्र सिंग, बलविंदर सिंग, धर्मेंद्रसिंह टीटू, दिनू सिंग भाटिया आदींनी परिश्रम घेतले. यावेळी सिख बांधवांच्या महिला वर्ग ही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## एको पॉईंटवर पर्यटकांची गैरसोय

### स्वच्छतागृह सुरू करण्याची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान शहरात हिवाळ्यातील गुलाबी थंडीचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटक येत असतात. पर्यटकांच्या सोयीसाठी प्रेक्षणीय स्थळी पर्यटक बहुसंख्यने जात असतात आणि त्यामुळे पर्यटकांच्या सोयीसाठी स्वच्छता गृह बांधले आहेत. मात्र शहरातील महत्वाच्या प्रेक्षणीय स्थळी उभारण्यात आलेले स्वच्छता गृह बंद अवस्थेत आहेत ते स्वच्छता गृह तात्काळ सुरू करण्यात यावेत अशी मागणी अश्वपालक यांनी नगरपरिषदेकडे केली आहे.




माथेरान सुप्रसिद्ध एको पॉईंट या ठिकाणी अनेक पर्यटक फिरायला येतात. याच ठिकाणी नगर परिषदेने नव्याने बांधलेले बाथरूम चालू करावे जेणेकरून महिलांना आणि पर्यटकांना होणारा त्रास आपण लक्षात घेतला पाहिजे. बाथरूमची योग्य ते सुविधा नसल्यामुळे पर्यटक आजूबाजूच्या जंगलाचा वापर करतात आणि जंगल सुद्धा खराब होत आहे. माथेरान पालिका पर्यटनासाठी येणारे पर्यटक यांच्याकडून स्वच्छता कर वसूल करीत असते. मात्र त्याबदल्यात कोणत्याही प्रकारच्या सुविधा पुरवित नाही. त्यात एको पॉईंट येथे पर्यटकांची दररोज होणारी गर्दी लक्षात घेता माथेरान नगरपरिषद कडून बसवण्यात आलेले स्वच्छता गृह तत्काळ खुले करण्यात यावे अशी मागणी स्थानिक अश्वपालक यांनी केले आहे.

माथेरान पालिकेने त्या ठिकाणी मे महिन्यात स्वच्छता गृह उभे केले आहे.पण ते स्वच्छता गृह पालिकेने खुले केले नाही आणि त्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे. त्याबद्दल तेथील रहिवाशी रेखा पाटील यांनी पालिकेकडे लेखी अर्ज करून मागणी केली होती. मात्र त्यांच्या मागणीवर देखील माथेरान पालिकेने दोन महिन्यात कोणतीही कार्यवाही केलेली नाही.त्यानंतर आता अश्वपालक राकेश कोकळे तसेच अन्य अश्वपालक यांनी पालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे यांना लेखी निवेदन देऊन एको पॉईंट वरील स्वच्छता गृह तात्काळ सुरु करण्याची मागणी केली आहे.

### सोन्याची चेन खेचून चोरटे पसार

**पनवेल:** रात्रीच्या जेवणानंतर शतपावलीसाठी घराबाहेर पडलेल्या महिलेच्या अंगावरील सोन्याची चेन खेचून दुचाकीवरून आलेले चोरटे पसार झाले आहेत. कामोठे पोलिसांनी या घटनेतील दोघा लुटारूंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. सुजाता वाघमारे (४०) या खारघर, सेक्टर-३६ मध्ये तर त्यांची बहीणही त्याच परिसरात राहतात. वाघमारे या कामानिमित्त त्यांच्या बहिणीकडे गेल्या होत्या. जेवल्यानंतर त्या शतपावली करण्यासाठी गेल्या होत्या. बिल्डिंगजवळ आल्या असताना दुचाकीवरून आलेल्या दोघा लुटारूंपैकी पाठीमागे बसलेल्या लुटारूने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून दोघे पसार झाले.

## चांदईतील शेतकरी हवालदिल

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात ऑक्टोबर महिन्यात चक्रीवादळ आले होते. त्यावेळी नुकसान झालेल्या शेतकरी यांना भाताचे पीक जमिनीमध्ये पाण्यात बुडाले आहे. भाताची नवीन रोपे कापण्याची वेळ या शेतकऱ्यांवर आली आहे. दरम्यान चांदई गावातील शेतकरी हवालदिल झाले असून भाताच्या शेतातून कोणतेही पीक शेतकऱ्यांचे घरी जाणार नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे.

चांधईत शेतकऱ्यांची भातशेती पावसाने जमीनदोस्त केली आहेत. परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला असून अनेक शेतकरी अस्मानी संकटाने अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. कर्जत तालुक्यात देखील शेतकऱ्यांनी लावलेल्या भातशेतीचे अतोनात नुकसान झाल्याने शासनाकडून भरपाई देण्याची मागणी शेतकरी करत आहेत. चांधईत शेतकरी अस्मानी संकटाने मेटाकुटीला आले आहेत. हातात आलेले भातपीक शेतामध्येच कुजत आहे. चांधईतील शेतकरी सरदार पाटील, अनंता कोळंबे, बबन कोळंबे, सुनील रसाळ, प्रकाश कोळंबे, महेश कोळंबे, दत्ता कोळंबे, बाळकृष्ण कोळंबे अशा अनेक शेतकऱ्यांच्या कापणीला आलेल्या भातपीकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



नव्याने उगवलेले गवत कापण्याची वेळ

## म्हसळ्यात उनाड गुरांचा सुळसुळाट

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा शहरात गेल्या अनेक वर्षांपासून पासून उनाड गुरांचा सुळसुळाट वाढला असून नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.रस्त्यांवर, बाजारपेठांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी गुरांचे मुक्त संचार सुरू असल्याने अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. उनाड गुरांचे मालक शहरातले नागरिक आहेत पण गुरे नजरेत ठेवून नागरिकांना त्रास देत उनाड सोडली असली असल्याचे दिसून येत आहे. नगर पंचायत प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील मुख्य रस्ता,बसस्थानक परिसर, तसेच बाजारपेठेत ही गुरे थाटात फिरताना दिसतात. अनेकवेळा ही जनावरे



वाहतूक अडवतात, दुकानदारांच्या समोर उभी राहून टाकाऊ पदार्थ खाऊ लागतात तसेच वाहनधारकांना त्रास देतात.रात्रीच्या वेळी या गुरांमुळे अपघातांची देखील नोंद झाली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार नगर पंचायत प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. शहरातील स्वच्छता मोहीम, वाहतूक व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य या तिन्ही बाबींवर या समस्येचा परिणाम होत आहे.

**किरवलीत श्री भैरवनाथाची यात्रा उत्साहात | दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित**

# त्रिपुरारी पौर्णिमानिमित्त डोलकाठीचा थरार

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील किरवली, हालीवली, वांजळे आदी गावांमध्ये त्रिपुरारी पौर्णिमा यात्रा स्वरूपात साजरी करण्यात येते. यंदा किरवली येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथाची यात्रा उत्साहात पार पडली. किरवली-देऊळवाडी येथे देवाची डोलकाठी नाचविली जाते. यंदा सुद्धा तरुण ग्रामस्थांनी ही डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर, हातावर ठेऊन नाचविली. हा थरार पहाण्यासाठी भाविकांनी गर्दी केली जाते. नवसाला पावणाऱ्या या दैवताचे दर्शन कर्जत शहरातील भाविकांबरोबरच परिसरातील भाविकांनीही मोठ्या संख्येने घेतले.



देऊळवाडी-किरवली येथील श्री भैरवनाथ मंदिराच्या परिसरात नवसाला पावणाऱ्या व परिसराचे रक्षण करणाऱ्या श्री भैरवनाथाची यात्रा पहाटे साडेचार वाजता काकड आरतीने सुरु झाली. त्यानंतर परिसरातील श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळाचे संगीत भजन झाले. परंपरेनुसार या डोलकाठीच्या टोकाला ढाक येथील चढण्या-उतरण्यास अत्यंत कठीण असलेल्या ढाक-भैरी मंदिरातून ट्रस्टचे सचिव दिलीप बडेकर यांच्या नेतृत्वाखाली आणलेला गरुड ध्वज आणला आणि काठीच्या तुऱ्यावर बांधला. या डोलकाठीची पुजारी प्रकाशबुवा बडेकर यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर डोलकाठीचा मोर पिसाऱ्याने शिवमंदिरातील शिवपिंडीला आरतीच्या वेळी वारा घालून ही तीस फुट उंचीची वजनी डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर व हातावर ठेऊन संकेत बडेकर, दीपक आंग्रे, सौरभ बडेकर, वैभव थोरवे, सुयोग गायकर, ओमकार बडेकर, दीपक आंग्रे, निखिल पन्हाळे, विनीत शेलार, पप्पू पाटील, विनायक बडेकर, प्रसाद बडेकर आदींनी नाचवित नेली. ही वजनी डोलकाठी नाचविण्यासाठी ताकदीची गरज नसते तर अनुभवाची आवश्यकता असते.

डोलकाठी नाचवीत देऊळवाडी, पुलाचीवाडी, बोरवाडी, किरवली येथे नेण्यात आली. त्या पाठोपाठ श्री भैरवनाथाची पालखी सावळाराम बडेकर,आणि अंकुशबुवा बडेकर, किशोर बडेकर, वासुदेव बडेकर, विजय पन्हाळे, भरत थोरवे, निखिल पन्हाळे, गजानन बडेकर यांनी उचलली. प्रत्येक घरी पालखीत असलेल्या अश्वारूढ श्री भैरवनाथाच्या मूर्तीची मनोभावी आरती व पूजा करण्यात आली. दिवेलागणीच्या सुमारास सुवासिनींनी उकडलेल्या पिठाचे दिवे सुपातून उडविले. पूर्वी हे दिवे घेण्यासाठी एकच झुंबड असे. ते खाण्यात वेगळीच मजा येत होती परंतु कालानुरूप त्यात बदल झाला असून हल्ली उडविलेले दिवे उचलण्यासाठी मुले येत नाहीत. दर्शन घेण्यासाठी व नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी होती. पुत्रप्राप्तीसाठी केलेला नवस बालकांचा गुळाची तुला करून करण्यात येत होता. नवजात बालकांना सुधा श्री भैरवनाथाच्या पायाशी ठेऊन दर्शन घेण्यासाठी सुद्धा गर्दी होती. एकंदरीत त्रिपुरारी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी बबन बडेकर, ज्ञानेश्वर तुरडे, भास्कर बडेकर, नारायण बडेकर, दिलीप बडेकर, यश महाराज बडेकर, नथुराम साळोखे, हनुमंत गायकर, बिपीन बडेकर, रत्नाकर बडेकर सागर बडेकर वैभव थोरवे, प्रकाश बडेकर, प्रभाकर बडेकर, जीवन बडेकर, रामचंद्र बडेकर, चंद्रकांत थोरवे, जयवंत बडेकर, कैलास बडेकर, शत्रुघ्न बडेकर, महेश शेलार, अरविंद बडेकर, प्रकाश पप्पू आदी उपस्थित होते.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)






## राशीभविष्य

- **मेष** : दिवसभरात महत्त्वाच्या घडामोडी घडतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. स्वमताग्रह टाळावा.
- **वृषभ** : हाती घेतलेली कामं मार्गी लागतील. आप्तेष्टांचं उत्तम सहकार्य लाभेल. जुन्या ओळखींचा लाभ घ्या.
- **मिथुन** : गेलेल्या संधी पुन्हा लाभतील. नव्या उमेदीनं कार्यरत रहाल. आर्थिक आमिषाबाबत सावध रहावं.
- **कर्क** : कारकिर्दीत नव्या वाटा दृष्टीपथात येतील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **सिंह** : कौटुंबिक प्रश्नात दिलासा मिळेल. आर्थिक बाबतीत ओढाताण राहील. वरिष्ठांशी मतभेद संभवतात.
- **कन्या** : मनाविरूध्द घटना संभवतात. स्थापत्य क्षेत्रात नव्या संधी लाभतील. वाहनांचा वापर जपून करा.
- **तूळ** : अचानक धनलाभ संभवतो. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. कौटुंबिक समाधान लाभेल.
- **वृश्चिक** : मनातील इच्छा फलद्रुप होतील. भागीदारी व्यवसायात सावध रहावं. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **धनु** : अंगभूत कला-गुणांना वाव मिळेल. मुलांच्या प्रश्नांची चिंता राहील. विवाहाच्या प्रयत्नात ताण येईल.
- **मकर** : कारकिर्दीच्या क्षेत्रात तुमचं महत्त्व वाढेल. बोलण्यातून इतरांवर प्रभाव पडेल. स्पर्धेत यश मिळेल.
- **कुंभ** : मानसिक अस्वास्थ राहील. विवाहाबाबत तडजोडीची भूमिका ठेवावी. तांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **मीन** : नव्या ओळखी कामी येतील. व्यवसायात अडचणी वाढतील. आर्थिक व्यवहारात नुकसान संभवतं.

ब्युटी टॉक

## तंत्र खोट्या पापण्यांचं

डोळ्यांचं सौंदर्य खुलवण्यासाठी वेगवेगळे फंडे लढवले जातात. सध्या फेक आयलॅश म्हणजे खोट्या पापण्यांचा ट्रेंड जोरात आहे. पण अनेकजणींना या खोट्या पापण्या लावण्याची भीती वाटते. पापण्यांची निवड कशी करायची हे कळत नाही. पापण्या लावण्याचं तंत्र माहित नसतं. यामुळे पापण्या नीट चिकटत नाहीत किंवा पडून जातात. असं होऊ नये म्हणून खोट्या पापण्या लावण्याचं तंत्र आपण जाणून घेऊया.

* खोट्या पापण्या लावण्याआधी डोळ्यांचा मेक अप करून घ्या. मेक अप करण्याआधी पापण्या लाऊनयेत. मेक अप केल्यानंतर चिकटवल्याने पापण्या नीट चिकटतात. तसंच डोळ्यांचा मेक अप खराब होत नाही. * डोळ्यांच्या आकारानुसार खोट्या पापण्यांची निवड करावी. या पापण्या फार मोठ्या किंवा छोट्या असू नयेत. आकार जास्त मोठा असेल तर या पापण्या कात्रीने कापून घ्याव्यात. * खोट्या पापण्यांच्या कडेला गम लाऊन घ्या. त्यानंतर या पापण्या डोळ्यांवर चिकटवा. खोट्या पापण्या खऱ्या पापण्यांच्या वरच्या बाजूने लावायला हव्यात. पातळ ब्रशचा वापर करून पापण्या नीट सेट करा. थोडा दाब द्या.

दिनविशेष

## ७ नोव्हेंबर

- १८८८ : थोर शास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकटरमण यांचा जन्म.
- १९९६ : नायजेरियाचे बोईंग ७२७ प्रकारचं विमान लागोसपासून आग्नेय दिशेस ४० मैलांवर कोसळलं. दुर्घटनेत १४३ ठार.
- १९९६ : नासातर्फे मार्स ग्लोबल सर्वेयरचं प्रक्षेपण.
- २००० : इराणने अमेरिकन वस्तूंच्या जाहिरातींवर बंदी घातली.
- २००६ : प्रसिद्ध क्रिकेटपटू पॉली उम्रीगर यांचं निधन.
- २०१३ : पाकिस्तानी तालिबानची सूत्रं मौलाना फजलुल्लाकडे सोपवण्यात आली.

फन टाईम

## झाडांबद्दल जाणून घ्या

छोट्या दोस्तांनो, 'झाडं लावा, झाडं जगवा' हे वाक्य तुम्ही बरेचदा ऐकलं असेल. झाडांबद्दल सगळं काही जाणून घ्यायचं असेल तर www.treetures.com या साईटला भेट द्या. या साईटवर झाडांशी संबंधित सगळी माहिती उपलब्ध आहे. या साईटच्या होमपेजवर तुम्हाला वेगवेगळी पात्रं दिसतील. त्यावर क्लिक केलं की झाडाच्या प्रत्येक भागाची माहिती मिळू शकेल. या साईटवर रंजक माहितीही आहे.

झाडं कशी लावायची, त्यांचं संवर्धन कसं करायचं हे सगळं या साईटवर आहे. रंग बदलणारी पानं, जंगलांची रचना, वणवा कसा लागतो, झाडं कशी वाढतात, झाडांना कीड कशी लागते हे सगळं यावर आहे. इथे झाडांविषयीचं ज्ञान वाढवणारे गेम्स आहेत. छान छान व्हिडिओ आहेत. चांगल्या आणि वाईट कीटकांची वर्गवारी करण्यात आली आहे. काही कीटक झाडांच्या वाढीला मदत करतात. झाडांचं नुकसान करणारे किडे खातात तर काही कीटक पानं खातात. झाडांची वाढ रोखतात. इथे तुम्ही अशा कीटकांची माहिती मिळवू शकता. मग काय दोस्तांनो, झाडांना वाहिलेल्या या साईटला भेट देणार ना?

आरोग्यमंत्र

## व्यायाम महत्त्वाचा

मासिक पाळी संपण्याचा काळ रजोनिवृत्तीचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात महिलांना बऱ्याच शारीरिक आणि मानसिक समस्यांचा सामना करावा लागतो. उदाहरणार्थ या अवस्थेत शरीरात गरम वाफा आल्यासारखं वाटण्याचा त्रास होतो. चिडचिड आणि अस्वस्थताही वाढते. हा त्रास थोड्या प्रमाणात असेल तर सहन केला जातो; अन्यथा तो डॉक्टरांकडून उपचार करवून घेण्याइतपत वाढल्याचंही दिसतं. मात्र असा त्रास होऊ न देणं महिलांच्याच हातात असल्याचं संशोधकांनी सिद्ध केलं आहे. नियमित व्यायाम करणं हा यावरचा सोपा उपाय आहे.



संशोधकांनी रजोनिवृत्ती जवळ आलेल्या २१ महिलांचा नियमित व्यायाम करुन घेतला. घाम आल्यानंतर आपोआपच शरीराचं तापमान नियंत्रित झाल्याचं आणि त्यानंतर त्यांना दिवसभर गरम वाफा आल्यासारखं वाटण्याचा त्रास झाला नसल्याचं आढळून आलं. त्यापूर्वी अनेकींना शंभर किंवा त्याहून अधिक वेळा हा त्रास होत असे. यावेळी महिलांचं सर्वसामान्य आरोग्य आणि मेंदूला होणारा रक्तपुरवठा यांचीही चाचणी करण्यात आली. उष्णतेचा तणाव (हीट स्ट्रेस) मोजण्यासाठी महिलांना पाण्यानं भरलेले सूट घालायला सांगण्यात आलं. पाण्याचं तापमान वाढवून महिलांचा प्रतिसाद तपासण्यात आला आणि या सर्व प्रयोगावरून असं दिसून आलं की रोज ४५ मिनिटं जॉगिंग किंवा सायकलिंग करणाऱ्या महिलांचा हा त्रास ६० टक्क्यांनी कमी होतो.

## पंचांग

**शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
कार्तिक कृ. २, चंद्रराशी : वृषभ,
नक्षत्र : रोहिणी, योग : परिघ.
सूर्योदय ६. ४४, सूर्यास्त ६.०१

## फॉरवर्डस

**यें शान-औ-शौक़त-ए-आलम सदा क़िसी क़ी नहीं...**

**चिराग़ सबकें बूझेंगे हवा क़िसी क़ी नहीं...!**

## फॅशन पॅशन

मित्रांनो, लवकरच थंडी सुरू होणार आहे. थंडीत कपाटातले स्वेटर बाहेर पडतात. स्वेटर आता फक्त थंडीसाठी बचाव करण्यापुरता वापरला जात नाही. तर स्टाईल स्टेटमेंट म्हणून त्याचा वापर केला जातो. स्वेटरचा खुबीने वापर करून तुम्ही थंडीतली स्टाईल जपू शकता.

* थंडीत ऑल ब्लॅक लूक कॅरी करता येईल. ब्लॅक स्वेटर, ब्लॅक शायनी जीन्स आणि ब्लॅक शूज घालून तुम्ही मस्त मिरवू शकता. थंडीत गडद रंग कॅरी करता येतात. त्यामुळे तुम्हीही काळ्या रंगात रंगायची संधी सोडू नका. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## अन्न प्रक्रिया उद्योगातील संधी

सध्याच्या काळातील अन्न प्रक्रिया उद्योगाला आलेलं महत्त्व वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. या क्षेत्रात प्रक्रियायुक्त अन्न पदार्थांचा दर्जा राखला जावा यासाठी अन्नप्रक्रिया शास्त्राचं पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या प्रशिक्षित तरुणांची गरज असते. त्यातूनच इथे प्रचंड संधी उपलब्ध आहेत. या संदर्भातील अभ्यासक्रम मैसूर येथील सेंट्रल फूड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिट्यूट (सीएफटीआरआय) या संस्थेमध्ये उपलब्ध आहे. तिथे अन्न प्रक्रिया उद्योगाचं पदव्युत्तर पदवीचं शिक्षण दिलं जातं. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी इच्छुक उमेदवार पदवीधर असला पाहिजे. त्यानं रसायनशास्त्रासह विज्ञानाची किंवा कृषी शास्त्राची पदवी घेतलेली असावी. अभियांत्रिकी किंवा तंत्रज्ञान यांच्याशी संबंधित पदवीधारकही यासाठी अर्ज करू शकतात. बी.एस्सी. पदवीधरांनी किमान ५५ टक्के मार्क मिळवणं आवश्यक आहे. कृषी, अभियांत्रिकी या विषयातील पदवीधरांना किमान दुसरा वर्ग मिळालेला असावा. दोन वर्षांच्या अभ्यासक्रमानंतर एम.एस्सी. विथ फूड टेक्नॉलॉजी अशी पदवी दिली जाते. ही पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना आईस्क्रिमचे कारखाने, दुग्ध प्रक्रिया करणाऱ्या संस्था, इन्स्टंट फूड तयार करणारे उद्योग यात नोकऱ्या मिळतात.




खेचाखेची

## चुकीची जमात

इथिओपियातील बोडी जमातीमध्ये सर्वात जास्त पोट असलेल्या पुरुषांना लग्नासाठी खूप मागणी असते. पोट जितके जास्त तितके तुम्ही आकर्षक, असा तिथला रिवाज आहे.

.
.
.

मी हे तुम्हाला यासाठी सांगतोय की, तुम्ही लठ्ठ नाही आहात, फक्त चुकीच्या जमातीत जन्माला आला आहात.

## वेगळं काही

चीनच्या शिंहुआ या सरकारी वृत्तवाहिनीने व्हर्च्युअल वृत्तनिवेदक ही संकल्पना राबवली आहे. सुटाबुटातला हा वृत्तनिवेदक बातम्या देतो. त्याचा आवाज, हालचाली रोबोटसारख्या वाटू शकतात. व्हर्च्युअल वृत्तनिवेदकामुळे निर्मितीच्या पैशांमध्ये बचत करता येईल, असं शिंहुआ वृत्तवाहिनीच्या व्यवस्थापनाचं म्हणणं आहे. वेळोवेळी ब्रेकिंग न्यूज देण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरेल, असंही त्यांना वाटतंय. व्हर्च्युअल वृत्तनिवेदकाच्या निर्मितीसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करण्यात आला आहे. अर्थात हा व्हर्च्युअल वृत्तनिवेदक म्हणजे माणसाचं थ्रीडी डिजिटल मॉडेल नाही. त्यामुळे या निवेदकांच्या चेहऱ्यावर कोणत्याही भावभावना नसतात. अगदी कोरड्या चेहऱ्याने ते बातम्या देतात.

रुचिरा

## घरीच बनवा आईस्क्रीम

घरी केलेल्या आईस्क्रीमची लज्जत काही वेगळीच! तुम्हीही हा प्रयोग करुन बघणार असाल या रेसिपीज उपयुक्त ठरतील.



*** ब्लूबेरी कोकोनट पॉप्सिकल्स**

**साहित्य-** दोन कप करवंदाचा गर, चार टेबलस्पून पाणी, पाच टेबलस्पून मेपल सिरप, नारळाचं दूध, बदामाचं दूध इत्यादी. **कृती -** करवंदांचा गर, पाणी आणि तीन टेबलस्पून मेपल सिरप उकळून घ्यावं. दुसरीकडे नारळाचं दूध, दोन टेबलस्पून मेपल सिरप आणि बदामाचं दूध एकत्र करावं. पॉप्सिकल्सच्या मोल्डमध्ये अर्ध्यापर्यंत करवंदाचं मिश्रण आणि नंतर नारळाच्या दुधाचं मिश्रण घालावं. मोल्ड फ्रीजमध्ये ठेवावे.

**दही आईस्क्रीम**

**साहित्य-** अर्धा कप दही, पाव कप साखर, अर्धा कप क्रीम, व्हॅनिला इसेंस, दहा काजू , चार बिस्कीट. **कृती-** दही आणि साखर फेटून त्यात क्रीम आणि व्हॅनिला इसेंस घालावं. काजूचे काप आणि बिस्कीटांचे तुकडे घालावेत. मिश्रण फ्रीजरमध्ये ठेवावं. पाच ते सहा तासांनी आईस्क्रीम तयार होईल.

## सुडोकू २४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ८ | | | ९ | | ५ | | |
| | ९ | | | | | २ | ८ | |
| | ५ | ७ | | | ४ | | | |
| | | | ७ | | ५ | | | ८ |
| ९ | ७ | ५ | | ८ | | १ | ६ | २ |
| १ | | | ९ | | २ | | | |
| | | | ३ | | | ८ | २ | |
| | १ | ३ | | | | | ९ | |
| | | ६ | | ४ | | | ५ | ७ |

**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ४ | ७ | ८ | २ | ६ | ५ | ३ | १ |
| १ | ८ | ३ | ५ | ४ | ९ | ७ | २ | ६ |
| २ | ५ | ६ | ३ | ७ | १ | ४ | ८ | ९ |
| ४ | ९ | ५ | १ | ३ | ७ | २ | ६ | ८ |
| ८ | ७ | २ | ९ | ६ | ४ | ३ | १ | ५ |
| ६ | ३ | १ | २ | ८ | ५ | ९ | ४ | ७ |
| ५ | ६ | ८ | ४ | ९ | ३ | १ | ७ | २ |
| ३ | २ | ९ | ७ | १ | ८ | ६ | ५ | ४ |
| ७ | १ | ४ | ६ | ५ | २ | ८ | ९ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक २४

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | | ■ | ११ | | | | ■ | १२ | | १३ | | ■ |
| | ■ | १४ | १५ | ■ | | ■ | १६ | | ■ | १७ | | ■ | १८ |
| १९ | २० | ■ | २१ | २२ | ■ | २३ | | ■ | २४ | | ■ | २५ | |
| ■ | २६ | २७ | | | | ■ | ■ | २८ | | | २९ | | ■ |
| ३० | | | ■ | | ■ | ३१ | ■ | ३२ | | ■ | ३३ | | |
| ३४ | | ■ | ■ | ३५ | | | ३६ | | ■ | ३७ | ■ | | ■ |
| | ■ | ३८ | | | ■ | ■ | | ■ | ३९ | | ■ | ४० | ४१ |
| ४२ | | | ■ | ४३ | ४४ | | ■ | ४५ | | | | ■ | |
| | ■ | ४६ | | ■ | | ■ | ४७ | | ■ | | ■ | ४८ | |
| ४९ | ५० | | ■ | ५१ | | ५२ | | | | ■ | ५३ | | ■ |
| ■ | ५४ | | ५५ | | ■ | | ■ | | ■ | ५६ | | | ५७ |
| ५८ | | ■ | ५९ | | ६० | | | ■ | ६१ | | | ■ | |
| ६२ | | | | ■ | ६३ | | ■ | ६४ | | ■ | ६५ | | |

**आडवे शब्द :-**

१) मालाचे येणे-जाणे
६) नल राजाची पत्नी
९) मलई
१०) वितरण
११) क्षमा करण्याचा स्वभाव
१२) उंबरठा
१४) एकाग्र नजर
१६) वेदना, दु:ख (हिं.)
१७) पदार्थाचा सूक्ष्म भाग
१९) बोटाच्या टोकावरील कडक आवरण
२१) पवित्र
२३) टरफल
२४) पत्नी, स्त्री
२५) जाडसर
२६) प्रफुल्लित
२८) मोगऱ्याची एक जात
३०) वसन, वस्त्र
३२) मासा पकडण्याचे साधन
३३) अव्यवस्थित राहणारा
३४) सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
३५) रोजच्या रोज दुकानासाठी पाल लावावयाचे व रोजच्या रोज काढायचे असे करणारे दुकानदार जेथे आहेत तो बाजार
३८) अडत्या
३९) बंधन
४०) संताप
४२) वही
४३) बाज विणण्याची सुती पट्टी
४५) देऊळ
४६) फक्त, केवळ
४७) चरणे,गिळंकृत करणे
४८) अंत:करण
४९) पाण्यासाठी खणलेला खड्डा, उतरणे, टेकडी
५१) एकादे काम करण्याचे मनापासून ठरविणे
५३) योग्य, उचित
५४) जा-ये असणे
५६) दिवसाचा सूर्य
५८) कर्णेंद्रिय
५९) खाली पडू न देता, सतत
६१) पदर
६२) करंजी
६३) लक्ष-एक आकडा
६४) सावली
६५) कडक

**उभे शब्द :-**

१) बोलाविणे
२) कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ
३) लबाडी, कारस्थान
४) छाती
५) जास्तीत जास्त
६) चिखलाची जमीन
७) चालू वर्षी
८) चापबाण
९) साठवून ठेवलेले
१३) माराची खूण
१५) अलमारी
१८)कुंभाराची भट्टी
२०) प्रयत्न
२२) अनेक कवींचे काव्य वाचनाचा कार्यक्रम
२४) सोसाट्याचा वारा
२५) युद्धासाठी उतावळा झालेला
२७) पारंब्याचा वृक्ष
२८) सुसर
२९) बगीचा
३०) कपडालत्ता
३१) रत्नागिरीचे प्रसिद्ध फळ
३६) हातचलाखी
३७) दहा लाख
३८) लपून बसणे
३९) बासरी
४१) आकाश
४४) वाईट इच्छा
४५) देवाण-घेवाण
४७) चानी
४८) डोके, शिर
५०) गणेशाचे एक नाव
५१) सापाची एक जात
५२) तीव्र भूक, अधाशीपणा
५३) रानात जाणारा रस्ता
५५) रेशमी कद, पितांबरा साठी प्रसिद्ध असलेले गाव
५६) हृदय (हिं.)
५७) धोबी
५८) चुलता
६०) शिष्य
६१) इमारतीचा मूळ आधार.

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | म | र्थ | क | ■ | ■ | रा | ज | स्था | न | गु | ज | रा | त |
| न | शा | ■ | था | पे | बा | ज | ■ | न | ग | ■ | न | ज | र |
| स | ल | ग | ■ | ह | ल | वा | ई | ■ | र | ज | नी | ■ | फ |
| ना | ■ | म | दि | रा | ■ | डा | ■ | क | पा | र | ■ | वा | दा |
| टी | का | ■ | वा | व | डी | ■ | ह | मा | ल | ■ | त | या | री |
| बा | ल | क | ■ | ■ | र | सा | त | ल | ■ | स | ण | ■ | ■ |
| त | ■ | प | द | क | ■ | स | भा | ■ | घ | म | घ | मा | ट |
| मी | न | ■ | शा | ल | ■ | रा | गी | ट | ■ | ■ | र | ■ | व |
| ■ | रा | स | ■ | क | ■ | ■ | ■ | पा | ल | व | ■ | का | का |
| म | ध | ■ | ज | ला | भा | स | ■ | ल | ■ | ज | र | त | र |
| ■ | म | न | ग | ट | ■ | म | स | ■ | रा | न | ■ | ■ | णे |
| का | ■ | य | ■ | ■ | क | र | क | री | त | ■ | ■ | आ | ■ |
| ज | न | न | म | र | ण | ■ | ला | ■ | सा | म | र्थ्य | वा | न |
| वा | ट | ■ | स | ■ | व | रा | त | ■ | र | त | ■ | ज | ड |

# अहमदाबादेत टी-२० वर्ल्डकप फायनल?

## || पाकिस्तान फायनलला पोहोचला तर सामना तटस्थ ठिकाणी; वेळापत्रक लवकरच होणारा जाहीर

| अहमदाबाद | वृत्तसंस्था |

२०२६ च्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यासाठी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमची निवड करण्यात आली आहे. वृत्तानुसार, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला (आयसीसी) संभाव्य स्थळांची यादी सादर केली आहे, ज्यामध्ये अंतिम सामन्यासाठी हे स्टेडियम समाविष्ट आहे.२०२६ चा टी२० विश्वचषक भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे आयोजित करणार आहेत.

अंतिम सामन्याव्यतिरिक्त, उपांत्य फेरी आणि इतर महत्त्वाच्या सामन्यांसाठी विविध शहरांमधील ठिकाणे निवडण्यात आली आहेत. बीसीसीआयच्या शॉर्टलिस्टमध्ये अहमदाबाद हे अंतिम सामन्यासाठी पसंतीचे ठिकाण आहे, परंतु अंतिम निर्णय आयसीसीचा आहे.

जर पाकिस्तान अंतिम फेरीत पोहोचला तर स्पर्धेचा शेवटचा सामना (कोलंबो) तटस्थ ठिकाणी खेळवला जाईल. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी, बीसीसीआय आणि पीसीबीने भविष्यात दोन्ही संघ एकमेकांच्या देशात प्रवास करणार नाहीत, तर त्यांचे सामने तटस्थ ठिकाणी खेळतील यावर सहमती दर्शवली. बीसीसीआयने त्यांचे प्रस्तावित वेळापत्रक आयसीसीकडे सादर केले आहे, जे लवकरच जाहीर होण्याची अपेक्षा आहे.



### वेळापत्रक अद्याप अंतिम झालेले नाही

आयसीसीने सध्या सर्व संघांना फक्त तात्पुरत्या तारखा पाठवल्या आहेत. अंतिम वेळापत्रक अद्याप निश्चित झालेले नाही. २०२४ प्रमाणे या स्पर्धेत २० संघांचा समावेश असेल आणि त्यात ५५ सामने असतील.प्रत्येकी पाच संघांना चार गटात विभागले जाईल. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ सुपर ८ मध्ये प्रवेश करतील. त्याच गटात, प्रत्येकी चार संघांना दोन गटात विभागले जाईल. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. उपांत्य फेरीतील विजेत्यांमध्ये अंतिम सामना खेळवला जाईल.

### भारतातील ५ ठिकाणांची निवड

बीसीसीआयने या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी अहमदाबाद, दिल्ली, कोलकाता, चेन्नई आणि मुंबई या शहरांची निवड केली आहे. वृत्तानुसार, श्रीलंकेतील तीन स्टेडियम देखील सामने आयोजित करण्यासाठी निवडले जातील, परंतु ते कोणत्या ठिकाणी असतील हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. यावेळी भारत श्रीलंकेसोबत या स्पर्धेचे सह-यजमानपद भूषवत असल्याने बंगळुरू आणि लखनौ हे यजमान स्थळ म्हणून समाविष्ट केले जातील की नाही हे देखील निश्चित झालेले नाही.बीसीसीआयने आधीच स्पष्ट केले आहे की आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक सामने ज्या ठिकाणी खेळवले गेले ते ठिकाण पुरुषांच्या स्पर्धेसाठी निवडले जाणार नाही. महिला विश्वचषक सामने गुवाहाटी, विशाखापट्टणम, इंदूर आणि नवी मुंबई येथे खेळवले गेले.

भारत, वेस्ट इंडिज आणि इंग्लंडने प्रत्येकी २ जेतेपदे जिंकली आहेत. २००७ मध्ये टी-२० विश्वचषकाची सुरुवात झाली. पहिल्या आवृत्तीत भारताने अंतिम फेरीत पाकिस्तानला हरवून विजेतेपद पटकावले. सतरा वर्षांनंतर, २०२४ मध्ये, भारताने अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेला हरवून दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले. भारताव्यतिरिक्त, वेस्ट इंडिज आणि इंग्लंडनेही प्रत्येकी दोन विजेतेपद जिंकले आहेत. पाकिस्तान, श्रीलंका आणि ऑस्ट्रेलियाने प्रत्येकी एक विजेतेपद जिंकले आहे.

# सुरेश रैना, शिखर धवन यांना ईडीचा झटका

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



सक्तवसुली संचालनालयाने पीएमएलएकायद्यातीलतरतुदींनुसार माजी भारतीय क्रिकेटपटू सुरेश रैना आणि शिखर धवन यांची ११.१४ कोटी रुपयांची जंगम आणि स्थावर मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे.

ईडीनेजप्तकेलेल्यासंपत्तीमध्ये सुरेश रैनाच्या नावावर असलेली ६.६४ कोटी रुपयांची म्युच्युअल फंड गुंतवणूक आणि शिखर धवनच्या नावावर असलेली ४.५ कोटी रुपयांची स्थावर मालमत्तेचा समावेश आहे.

विविध राज्यांच्या पोलीस यंत्रणांनी अवैध ऑफशोअर बेटिंग प्लॅटफॉर्म १ च्या चालकांविरुद्ध नोंदवलेल्या अनेक च्या आधारावर अंतर्गत तपास करण्यात आला. ईडीने केलेल्या तपासामध्ये हे उघड झाले आहे की १ आणि त्याचे सरोगेट ब्रँड म्हणजे १ आणि १ संपूर्ण भारतात अवैध ऑनलाइन बेटिंग आणि जुगाराला प्रोत्साहन देण्यात आणि त्या सहजपणे लोकांपर्यंत पोहचवण्यात गुंतलेले असल्याचे आढळून आले.

### ३६ वी किशोर किशोरी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२५

# परभणी, नाशिक शहर, पिंपरी चिंचवड संघांची विजयी सलामी

| पुणे | वृत्तसंस्था|

३६ व्या किशोर किशोरी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी व आमदार चषक कबड्डी स्पर्धेत परभणी व नाशिक शहर या गत विजेत्या संघांबरोबर गत उपविजेत्या पिंपरी चिंचवड संघानी दोन्ही विभागात विजयी सलामी दिली.

मुलांमध्ये परभणी संघाने बीड संघावर ४५- ३५ असे पराभूत केले. पुवार्धात एक लोण देत २९-१९ अशी आघाडी घेणाऱ्या परभणीने उत्तरार्धात मात्र अतिशय सावध खेळ केला. परभणीच्या पार्थ गिरी, विठ्ठल डकरे व राहुल चव्हाण यांच्या संयमी खेळाला या विजयाचे श्रेय जाते. बीड करांनी पूवार्धात ९ व उत्तरार्धात ५ बोनस घेत सामन्यात रंगत राखली, बीडचे रोहित राठोड, सुरज झगडे यांनी चांगला खेळ केला.



पिंपरी चिंचवड संघाने रायगड संघाला २४३-३६ असे नमविले. पहिल्या डावात दोन व दुसऱ्या डावात दोन लोण देत सामना आपल्या हातुन निसटणार नाही याची पिंपरी चिंचवड संघाने काळजी घेतली. पिंपरी चिंचवडचे सग्राम भालेकर, सुरज डाखोरे व अमर राठोड यांनी बहारदार खेळ केला. रायगडच्या विग्नेश बनगे व अनुज मगर चांगला प्रतिकार केला.

किशोरी गटात नाशिक शहर संघाने ठाणे ग्रामीण संघाला ४९-२० असे सहज नमवित आपण या स्पर्धेचे संभाव्या दावेदार आहोत हे दाखवून दिले. नाशिक संघाने पुवार्धात दोन लोन देत २४-८ अशी भक्कम आघाडी घेतली. उत्तरार्धातही हा जोश राखत आणखी दोन लोन देत सामना आपल्या बाजुला सहज झुकविला. नाशिक शहर संघाच्या धनश्री शिंदे यांच्या झंजावती खेळाला या विजयाचे श्रेय जाते.

# वसतिगृहात शिकणाऱ्या मुलींच्या संघाची बाजी

| नेरळ | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या अंतर्गत राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजित नाशिक जिल्हा तालुका क्रीडा संकुल नाशिक येथे उत्साहात पार पडली. या राज्यस्तर टेनिस क्रिकेट स्पर्धेत माधेरान व्हॅली स्कूल वंजारपाडा शाळेच्या वसतिगृह मुलींची निवड झाली होती. या मुलींचा संघ रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत महाराष्ट्र संघातून राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाली आहे .

राज्य टेनिस क्रिकेट असोसिएशनचे नाशिक येथील मैदानावर झालेल्या स्पर्धेचा समारोप राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या उपस्थितीत झाला.त्यावेळीं इंडिया फेडरेशन आणिमहाराष्ट्र राज्य टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सेक्रेटरी मीनाक्षी गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती.



या रायगड संघात वेगवेगळ्या प्रकल्पाच्या मुलींचा सहभाग आहे.

रायगड संघाच्या कर्णधार भाग्यश्री वासावे आणि उपकर्णधार आर्या माळी हिने जबाबदारी बजावली. स्पर्धेत भाग्यश्री वासावे आणि जुई वसावे या दोघींनी स्पर्धेची ओपनिंग खेळी करत धावा गोळा गेल्या. तर बॉलर आयेशा, आर्या, वृषाली, गायत्री, भाग्यश्री यांनी सांगली जिल्ह्याला रोखून ठेवले होते. चुरशीच्या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत मात्र दुसऱ्याच स्थानावर समाधान मानावे लागले. या संघात वसतिगृह मध्ये राहून शिक्षण घेणाऱ्या भाग्यश्री वासावे, आर्या माळी, आयेशा गोंड, गायत्री डामसे, वृषाली डवला, जुई वासावे, लक्षवेधी नाठे, तन्वी जाबर, भाविका गावीत, तन्वी चौधरी, विद्या भोये यांचा समावेश होता.

यशस्वी संघाचे माथेरान व्हॅली स्कूल चे शाळेच्या मुख्याध्यापिका मृदुला पटेल, प्रशिक्षक स्वप्निल अडूरकर आणि करण बाबरे यांनी अभिनंदन केले आहे.

# ध्रुव जुरेलने भारताला तारले

| मुंबई | प्रतिनिधी |

भारत अ संघाने दक्षिण आफ्रिका अ संघाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत ध्रुव जुरेलच्या शतकाच्या जोरावर २३० धावांचा टप्पा पार केला. रिषभ पंतच्या नेतृत्वाखालील संघाची सुरुवात खराब झाली होती, परंतु जुरेल आणि कुलदीप यादवने भागीदारी करत संघाला सावरण्यात मदत केली. दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली, परंतु जुरेलच्या खेळीने भारताला मजबूत स्थितीत नेले.

या सामन्यात भाकतीय अ संघाची सुरुवात फारशी चांगली झाली नव्हती. पण ध्रुव जुरेलने अफलातून फलंदाजी करत शतकी खेळी केली, त्याला कुलदीप यादवची भक्कम साथ मिळाली. जुरेलने ही खेळी करत सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधले असून कसोटी संघातील स्थानासाठी दावेदारी ठोकली आहे.या सामन्यात दक्षिण आफ्रिका अ संघाने नाणेफेक जिंकून भारत अ संघाला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. पण भारताने अभिमन्यू ईश्वरन दुसऱ्याच षटकात शून्यावरच शेपो मोरेकीच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंचर केएल राहुल, साई सुदर्शन आणि देवदत्त पडिक्कल हे देखील स्वस्तात बाद झाले.

मात्र, त्यानंतर कर्णधार रिषभ पंत आणि ध्रुव जुरेल यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. रिषभने आक्रमक खेळ केला. पण त्यालाही मोरेकीने फार काळ टिकून दिले नाही.

### माणगावची लेक स्वरा बामगुडे

# भारतीय महिला क्रिकेटचा उदयोन्मुख तारा

| माणगाव | प्रतिनिधी |



भारतीय महिला क्रिकेट संघाने नुकत्याच झालेल्या महिला वर्ल्ड कप स्पर्धेत विजेतेपद मिळवून इतिहास रचला. या विजयाचा क्षण देशभर साजरा होत असताना माणगावमध्ये एक अनोखी भावना होती. कारण टीव्हीवरील प्रत्येक भारतीय खेळाडूमध्ये माणगावच्या स्वरा बामगुडे हिचा उत्साह आणि आत्मविश्वास दिसत असल्याचा भास सर्वांना होत होता.

स्वरा बामगुडे ही माणगावचा अभिमान ठरत आहे. नितीन बामगुडे यांची ही कन्या अल्पवयातच क्रिकेटच्या माध्यमातून स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करत आहे. स्वरा ही केवळ गुणी आणि हुषार नाही, तर ती अतिशय चाणाक्ष, मितभाषी आणि मेहनती आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वात आत्म विश्वासाची झळाळी दिसते आणि तोच तिच्या खेळाचा मुख्य आधार आहे. माणगावच्या मैदानावर सकाळच्या सरावावेळी स्वराला फलंदाजी करताना पाहिलं की तिचं तंत्र, एकाग्रता आणि शिस्त सर्वांना भावते. तिच्या फलंदाजीतील नजाकत, चेंडूवरील नियंत्रण आणि यष्टिरक्षणातील चपळता पाहता ती काहीतरी साध्य करणार, असा ठाम विश्वास वाटतो. क्रिकेटमध्ये फलंदाज आणि यष्टिरक्षक या दोन्ही भूमिका समर्थपणे निभावणं हे दुर्मिळ आहे. स्वरा या दुहेरी जबाबदाऱ्या पार पाडते. सध्या ती नवी मुंबईतील डॉ. डि. वाय. पाटील कॉलेजमध्ये क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ती आपला खेळ अधिक उंचावून राष्ट्रीय स्तरावर खेळण्याचे ध्येय तिने ठरवले आहे.

### रेडरॉक्स आयोजित वुमन हेल्थ समिटमध्ये वेटलिफ्टिंग स्पर्धा

# पेणच्या महिलांनी मारली बाजी

| हमरापूर | प्रतिनिधी |

रेड रॉक्स आयोजित वुमन हेल्थ समिटमध्ये वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये पेणच्या महिलांनी बाजी मारली आहे.



रेडरॉक्स वेलनेस तर्फे पेण तालुक्यातील महिलांकरिता वूमन हेल्थ समिटचे आयोजन महाकाली हॉल कासारआळी येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पेण तालुक्यातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी यावेळी रेड बॉक्स वेलनेसच्या संस्थापिका तरन्नुम काझमी यांनी सकस आहार, मेडिटेशन व फिटनेस संदर्भात मार्गदर्शन केले. बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्यावरील विपरीतपरिणाम, व्यायामवसमतोल आहाराने निरोगी राहण्याचा गुरुमंत्र या विषयावर महिलांचे मार्गदर्शन केले. हृदयरोग, मुळव्याध, मधुमेह, उच्च रक्तदाब या व्याधी बदलत्या जीवनशैलीचा परिणाम आहेत. आपली जीवनशैली बदलून या व्याधींवर आपल्याला मात करणे सहज शक्य आहे. स्वास्थ विषयक जागरूकता, दैनंदिन जीवनातील आरोग्य आणि व्यायाम व समतोल आहारने आपण निरोगी व सुदृढ राहू शकतो असे प्रतिपादन त्यांनी केले.

पेणच्या कन्या विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका विजया भट या ७८ वर्षांच्या आर्जीनी व्यायाम करून तरुण पिढीलाही लाजवेल अशी कामगिरी केल्याने त्यांना एजलेस फिटनेस आयकॉन अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. रेड रॉक्स फिटनेस क्लब मधील प्रिती आगरकर, अश्विनी वासकर, तेजल हजारे व वृषाली दाभोळकर या महिलांनी पहिल्यांदाच जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत भाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी करून पदके पटकावीले. या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी शिल्पा ठाकूर यांनी ९ किलो वजन व नितुनी पाटील यांनी तीन महिन्यात ७ वजन कमी केले. फिटनेसच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना गौरविण्यात आले.

# निवडक

## सावंतवाडीची केशर निर्गुण राष्ट्रीय कॅरम स्पर्धेत उपविजेती

**सावंतवडी :** ग्वाल्हेर, मध्यप्रदेश येथे ५० वी राष्ट्रीय कुमार गट कॅरम स्पर्धा पार पडली. सावंतवाडी येथील केशर राजेश निर्गुण हीने २१ वर्षांखालील मुलींच्या गटात उपविजेतेपद पटकावत सिंधुदुर्गाची मान पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर उंचावली. या स्पर्धेमध्ये केशर एअरपोर्ट ऑथॉरीटी ऑफ इंडिया तर्फे सहभागी झाली होती. तर सिंधुदुर्गाची दुसरी आघाडीची कॅरमपटू महाराष्ट्राच्या संघातून या स्पर्धेत याच वयोगटातून सहभागी झाली होती. उपांत्य फेरीच्या आधीच या दोघी एकमेकांसमोर आल्या. दिक्षावर मात करत केशरने उपान्य फेरी गाठली. उपउपान्त्य फेरीत दिल्लीच्या साक्षी गेहलोतवर तर उपांत्य फेरीत तामिळनाडूच्या व्ही मित्रा वर दोन सरळ सेटमधे सहज मात करत केशरने अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत केशरची गाठ पारंपरिक प्रतिस्पर्धी ठाण्याच्या समृद्धी घाडीगावकर बरोबर पडली. समृद्धीने उपांत्य फेरीत पहिला सेट गमावल्या नंतर संघर्षपूर्ण लढतीत तामिळनाडूच्या भरगत निशावर विजय मिळवला. अंतिम फेरीत समृद्धीने केशरला प्रतिकाराची फारशी संधी न देता विजय मिळवला.



## धोनी २०२६ मध्ये आयपीएल खेळणार

**चेन्नई :** चेन्नई सुपर किंग्जचे सीईओ कासी विश्वनाथन यांनी स्पष्ट केले आहे की महेंद्रसिंग धोनी २०२६ मध्ये आयपीएलमध्ये खेळेल. त्यांनी सांगितले की धोनीचा सध्या निवृत्ती घेण्याचा कोणताही विचार नाही. एका मासिकाच्या मुलाखतीत त्याचा नातू नोआशी बोलताना विश्वनाथन म्हणाले, धोनी या आयपीएलसाठी निवृत्त होत नाहीये. मी त्याच्याशी याबद्दल बोलेन. धोनीच्या नेतृत्वाखाली, चेन्नई सुपर किंग्जने २०१०, २०११, २०१८, २०२१ आणि २०२३ मध्ये आयपीएलचे विजेतेपद जिंकले. तथापि, आयपीएल २०२५ च्या हंगामात सीएसकेची कामगिरी खराब होती. संघाने १४ पैकी फक्त चार सामने जिंकले आणि पहिल्यांदाच पॉइंट टेबलमध्ये तळाशी राहिला.



## टी-२० क्रमवारीत भारताचे वर्चस्व!

**दुबई :** : भारतीय खेळाडूंचे आयसीसीच्या टी-२० क्रमवारीत प्रकर्षाने वर्चस्व दिसून येत आहे. भारतीय संघ पहिल्या स्थानावर असून, फलंदाजांच्या क्रमवारीत अभिषेक शर्मा आणि गोलंदाजीमध्ये वरुण चक्रवर्ती पहिल्या स्थानावर विराजमान आहेत. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात मैदानात उतरणारा भारतीय टी-२० संघ २७२ रेटिंगसह पहिल्या स्थानावर विराजमान आहे. ऑस्ट्रेलियन संघ २६८ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर असून, इंग्लंडचा संघ २५८ रेटिंगसह तिसऱ्या स्थानावर आहे. सध्या भारतीय संघ ऑस्ट्रेलियामध्ये पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळत आहे.फलंदाजांच्या क्रमवारीत अभिषेक शर्मा पहिल्या स्थानावर आहे. त्याने ९२५ रेटिंगची कमाई केली आहे. इंग्लंडचा फिल सॉल्ट ८४९ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर असून, भारताचा तिलक वर्मा ७८८ रेटिंगसह तिसऱ्या स्थानावर आहे..पहिल्या स्थानावर कायमआयसीसीच्या टी-२० गोलंदाजांच्या क्रमवारीत वरुण चक्रवर्ती ७९९ रेटिंगसह पहिल्या स्थानावर कायम आहे. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जॉश हेझलवूड याने दोन स्थानांनी प्रगती करीत ६५९ रेटिंगसह दहाव्या स्थानावर आहे. वेस्ट इंडीजचा अकील होसैन ७२६ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर आहे. अफगाणिस्तानचा राशीद खान तिसऱ्या स्थानावर आहे.

## रोनाल्डो निवृत्तीच्या वाटेवर!

**पोर्तुगाल** : पोर्तुगीज फुटबॉलचा महान खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो याने लवकरच व्यावसायिक फुटबॉलमधून निवृत्ती घेण्याचे संकेत दिले आहेत. ४० वर्षीय या सुपरस्टारने ब्रिटिश पत्रकार पियर्स मॉर्गन यांना दिलेल्या मुलाखतीत आपल्या भविष्यावर आणि फुटबॉलच्या कारकिर्दीच्या समाप्तीबद्दल अनेक महत्त्वपूर्ण भाष्य केले. मुलाखतीत निवृत्तीबद्दल विचारले असता रोनाल्डो भावूक झाला. तो म्हणाला की, मला वाटते की, मी त्यासाठी तयार आहे. परंतु, हा निर्णय घेणे खूप कठीण आहे. प्रत्येक गोष्टीची सुरुवात आणि शेवट असतो. आता मला स्वतःसाठी, माझ्या कुटुंबाला आणि माझ्या मलांना वेळ द्यायचा आहे. रोनाल्डोने २५-२६ वर्षांचा असल्यापासूनच भविष्याची तयारी सुरू केली होती. रोनाल्डोने निवृत्तीची कोणतीही विशिष्ट तारीख सांगितली नसली तरी, त्याचे कारकिर्दीत १००० गोल करण्याचे स्वप्न आहे. हे ध्येय साध्य झाल्यानंतरच तो निवृत्त होण्याची शक्यता आहे. क्लब आणि देशासाठी आतापर्यंत रोनाल्डोने ९५२ गोल केले आहेत. म्हणजेच त्याचे हे महत्त्वाचे ध्येय आता फार दूर नाही. रोनाल्डोने आपल्या कारकिर्दीत पाच विश्वचषक खेळले आहेत.



## तेंबा बावुमाचे फिरकीला प्राधान्य

**बंगळूर** : दक्षिण आफ्रिकन संघामध्ये प्रभावी गोलंदाजी करणारे फिरकीपटू आहेत. त्यामुळे दक्षिण आफ्रिकन संघाकडे तब्बल २५ वर्षांनंतर भारतामध्ये कसोटी मालिका जिंकण्याची सुवर्णसंधी असणार आहे, असा विश्वास व्यक्त केला आहे दक्षिण आफ्रिकन कसोटी संघाचा कर्णधार तेंबा बावुमा याने.तेंबा बावुमा पुढे म्हणाला, की दक्षिण आफ्रिकन संघाने भारतामध्ये कसोटी मालिका जिंकून बराच अवधी झाला आहे. यंदा मात्र आमच्या संघाकडे मोठी संधी असणार आहे. आमच्या संघाचे भारतामध्ये कसोटी मालिका जिंकण्याचे ध्येय आहे. दरम्यान, हँसी क्रोनिए यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण आफ्रिकन संघाने १९९९-२००० मध्ये भारतामध्ये कसोटी मालिका जिंकण्याचा पराक्रम केला होता. तेंबा बावुमा याने भारतीय संघाबाबत आपले मत व्यक्त करताना म्हटले, की विराट कोहली, रोहित शर्मा, रवीचंद्रन अश्विन या अनुभवी खेळाडूंनी भारतीय संघासाठी मोलाची कामगिरी केली आहे. या सर्व दिग्गज खेळाडूंच्या दमदार प्रदर्शनामुळे भारतीय संघ उच्चस्तरावर उभा आहे; मात्र भारतीय संघामध्ये आलेल्या युवा खेळाडूंनीही आपली चमक दाखवली आहे. इंग्लंडमध्ये मालिका बरोबरीत राखताना त्यांनी छान कामगिरी केली आहे. त्यामुळे भारतीय संघाविरुद्धच्या कसोटी मालिकेत आमच्यासमोर आव्हान असणार आहे. यासाठी आम्ही सज्ज झालो आहोत, असेही आफ्रिकेचा कर्णधार बावुमा म्हणाला.

भावपूर्ण श्रद्धांजली

दि. ७ नोव्हेंबर २०२५



आज कै. माधुरी यशवंत पवार

यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त त्यांना

विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली.

प्रेमळ व स्नेही स्वभावाच्या आमच्या प्रिय मामींच्या आठवणी आम्हाला सदैव प्रेरणा देत राहतील. त्यांच्या स्मरणार्थ आज आक्षी अलिबाग येथील एका शाळेत विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वितरण करण्यात आले.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती लाभो.

- दिलीप जगन्नाथ शिर्के

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)